


# विलेपारल्यातील बलुतेदार
# भाग २

लेखक : अरूण फडके

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# विलेपारल्यातील बलुतेदार- 2

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# विलेपारल्यातील बलुतेदार

## भाग-२

लेखक

अरुण फडके

# विलेपारल्यातील बलुतेदार : भाग-१

## लेखक... अरुण फडके

पत्ता- अरुण फडके, १९, अमिता सोसायटी, चवथा मजला, कान्होजी आंग्रे मार्ग, कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९.
M: 7400173637M: ७४००१७३६३७,
sheroophadke@gmail.com

मुखपृष्ठ: श्री शैलेश तेंडोलकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604


**प्रकाशन : २५ डिसेंबर २०२० (गीता जयंती)**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अरुण फडके



अरुण फडके हे एक अभ्यासू लेखक म्हणून सुपरिचित आहेत. फ्रीमेसनरी या प्राचीन जागतिक संघटनेचे सदस्य व संघटनेच्या भारतातील इतिहासाचे अभ्यासक, एक इंटरनॅशनल कॉफी टेबल बुक प्रकाशित आहे. ते विस्मृतीत गेलेल्या मराठी म्हणी - वाक्प्रचार याचे अभ्यासक असून ६० लेखांची लेखमाला तरुण भारत मधे प्रकाशित झाली आहे.

त्यांचा अभ्यासाचा मुख्य विषय आहे सिंबॉल-सिंबॉलिझम-ॲलिगरी, अर्थात रूपकशास्त्र – प्रतीकशास्त्र -- चिन्ह – चिन्हसंकेत - चिन्हार्थ. याही विषयावर दैनिक मुंबई तरुण भारतमधे ६० लेखांची लेखमाला प्रकाशित झाली. चिह्न निमित्त – निमित्त चिह्न हे पुस्तक लवकरच येत आहे. विलेपारल्यातील बलुतेदार ही मासिक २४ लेखांची लेखमाला अभूतपूर्व या मासिकात प्रकाशित. सध्या लोकमान्य सेवा संघाच्या शताब्दी इतिहास खंडाचे लेखन सुरू. बालनाट्य चळवळ, प्रायोगिक-व्यवसायिक नाट्य चळवळींचा इतिहास व विलेपार्ल्यातील रंगकर्मी यांचा परीचय करून देणाऱ्या पुस्तकाचे संकलन-लेखन सुरु आहे.

अनेक नामवंत संस्थांच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो. लोकमान्य सेवा संघ, पारले. गॉसिप ग्रुप ही प्रायोगिक रंगभूमीवरील संस्था, नाट्यसंपदा प्रतिष्ठान, कै मो ग रांगणेकर जन्मशताब्दी महोत्सव, जागतिक चित्पावन महासंमेलन, म ल डहाणूकर वाणिज्य महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना आदींचे ते आघाडीचे कार्यकर्ते विश्वस्त आहेत. तसेच ते मोठ्या उत्सवी कार्यक्रमांचे अनुभवी संघटक (Event designer) व Heritage Structure Rehabilitation & Restoration या विषयातील अनेक यंत्र-तंत्रांचे विशेषज्ञ आहेत.

## लेखकाचे मनोगत

**अरुण फडके**

अफाट लोकसंग्रह ही त्यांची संपत्ती होती.

विलक्षण प्रभावी जनसंपर्क ही त्यांची अगणित समृद्ध जमा खाती होती.

संपर्कातील समाजाचे पालकत्व आणि सेवाभाव ही त्यांची निसर्गदत्त गुणवत्ता होती.

चातुर्य – विवेक – विश्वास -- दूरदृष्टी – मुत्सद्देगिरी – ममत्व – सौहार्द आणि प्रसंगी कठोर निर्णय घेण्याची क्षमता हे त्यां प्रत्येकाचे आपण अनुभवलेले पैलूदार व्यक्तिमत्व होते.

वर उल्लेख केलेल्या प्रत्येक गुणवत्तेला मी आदर्श मानले. एकलव्यनीतीने मी यांच्याकडून मूल्यसंस्कृतीचे धडे घेतले. विलेपारल्याच्या व्यक्ति आणि कुटुंबव्यवस्थेवर – संपूर्ण समाज जीवनावर – मूळ मराठी संस्कृती आणि आचरण निष्ठांवर दीर्घकालीन प्रभाव पाडणारी काही व्यक्तिमत्व या उपनगराचे वैभव होत्या, आजही आहेत. विलेपारल्याच्या आजच्या प्रचलित आणि अनोख्या समाजसंस्कृतीची मुलभूत बांधणी करणाऱ्या अशा काही

महानुभावांनी, विसाव्या शतकांत अनेक आदर्श निर्माण केले. पुढील पिढीसाठी आवश्यक ध्येयधारणेची वास्तवातील – दृश्य स्वरूपातील व्यक्तता आणि त्यासाठी आवश्यक धोरणांची मांडणी, ही या सर्व विविध क्षेत्रातील महानुभावांची, प्रत्येक पुढच्या पिढीसाठीची चिरंतन ऊर्जा आहे.

या पुस्तकात लिहिलेल्या लेखातील प्रत्येक बलुतेदारचा माझा परिचय होता आणि आजही आहेच. अनेकांच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीच्या प्रगतीचे आलेख यात आहेत. यातले काही बलुतेदार First Generation Entrepreneur होते आणि आहेत. यातल्या प्रत्येकाचा व्यवसाय वेगळा मात्र ऊर्जा तीच – प्रगतीचे आलेख तसेच आकाशाकडे जाणारे – समंजस ग्राहकनीति तशीच – टिकून रहाण्याची क्षमता अगदी तशीच. स्वतः **आर्थिक जोखीम सोसून नवीन उद्योग सुरु करणारा**... असा यातील **Entrepreneur** या शब्दाचा अर्थ फार सूचक आणि स्पष्ट आहे. या पुस्तकातील बारा लेखातील प्रत्येक बलुतेदार या आणि अशा जोखमिंच्या अनुभवातून तावून सलाखून निघालेले आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर IT क्षेत्रात यशस्वी झालेले एक अस्सल पारलेकर, श्री दीपक घैसास यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. पांढऱ्याला पांढर आणि काळयाला काळच म्हटलं जाईल...त्याला अन्य रंगांचा स्पर्श होणार नाही अशा सडेतोड वृत्तीचे, चिकित्सक - रोखठोक दीपक घैसास...अगदी पारदर्शक स्नेही. स्वतःचा उद्योग करणाऱ्या प्रत्येकाला...मग त्या उद्योगाचा आकार किती आहे याचा ऊहापोह न करता...प्रसन्न चित्ताने पाठींबा आणि केलेले संपूर्ण मार्गदर्शन या दीपक घैसासांच्या सौजन्याचा अनुभव माझ्यासह अनेकांनी नक्कीच घेतला आहे. विलेपारल्यातील या बलुतेदारांकडे घैसास अस्सल पारलेकाराच्या चष्म्यातून पहातात आणि त्यांची नेमकी टिप्पणी त्यांच्या प्रस्तावनेतून उलगडते. माझे लेखन आणि त्यांची प्रस्तावना...दोन्ही निरपेक्ष आणि निर्व्याज व्यक्तता आहेत. दीपक घैसास, सुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर, IT व्यवसायात यश मिळवणारे **First Generation Entrepreneur**...अर्थात एक यशस्वी बलुतेदारच आहेत. विलेपारल्यातील बलुतेदारांच्या या लेखांतील नोंदीना, त्यांनी प्रस्तावनेतून कर्तव्यभावनेने दाद दिली त्यासाठी दीपक घैसास यांना सादर सस्नेह नमस्कार...!

गेली दोन वर्षे, अभूतपूर्व मासिकात सर्वच लेखांना देखणेपण देणाऱ्या श्री शैलेश तेंडोलकर यां सौजन्यशील स्नेह्याने विलेपारल्यातील बलुतेदार या लेखमालेच्या भाग १ आणि भाग २ या दोन्ही ई पुस्तकांचे मुखपृष्ठ तितक्याच निर्व्याज आणि निरपेक्ष धारणेने निर्माण केले. त्यासाठी शैलेशभाऊंना सादर सस्नेह नमस्कार...!

मुबलकता – वैविध्य – ताजेपणा – नाविन्य – स्वच्छता -- संपन्नता -- संपर्क क्षमता...असे आमच्या विलेपारले या उपनगराच्या खास वैशिष्ट्यांचे संकेत, या मुखपृष्ठाच्या फळे आणि भाजी बाजाराच्या रूपक अथवा मॉन्टाज मध्ये चित्रित झाले आहेत.

ही लेखमाला अभूतपूर्व या मासिकात छापून प्रकाशित करणारे संपादक - मालक श्री अनिल हर्डीकर याना, लेखमाला ई पुस्तकात समाविष्ट करण्यास संमती दिली. त्यासाठी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. अभूतपूर्वच्या काही वाचकांचे अभिप्राय या ई पुस्तकाचे वैशिष्ट्यआहे. अभिप्राय लिहिणाऱ्या त्या सर्व स्नेही – सुर्हुदाना सादर सस्नेह नमस्कार...!

E साहित्य प्रतिष्ठान हे या ई पुस्तकाचे प्रकाशक आणि सर्व वाचक, या सर्वांन मनःपूर्वक धन्यवाद. एका महत्वाच्या उपनगराचा आणि तेथील बलूतेदारांचा असा परीचय तुम्हाला निश्चितच आवडेल याची मला खात्रीच आहे.

लिहू आनंदे – वाचू आनंदे...!

अरुण फडके,
गीताजयंती, २५ डिसेंबर, २०२०.
विलेपारले, पूर्व, मुंबई.
M: ७४००१७३६३७

# विलेपारल्यातील बलुतेदार भाग २

## वाचक अभिप्राय

१...

माणसांचे समूह जिथे जिथे वस्तीला आले, तिथे मुद्दाम काही सांगावं, अशा कथा घडलेल्या आहेत. या माणसांच्या समुद्रात सिध्दहस्त लेखक अरुण फडके डूबी मारतो, नावाजलेली मोत्यासारखी माणसे हुडकतो आणि अवसानरहीत त्यांचं शब्दांकन करतो. विलेपारले उपनगरातील बलुतेदारी प्रस्तुत करणारा अरुण याचा आणि आमचा दोस्ताना चारहून अधिक दशकांचा..! शिवाय मीही त्या उमेदीच्या काळात पारलेकरच होतो.

या आधुनिक बलुतेदारांशी व्यवहारनिमित्ते कां होईना, परिचीत होतो. अरुणच्या विविध लेखांद्वारे, विस्मरणात गेलेली ही कर्तुत्ववान माणसं सहज प्रगट होत गेली. कृतज्ञतेचा एक वेगळा आनंद आम्हा आजी-माजी पारलेकरांना देवून गेली. या लेखांत अरुणने प्रत्येक बलुतेदार त्याच्या गुणवैशिष्ट्यांसह पेश केला आहे. प्रत्येकाचे यशाचे मापदंड निराळे आहेत. नेटके सादरीकरण आणि मापात बसवलेले तरीही परिपूर्ण अशा वस्तुनिष्ठ उपचाराने हे लेख वाचनीय झाले आहेत. अरुणची उपजत वृत्ती गुणग्राही आहे आणि

म्हणून पारलेवासियांच्या गरजा ज्यांनी दशकानुदशके पुरवल्या... त्यांना नेमकं काय हवं नको, याची दखल घेतली, अशांना खांद्यावर उचलून पेश करणं लेखणीची श्रीमंती असलेल्या या बोरुबहाद्दराला आवश्यक भासले. या शिवधनुष्याच्या पहिल्या लेखांची प्रत्यंचा लावली गेली तेव्हाच, बलुतेदारांवरील पुढील प्रत्येक लेख विलक्षण आनंद देऊन जाणार.. याची ग्वाही पटली होती.

शुभेच्छांसह,

मुकुंद पुराणिक

पुणे.

७ डिसेंबर, २०२०.

--००—

वाचक अभिप्राय

२...

विलेपारले.....मुंबई महानगरीतील एक सुसंस्कृत उपनगर. नाट्य, साहित्य, संस्कृतीचा समृद्ध वारसा लाभलेलं...यातील उद्यमशील कुटुंबांचा परिचय अत्यंत रसाळपणे, श्री अरुण फडके यांनी या पुस्तकात आपल्याला घडविला आहे. अक्षरशः शुन्यातून सुरू केलेले हे व्यवसाय आपल्या सचोटीने, कृतीशीलतेने, भविष्याचा वेध घेत कसे विस्तारले हे त्यांच्याशी संवाद साधत, अंतरंगात शिरुन श्री अरुण फडके आपल्या पुढे पेश करतात..!.. या सा-या प्रवासात साठ सत्तर वर्षांचे पारलेही त्याच्या बदलत्या रुपासह आपण निरखत राहतो. संबंधित उद्यमशील कुटुंबांशी आपलेही जणू वर्षानुवर्षांचे नातं आहे असा 'फील' लेखकाप्रमाणे आपणही अनुभवतो, याचं श्रेय अर्थातच अरुणजींच्या शैलीदार लेखणीला..!....विलेपारल्यातील बलुतेदार भाग २ या ई पुस्तकाला खूप शुभेच्छा...!

सौ वर्षा ओक

ठाणे.

१६ डिसेंबर, २०२०.

--००—

वाचक अभिप्राय ३...

बलुतेदार हा शब्द ऐकला की मन आपोआपच काही दशके मागे जाते नाही का...? पूर्वी गावागावात बलुतेदारी पद्धत अस्तित्वात होती, जी गावाच्या अर्थव्यवस्थेचा पाया होती आणि जी पुढे हळूहळू नामशेष झाली. या बारा बलुतेदार पद्धतीत गावाच्या महत्त्वाच्या / नेहमीच्या तसेच नैमित्तिक गरजा या गावातील लोकांकडूनच भागवल्या जात असत. हे व्यवसाय कुलपरंपरेसारखे पिढ्यानपिढ्या चालत आलेले असत. कष्टाळूपणा, कर्मनिष्ठा, निर्व्यसनीपणा, वाट्याला आलेल्या व्यवसायाविषयीचे प्रेम ही या पद्धतीची महत्वाची सूत्रे... अगदी याच धर्तीवर आधारित अशी विलेपारल्यातील मराठी बलुतं ही बाराच भागांची लेखमालिका माझे जेष्ठ स्नेही श्री. अरुण फडके यांनी लिहिली आहे. आता त्याचे ई पुस्तक प्रकाशित होते आहे.

त्यांचे लेखन वाचणे ही वाचकाला कायम मेजवानीच असते. विषय निवड बाबतीत sky is the limit असेच म्हणावे लागेल. दरवेळी नवनवे विषय घेऊन अभ्यासपूर्वक लेखन करणे ही तर त्यांची हातोटीच. कोविडमुळे झालेल्या लॉकडाउनच्या

अडचणीवर मात करून नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर महिन्याचा लेख वेळेत वाचकांच्या हाती पडेल इकडेही त्यांचे लक्ष होतेच / असतेच..

डीएनए....शरीरातील पेशींचे कार्य ज्याच्यामुळे सुरळीत चालते असा घटक... विलेपारल्यातील येथील समाजाचा डीएनए म्हणजे कौटुंबिक उपजीविकेसाठी वा शिक्षणासाठी स्थलांतरित झालेल्यांच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करणे... ज्या की तेथेच आधी स्थलांतरित होऊन स्थापित झालेल्या द्रष्टया नागरिकांनी पूर्ण केल्या.

त्या सर्वांचा आढावा घेणारी ही लेखमालिका. स्वतःच्या आर्थिक क्षमते बरोबरच ग्राहकांची अचूक गरज ओळखणे, निरपेक्ष वृत्ती तसेच समाजाभिमुख कार्यामुळे अण्णासाहेब साठे यांच्या व्यवसायाच्या चढत्या आलेखाच्या कमानीतून आपण आत शिरतो.

पुढे जाऊन मधुकर जाधव यांनी संपन्न केलेल्या जावळ आणि मौन्जिबंधन सोहळयाचे साक्षीदार होतो. मुसळूणकर यांचे पारंपारिक घडणावळीचे दागिने घालून तिथे मिरवतो. आप्पासाहेब

जोगळेकरांच्या जीवन रेस्टॉरंटमध्ये जेवून तृप्त होतो. शैक्षणिक - साहित्यिक - सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो यांनी भरविलेल्या साहित्य जत्रेचा आनंदही आपल्याला मिळाला.

महादेव इंदुलकरांच्या ट्रंक आणि प्रवासी होल्डाल घेऊन गुलमोहर ट्रॅव्हल्सच्या गाडीतून आम्र महोत्सव पर्यटनाबरोबरच इतरही प्रेक्षणीय स्थळांना भेटी देतो. गोखले कुटूंबियांच्या विष्णू स्टोअर्स आणि इंदुलकर कुटूंबियांच्या रघुवीर स्टोअर्स मधून घरगुती पद्धतीने बनविलेला चकली-चिवडा-लाडू अशा तयार खाद्याचा आनंद घेतो. सप्रे आणि मंडळी यांच्या विविध प्रकारची पिठे, दर्जेदार-स्वच्छ वाणसामानामुळे अनेक नोकरदार महिलांची तारेवरची कसरत कमी होत असते. जी के स्पोर्ट्स मध्ये क्रीडा क्षेत्रातील अद्ययावत सामुग्री तसेच विविध खेळाला आवश्यक सल्ला उपलब्ध आहे. अशी विलेपारल्याची आपण सफर करून येतो.

श्री अरुण फडके यांच्या विलेपारल्यातील बलुतेदार भाग २ या ई पुस्तकाला आणि पुढच्या लेखमालेसाठी अनेकानेक शुभेच्छा...!

सौ शुभांगी गोखले,

पुणे.

१६ डिसेंबर, २०२०.

--००—

## वाचक अभिप्राय - ४...

माझा स्नेही अरुण फडकेच्या विलेपारल्याच्या बलुतेदारांविषयी मला आज लिहावेसे वाटते..! जिथे गाव तिथे बलुतेदार...! यात काय विशेष असे काही नाही... खरे नां..? लहानपणापासून अनेक प्रकारच्या वाचनातून लक्षात आले होते की तांत्रिक जडण घडणीची आवश्यकता, कश्याचीही उभारणी करण्यासाठी लागतेच. त्यासाठी साहजिकच ... आपल्याकडे काहीतरी नैसर्गिक गुणवत्ता - ऊर्जा आणि अनुभव असावेच लागते, त्या शिवाय पुढील कारकिर्दीची उभारणी कशी होणार..?

त्यामुळे गाव उभारले म्हणजेच त्यामध्ये बलुतेदार आहेतच. मग काय वेगळे..?! त्यामुळे पारल्यामधील बलुतेदार या मध्ये एवढे काय विशेष बुवा?..असे सुरुवातीला वाटले होते...! मात्र अरुण बरोबरच्या स्नेहामुळे बलुतेदार वाचायला सुरवात केली. एका मागून एक लेख वाचत होते...! हळू हळू पुढील लेख केव्हा येईल याची वाट पाहू लागले. पण एखादा बलुतेदार हा बलुतेदारच असणार नाही का? पण इथे, पण म्हटल्यावर मला क्षणभर थांबून श्वास घ्यावा लागतोय. पण अरुणने बलुतेदार साकारताना प्रत्येक

व्यक्तिमत्वाची उलगड ज्या पद्धतीने केली त्याला काय म्हणावे? विशेषतः तो बलुतेदार - त्या व्यक्तीची आंतरिक ओढ, परिस्तिथीची अनुकूलता किंवा प्रतिकूलता यातून त्या व्यक्तीने निर्माण केलेल्या सामाजिक विणीचे योगदान आणि त्यामुळे झालेल्या गावाची उभारणी..!

एक एक अश्या व्यक्ती हुडकून काढल्या अरुणने. अरुणने त्यांच्या फक्त बलुतेदारी विषयी नव्हे तर त्या गावाच्या बेसिक बांधणी मध्ये असलेल्या अश्या व्यक्ति... ज्या कष्टाळू आहेत, क्रीएटीव्ह आहेत, सुबुरीदार आहेत आणि आशावादी आहेत ...अश्यांचे जे दर्शन घडवले त्या बद्दल म्हणावे... वाह अरुण... सुंदर.. अप्रतिम...! अरुणच्या लेखणीतून अवतरलेल्या सरस्वतीमुळे, माणसे कशी वाचावीत याचा उत्तम उत्तम अभ्यास होतो...!

Eसाहित्य प्रतिष्ठान प्रकाशित करत असलेल्या नव्या ई पुस्तकासाठी...यांचे कौतुक आणि आभार...!...स्नेही अरुणला अनेक शुभेच्छा...!

मेधा सुर्वे,

कांदिवली, मुंबई, १६ डिसेंबर २०२०.

--००--

# चार शब्द

**अनिल हर्डीकर**

**अभूतपूर्व पार्ले** या नावात पूर्व पार्ले असा स्पष्ट संकेत असलेलं मासिक सुरु करून अकरा वर्षे झाली होती.जवळ जवळ हजार हून अधिक वर्गणीदारांनी या मासिकावरचे प्रेम आणि आपुलकी व्यक्त केली होती. अंक मिळण्यास चार दिवस लागले तरी **अजून अंक आला नाही?** असा प्रश्न किंवा **अजून अंक आला नाही** अशी तक्रार मला वर्गणीदारांना अंकाबद्दल असलेली उत्सुकता आणि लोकप्रियता सुखवत होती. मात्र त्याचबरोबर वाचकांना आवडतील असे लेख, अशी माहिती देणं ही माझी जबाबदारी माझ्या मनावरचा ताण वाढवणारी होती.

साल २०१८ .डिसेंबर महिना. अरुण फडके यांचा फोन आला. त्यांनी **अभूतपूर्व पार्ले** या मासिकात पूर्व विलेपारल्यातील व्यावसायिकांविषयी लिहिण्याची इच्छा, तयारी दर्शवली. अरुणशी माझा जुना परिचय. अरुण हा कुशल संघटक. कोणत्याही गोष्टीशी भिडायचं कसं ते अरुणकडून शिकावं. एवढं असताना अकरा वर्षात अभूतपूर्व साठी तो काही लिहू शकेल असं माझ्या डोक्यात

न येण्याचं कारण मला माहीत नाही. काही गोष्टी आपण करत नाही. त्या होतात कारण त्या व्हायच्याच असतात. आपण असतो निमित्तमात्र. ज्या क्षणी अरुण फडके यांनी हा प्रस्ताव मांडला त्याच क्षणी मी होकार दिला. माझ्या होकारानंतर मात्र ज्यावेळी अरुण फडके म्हणाले की ते अमराठी व्यावसायिकांबद्दल लिहू इच्छीतात त्यावेळी मी विचारात पडलो.

कितीही नाही म्हटलं तरी पूर्व पारल्यात मराठी माणसे अधिक. माझ्या अभूतपूर्व चे वाचक मराठी. वाचकांना हा प्रकार कितपत रुचेल याविषयी मी साशंक होतो. मी तसं अरुणला बोलून दाखवलं. मात्र त्यानंतर जेव्हा आमच्यात चर्चा झाली त्यावेळी अरुणने त्याची भूमिका मांडली आणि मग मात्र संपादक म्हणून माझ्या सर्व शंका दूर झाल्या. २०१९ या वर्षात १२ महिन्यात १२ अमराठी व्यावसायिकांबद्दल सविस्तर लिहिण्यासाठी मी अरुणला हिरवा कंदील दाखवला. पहिला लेखच नव्हे तर १२ च्या १२ लेख ठरलेल्या तारखेला अरुणने मला मेल केले हे मला इथे आवर्जून सांगितले पाहिजे.

माताधीन हलवाईचा पहिला लेख प्रकाशित झाला आणि वाचकांनाही यापुढे असे छान माहितीपूर्ण लेख वाचायला मिळणार अशी गोड चाहूल वाचकांना लागली. अरुणच्या सर्व लेखांचं वैशिष्ट्य असं की ही माणसं ज्यावेळी आपल्या व्यवसायाचा जम बसवत होती त्यावेळी पारल्यात सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक जडण घडण कशी होती, याचे प्रत्येक लेखात त्याने केलेलं अचूक वर्णने. आपले रहाते घर सोडून इतक्या दूरवरच्या अनोळखी भागात आलेल्या त्या बलुतेदारांचे कौतुक करावे तेवढे थोडे. व्यवहार चातुर्य, मेहनत आणि दूरदृष्टी यासोबतच इथल्या माणसांना समजून घेत त्यांनी जी घोड़दौड़ केली ती वाचकांना प्रेरणादायी वाटली. मुख्य म्हणजे ही मंडळी त्यांच्या रोजच्या भेटण्यातली – ओळखीची. या लेखांच्या माध्यमातून त्यांचा इतिहास उलगडला गेला.

हे सर्व लेख ई-पुस्तकाच्या माध्यमातून आपल्यासमोर येत आहेत ही आनंददायी बाब आहे. यापूर्वी श्री प्रदीप भिड़े आणि श्री नविन काळे याच्या **अभूतपूर्व पार्लेमधील** लेखांची पुस्तके प्रकाशित झाली असून त्या यादीत अरूण फडके यांचे नाव सामिल होते आहे. अरुण चे अभिनंदन..!

हे पुस्तक वाचकांना आवडेल अशी मला खात्री आहे,ज्यांनी हे सर्व लेख एकदा वाचले आहेत त्यांना एकत्रितपणे सर्व लेख वाचण्याचा आनंद मिळेल. एका उपनगराच्या जडण घदनीतील या इतिहास सदृश बारा लेखांना ई पुस्तक स्वरूपात सादर करावे, या निर्णयासाठी, ई-साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनिल सामंत आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन ...!

अनिल परशराम हर्डीकर

४ नोव्हेंबर, २०२०

विलेपारले, मुंबई.

# प्रस्तावना

## श्री दीपक घैसास



अरुण फडके वयाने, अनुभवाने व त्यांच्या कामाने माझ्याहून ज्येष्ठ..! लहानपणापासून त्यांना बघण्याचे खात्रीचे ठिकाण म्हणजे टिळक मंदिर..! तेथील प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने भाग घेणारी व्यक्ती अशीच पहिली ओळख. आमची पहिली भेट वर्ष १९९० मधली. सौ फडक्यांच्या दिवाळीतील ड्रायफ्रुट बॉक्सच्या संदर्भात झाली होती. पण २००७ च्या जागतिक चित्तपावन संमेलनाच्या निमित्ताने त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्या ओळखीचे झालेले ते मैत्रीपूर्ण रुपांतर आजपर्यंत कायम आहे आणि वृद्धींगतही होत आहे. कमीत कमी शब्दात फडक्यांबद्दल सांगायचे म्हणजे हरहुन्नरी, सच्चा, धडाडीचा, अखंड उर्जा प्राप्त झालेला आणि स्वत:चा दृष्टीकोन असणारा सेवाभावी कार्यकर्ता असेच म्हणावे लागेल. एखादे काम अंगावर घेतले म्हणजे ते पूर्ण होईपर्यंत सतत अस्वस्थ रहाणारा हा माणूस. आपल्या कल्पनेतही नसतील असे

विषय घेऊन त्यांचे खोलवर संशोधन करून मोजक्या शब्दात लोकांसमोर मांडण्याची कला फडक्यांकडे आहे. प्रस्तुत पुस्तक त्याचेच उदाहरण.

अरुण प्रमाणे मी ही अस्सल पार्लेकर..! माझे आई वडिल १९५५ साली पारल्यातील पहिल्या पार्लेश्वर सहकारी गृहसंस्थेत रहायला आले. काही वर्षांनी माझा जन्म झाला. रमाबाई बालमंदिर, पा.टि.वि. अशा मानक संस्थांचे संस्कार घेत, टिळकमंदिर व्यायामशाळा, जीवन आणि बाबूचा वडा - सामोसा, रामकृष्णचा डोसा, शिवसागरची पावभाजी, फडक्यांची बर्फी आणि पेढा, साठ्यांची जिलबी, दिनानाथचे नाटक, पारल्याचा विमानतळ, जुहूचा समुद्र... ह्या सर्वांबरोबरच मोठा झालो. ह्या पुस्तकात नोंदले गेलेले सर्व उद्योजक मी जवळून बघितले आहेत पण बलुतेदार म्हणून त्यांची अशी मोट बांधता येऊ शकते हे माझ्या कधीच कल्पनेत नव्हते. फडक्यांना अशी मोट बांधायचे सुचले आणि मग त्या सर्व उद्योजकांशी बोलून त्यांच्या बद्दलची माहिती मोजक्या शब्दात मांडून फडक्यांनी त्यांच्या कल्पकतेचा परत एकदा आपल्या सगळयांना परिचय करून दिला आहे.

बारा बलुतेदार ही संकल्पना मध्ययुगीन भारतीय संस्कृतीचा भाग. प्रत्येक गाव आत्मनिर्भर असावे ह्या समाज कल्पनेतून ह्या बलुतेदारांची योजना झाली असावी. बलुतेदार जेवढे गावावर अवलंबून तेव्हढे गाव ही त्यांच्यावर अवलंबून. अशा परस्परावलंबनाचे धागे व नाती फार पक्की असत. पिढ्यानपिढ्या ती जपली जात असतं. पारल्यानेही ती परंपरा जपली. फडक्यांनी सांगितलेले सर्व बलुतेदार हे पारल्यातील नागरिकांवर जेवढे अवलंबून आहेत, तेवढेच आम्ही पारलेकर त्यांच्यावर अवलंबून आहोत. अगदी पिढ्यानपिढ्या म्हणजे माझ्या मुंजीत ज्या केशकर्तनकाराने माझा गोटा केला त्यांच्याच मुलाने माझ्या मुलांच्या मुंजीत ते काम केले. भाऊ भोगल्यांच्या दुकानात त्यांच्या वडिलांकडून मी वह्या पुस्तक विकत आणली, माझ्या मुलांनी भाऊकाकांकडून आणली. माझ्या आईने अण्णा साठ्यांकडून किंवा गोखल्यांच्या विष्णू स्टोर्स मधून सामान आणले. आज माझी मुले त्यांच्या नातवंडाकडून ती आणत आहेत. पिढ्यानपिढ्या जपलेली ही नाती त्यांना बलुतेदार हा सन्मान देऊ शकतात. फडक्यांनी हा नेमकेपणा फार समर्थपणे पकडला आहे.

ह्या पुस्तकातील एक इंदुलकरांचा उद्योग सोडला तर इतर सर्वांशीच ग्राहक म्हणून माझा संबंध आला आहे. पूर्वी माझ्या आठवणीतले विलेपारले हे थोड्या बंगल्यांच आणि बाकी बऱ्याचशा दोन – तीन मजली इमारतींच्या सहकारी गृहसंस्थांचे गाव होते. गेल्या काही दशकात बंगले इतिहासात जमा झाले आणि ६०-७० च्या दशकातील २-३ मजली इमारतींचे पुनर्निर्माण होऊन ६-७ मजली इमारती बांधल्या गेल्या. पूर्वी आमच्या पार्लेश्वर मध्ये नेमक्या ३ मोटारी होत्या. आज पार्किंगला जागा मिळणे मुश्किल झाले आहे. मी आता ज्या स्वप्नशिल्प संकुलात रहातो तिथे मूर्तिकार म्हात्र्यांची वाडी होती. पारल्यात ह्या प्रमाणे सातत्याने बदल होत गेले आणि होत आहेत. पुस्तकातील बहुतेक बलुतेदारानीही ह्या बदलांची, ग्राहकांच्या बदलत्या आवडींची नोंद घेत आपल्या व्यवसायीक व्यवस्थांमध्ये बदल केले आहेत आणि तसे बदल आवश्यक आहेत. पण आजही बदलले नाही ते ह्या सर्व बलुतेदारांच अगत्य आणि ग्राहकांबरोबर असणारे जिव्हाळ्याचे संबंध. पारल्यात नवीन केशकर्तनालये, नवीन उपहारगृहे, नवीन वाणसामानाची दुकाने अधिक आकर्षक मांडणीमध्ये उभी राहिली आणि अजूनही उभी राहत आहेत तरीही केस कापायला मी शशिकांत मध्येच जातो. पुस्तक, पेन, रंग घ्यायला जवाहर मध्येच जातो. दसऱ्याला, साठ्यांशिवाय जिलबी चालतच नाही आणि

मोदकांची पिठी विष्णू स्टोअर्स मधूनच आणतो. मीच नाही बहुतेक पारलेकर हेच करतात ह्याचं कारण हा जिव्हाळा आहे, पिढ्यानपिढ्याचे हे अतूट नात आहे. आजही सहलीकरीता गाडी हवी असेल किंवा लेटर हेड्स छापून हवी असतील तरी सुबोधच डोळ्यासमोर येतो, बारश्याची भेटवस्तू म्हणून चांदीचा वाटी चमचा मुसळुणकरांकडूनच' येतो. मला वाटते बलुतेदार हे संबोधन ह्या सर्वांकरिता इतके बेमालूम लागू होते ते ह्याच कारणांमुळे.

अरुण फडक्यांनी ही मोट एकत्र बांधली त्यामुळे आधीच माहित असलेल्या ह्या सर्वांचा सखोल पुन:परिचय झाला. त्याबद्दल फडक्यांचे मन:पूर्वक आभार. मला प्रस्तावना लिहायला दिली हा माझा सन्मान. पण पारलेकर म्हणून माझेही हे कर्तव्यच नाही का...?

दीपक घैसास

विलेपारले, मुंबई,

१६ डिसेंबर, २०२०.

**अर्पण पत्रिका**

**माझ्या या लेखमालेतील बहुतांशी घटनांचे उल्लेख, विलेपारल्यातील माझ्या बालपणातील जीवनकाळात स्मृतीबद्ध झालेले आहेत. माझे रम्य बालपण स्मृतीसमृध्द करणारी माझी ऊर्जाप्रेरणा, माझी आई कै श्रीमती शोभना दिनकर फडके आणि समर्पण वृत्तीने त्यांच्या ध्येय – उद्दिष्टांप्रती दैनंदिन जीवनात नेमस्त राहिलेले माझे वडील कै श्री दिनकर परशुराम फडके, या जन्मदात्यांचे स्मरण करून, हे ई पुस्तक पारलेकर नागरिकांना अर्पण केले आहे...!**

अरुण फडके,

# विलेपारल्यातील बलुतेदार भाग २
# अनुक्रमणिका

**१... आण्णासाहेब साठे आणि विजय स्टोअर्स.**

**२... श्री मधुकर जाधव आणि शशिकांत मेन्स सलून.**

**३... भोगले परिवार आणि जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो प्रा. लि.**

**४... श्री अप्पासाहेब जोगळेकर आणि जीवन रेस्टॉरंट.**

**५... व्हि एम मुसळूणकर अँड सन्स ज्वेलर्स प्रा लि.**

**६... जोशी बंधू आणि सुबोध टाईपरायटर्स आणि गुलमोहोर ट्रॅव्हल्स**

**७... गोखले कुटुंबीय आणि विष्णू स्टोअर्स.**

**८... सप्रे कुटुंबीय आणि सप्रे आणि मंडळी.**

**९... श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे आणि कुटुंबीय, एक्सलसियर लॉन्ड्री.**

**१०... गंगाबाई इंदुलकर कुटुंबीय आणि श्री रघुवीर स्टोअर्स.**

**११... श्री महादेवराव इंदुलकर - स्वदेशी ट्रंक फॅक्टरी आणि शॉप्स.**

**१२... श्री मोहनराव बढे आणू जी के स्पोर्ट्स.**

विलेपारल्यातील बलुत २ / १

# आण्णासाहेब साठे आणि विजय स्टोअर्स



विलेपारल्याच्या व्यक्ति आणि कुटुंबव्यवस्थेवर – संपूर्ण समाज जीवनावर – मूळ मराठी संस्कृती आणि आचरण निष्ठांवर दीर्घकालीन प्रभाव पाडणारी काही व्यक्तिमत्व या उपनगराचे वैभव होत्या, आजही आहेत. विलेपारल्याच्या आजच्या प्रचलित आणि अनोख्या समाज संस्कृतीची मुलभूत बांधणी करणाऱ्या अशा काही महानुभावांनी, विसाव्या शतकांत अनेक आदर्श निर्माण केले. पुढील पिढीसाठी आवश्यक ध्येयधारणेची वास्तवातील – दृश्य स्वरूपातील व्यक्तता आणि त्यासाठी आवश्यक धोरणांची मांडणी, ही या सर्व विविध क्षेत्रातील महानुभावांची, प्रत्येक पुढच्या पिढीसाठीची चिरंतन ऊर्जा आहे. माननीय बाबुराव परांजपे, माननीय आण्णासाहेब साठे, माननीय रामभाऊ बर्वे, माननीय प्रा

मोहनराव आपटे, माननीय आप्पासाहेब जोगळेकर ही सर्व, विलेपारल्याच्या  समाजजीवनावर प्रभाव पाडणारी अशी काही निवडक व्यक्तिमत्व.

अफाट लोकसंग्रह ही त्यांची संपत्ती होती.

विलक्षण प्रभावी जनसंपर्क ही त्यांची अगणित समृद्ध जमा खाती होती.

संपर्कातील समाजाचे पालकत्व आणि सेवाभाव ही त्यांची निसर्गदत्त गुणवत्ता होती.

चातुर्य – विवेक – दूरदृष्टी – मुत्सद्देगिरी – ममत्व – सौहार्द आणि प्रसंगी कठोर निर्णय घेण्याची क्षमता हे त्यां प्रत्येकाचे आपण अनुभवलेले पैलूदार व्यक्तिमत्व होते.

एकलव्यनीतीने मी ज्यांच्याकडून मूल्यसंस्कृतीचे धडे घेतले, वर उल्लेख केलेल्या प्रत्येक गुणवत्तेला मी आदर्श मानले, ते माननीय श्री आण्णासाहेब साठे माझ्यासाठी असे प्रभावी व्यक्तिमत्व होते. विलेपारल्याच्या संस्कृतीचा महत्वाचा DNA घटक विजय स्टोअर्स, हा आण्णाच्या पश्चात आपल्याला प्राप्त झालेला चिरंतन ऊर्जा स्त्रोत आहे. आण्णासाहेबांचे व्यक्तिमत्व

आणि त्यांचे विजय स्टोअर्स हे एक संपूर्ण रसायन होते. ते वेगळे काढण्याचे धाडस कोणी करू नये.

विलेपारल्यातील प्रत्येक मुलगा – मुलगी वयाचे पाचवे वर्ष पूर्ण झाले की परांजपे बालमंदिरात दाखल होत असत. घरातल्या कुटुंब व्यवस्थेचा परीचय आणि वैयक्तिक शिस्तीचा परिपाठ जसा घरात मिळाला अगदी तसाच, छान छान हस्तकलेच्या व्यवसायातून तो परांजपे बालमंदिरात मिळाला होता. आपल्या वापराच्या कपड्यांच्या व्यवस्थित घड्या घालणे, डबा खातानाची शिस्त, पायातून काढलेल्या चपला-बूट यांची नीटस मांडणी हे बालमंदिरातील शिस्तीचे सर्व संस्कार मोठेपणी आंगवळणी पडले होते. अजून स्मरणात असलेला बालमंदिरातील असाच एक व्यवसाय म्हणजे धान्य आणि कडधान्ये यांची ओळख आणि ती कागदावर चिकटवून केलेली बालपणातल्या आकलनाने काढलेली हस्तकलेची नक्षी. ती हस्तकला आणि वास्तवातील विजय स्टोअर्स या किराणा दुकानाची निर्मिती याच्या साम्यस्थळांचि झालेली आणि अलीकडे उलगडलेली जाणीव, याचे हे स्मरणरंजन.

भाऊसाहेब आणि आण्णासाहेब साठे आणि त्यांचे विजय स्टोअर्स या विलेपारल्यातील अग्रणी मराठी बालूतेदाराचा हा पहिला लेख लिहिताना, त्या बालपणीच्या हस्तकलेची आठवण प्रखर होती. सत्त्याऐंशी वर्षांपूर्वी, १९३३ मधे गुडीपाडव्याच्या मुहूर्तावर स्थापन झालेले विजय स्टोअर्स आणि किराण्याच्या व्यापारात धान्याचा एकेक स्वच्छ दाणा निगुतीने वापरून, कलेकलेने वृद्धिंगत झालेली त्या व्यापाराची यशस्वी नक्षी याचा हा परिचय. विजय स्टोअर्सच्या वरच्या पहिल्या मजल्यावर, आण्णासाहेब साठे यांच्या शेजारी माझ्या कुटुंबाचे बिऱ्हाड होत. भाऊसाहेब आणि आण्णासाहेब साठे आणि त्यांचे विजय स्टोअर्स, हे माझ्या दैनंदिन अनुभवाचे अविभाज्य घटक होते.

१९३३ मधे भाऊसाहेब होते २९ वर्षांचे आणि धाकटा भाऊ अण्णासाहेब साठे निव्वळ नऊ वर्षांचे कुमार. त्यावेळी हे दुकान नेहरू रोड वरील एका पारशी कुटुंबाच्या चाळीत थाटले होते. नामवंत लेखक श्री सुमेध रिसबूड लिखित चौऱ्यांशी पावलं या आण्णासाहेब साठे यांच्या चरित्रात, विजय स्टोअर्सचि निर्मिती - प्रगती आणि त्यासंदर्भात असंख्य व्यक्तीमत्वांचा परिचय विस्ताराने लिहिला गेला आहे. १९३७ मधे सध्याच्या गावडे हॉस्पिटलच्या

जागी, विलेपारल्याची मंडई बांधली गेली होती. या मंडईचे भविष्यातील महत्त्व लक्षांत आल्यावर, १९३८ मधे भाऊसाहेबांनी या मंडईच्या अगदी समोर असलेल्या गोखल्यांच्या चाळीत आपले दुकान हलवण्याचा निर्णय घेतला. हा एक निर्णय आणि पुढील काळांत, चातुर्य – संयम – दूरदृष्टीने नियमितपणे घेतले गेलेले असंख्य निर्णय धाडसाचे होतेच, हाच विजय स्टोअर्स या दुकानाच्या यशाचा पाया होता. १९३३ मधे नेहेरू रोडवरील पारशी चाळीतील दुकानाचे मासिक भाडे चौतीस रुपये होते. त्याची तजवीज जेमतेम होत असताना, गोखल्यांच्या चाळीतील मंडई समोरच असलेल्या दुकानाचे पन्नास रुपये मासिक भाडे परवडेल कारण तिथे ग्राहकांची वर्दळ वाढणार होती ही भाऊसाहेबांची दूरदृष्टी आणि त्यासाठी केलेले दुकानाच्या स्थलांतराचे धाडस हे आजच्या तरुण व्यावसायिकांसाठी आदर्श असायला हवे.

भाऊसाहेब आणि आण्णासाहेब हे दोघे बंधू, विलेपारल्याच्या तत्कालीन समाजातील – कुटुंबातील आर्थिक परिस्थिती आणि नागरिकांच्या गरजांप्रती खूप संवेदनशील होते. मात्र त्या आधी त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाची गरिबी त्यांनी अनुभवली होती. कुटुंबातील नात्यांची वत्सलता – आदर – प्रेम याच्या सजग

जाणीवा आणि काटकसरीचे आणि निगुतीचे व्यवहार ही या दोन भावांच्या व्यक्तिमत्वाची अंगभूत वैशिष्ट्ये होती. कुटुंबाच्या कर्जाची अथवा व्यवसायातील कर्जाची परतफेड असो, कुटुंब हितासाठी आणि व्यवसाय वृद्धीसाठी केलेल्या प्रत्येक व्यवहारातील चातुर्य त्यातील विवेक आणि दिला - घेतला गेलेला विश्वास या भावना आणि धारणा, हे विजय स्टोअर्सच्या प्रगतीतिल महत्वाचे घटक आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांत, समाजाच्या प्राथमिक पण बदलणाऱ्या गरजा आणि त्याला अनुसरून या दोन बंधूनी सातत्याने घेतलेला नवीनतेचा शोध याचे फलित आज आपल्याला स्पष्टपणे अनुभवता येते. विजय स्टोअर्स आणि त्या नंतरच्या पिढीतील अन्य व्यवसायीकांना, त्याचा फायदा निश्चितपणे झाला आहे. सर्व धान्य स्वच्छ करून विक्रीला ठेवणे, चिवडा-चकल्या-करंज्या अशा फक्त घरीच बनवल्या जाणाऱ्या ताज्या पदार्थांची घाऊक निर्मिती करणे, गणेशमूर्तींची विक्री, या सर्व व्यवसायांचे त्या काळांत खूपच नाविन्य होते.

दुकानातील ग्राहकांबरोबर आणि भाडेकरु बरोबर असलेले चोख आणि योग्य रीतीने नोंद केलेले आर्थिक व्यवहार, लहान – थोर सर्वां प्रती सौजन्य आणि मुख्य म्हणजे दुकानाच्या काउंटरवर उभे राहिल्यावर व्यक्त होणारा अंगभूत संयम या भाऊसाहेब आणि आण्णांच्या व्यवहाराचा अनुभव मी स्वतः घेतला आहे. काही ग्राहकांच्या तक्रारींना भाऊ आणि आण्णांनी कौशल्य आणि संयमाने कसे हाताळले त्याचे विश्लेषक वर्णन श्री सुमेध रिसबूड या आण्णांच्या चरित्रकारानी चौर्यांशीं पावलं या पुस्तकात विस्ताराने केले आहे.

या दोन्ही बंधूंची अनेक संस्था - संघटनांसाठी दीर्घकाळ सादर झालेली विविध सामाजाभिमुख कार्य आणि अन्य व्यवसायिकांप्रती असलेली आपुलकी आणि आदर भावना नेहेमीच कर्मयोग्याची होती. कलिंगड – आंबे याचा पूर्ण अनोळखी व्यापारी गोविंदभैय्यावर ठेवलेला विश्वास म्हणजे माणसाची योग्य पारख करण्याचे आण्णांचे विलक्षण कसब होते. आपल्या शेजारीच असलेल्या जवाहर स्टोअर्सचे, दुकानासमोर झालेल्या बॉम्बस्फोटातील झालेले नुकसान पाहिल्यावर पन्नास हाजार रुपयांचा चेक दुसऱ्या दिवशी सकाळी घरी बोलावून दिलीपभाई

भोगल्याच्या हातात ठेवणारे सहृदय – दानशूर आण्णा, अनेकांचा आधारवड होते. मात्र त्यांच्या उजव्या हाताने दिलेले अर्थ सहाय्य डाव्या हातालाही समजत नसे इतकी त्यांची निरपेक्षता होती.

किराणा वाण सामान आणि पदार्थांचा उत्तम दर्जा – त्या दर्जाचे सातत्य - वैविध्य – नियमितपणा – वक्तशीर व्यवहार आणि यासह प्रेम – आपुलकी अशा अनेक  गुणवत्ता विलेपारल्याच्या DNA मधे प्रभावी घटक असणाऱ्या अनेक बलुतेदारांचे अग्रणी म्हणजे भाऊसाहेब आणि आण्णासाहेब आणि त्यांचे विजय स्टोअर्स.

उपजत व्यवसाय दृष्टी – संवेदनशील मन आणि बुद्धी – चतुर निर्णय क्षमता – नाविन्याचा ध्यास  आणि दीर्घ काळ टिकून राहण्याची क्षमता या कुटुंब वारशाचि शिदोरी घेऊन आणि दुकानातील व्यवहाराचा अनुभव घेऊन कालांतराने आण्णासाहेबांच्या मनोहरने स्वतंत्र व्यवसाय करायचा निर्णय घेतला. १५ ऑगस्ट १९७८ रोजी त्याने धनश्री केटरर्स या व्यवसायाची सुरुवात केली. कुटुंब वारशाबरोबरच मनोहर साठे हे एक धाडसी तरुण होते. १९८६ मधे काश्मीरच्या सहलीवर गेले असताना दाल लेक समोरील ममता हॉटेलच्या मालकाशी चर्चा

होऊन त्यांनी विजय स्टोअर्स आणि धनश्री केटरर्सच्या अनुभवातून हे हॉटेल चालवायला घेतले. आलेल्या पर्यटकांना मराठी पद्धतीची थाळी देणारे हे हॉटेल पुढची अडीच वर्षे खूप यशस्वी झाले. या सुमारास काश्मीरमधे सुरु झालेल्या दहशतवाद्यांच्या कारवाया दिवसेंदिवस वाढू लागल्या, पर्यटक कमी होऊ लागले आणि असुरक्षित वातावरणमुळे मनोहर साठे यांनी १९८९ मधे ममता हॉटेलचा व्यवसाय बंद करून परत मुंबई गाठली..

मुंबईत परत आल्यावर धनश्री केटरर्सच्या व्यवसायची वेगाने वाढ झाली. याच १९८६/८७ सालात कामगारांचा संप होऊन विजय स्टोअर्स बंद करावे लागले होते. वडीलांच्या सल्ल्याने टिळक मंदिराच्या बाजूलाच असलेल्या मनोहर निवास या स्वतःच्या बंगल्याच्या तळ मजल्यावर मनोहर साठे यांनी विजय स्टोअर्सचि पुनर्स्थापना केली. कोर्टातील केसचा निकाल लागून, १५ ऑगस्ट १९९० रोजी राममदिरा समोरील सहजीवन बिल्डींगच्या मूळ जागेत विजय स्टोअर्सचे दुकान पुन्हा सुरु झाले. या सर्व प्रवासात मनोहरची सहचारिणी शैलावाहिनी खंबीरपणे त्याच्या सोबत राहिल्या. आजही त्या विजय स्टोअर्सचे सर्व व्यवहार समर्थपणे सांभाळत आहेत.

या सगळ्या आव्हानांचा खंबीरपणे सामना करत विजय स्टोअर्सला पुन्हा त्याच वैभवापर्यंत नेण्यात मनोहर साठे यशस्वी झाले मात्र दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले आणि १९९७ मधे त्यांचे निधन झाले. या आधी वर्षभर कॉलेजचे शिक्षण संपवून मनोहर साठ्यांचा मुलगा पराग याने वडिलांबरोबर दुकानाचे व्यवहार पाहायला सुरुवात केली होती. वडील मनोहर आणि आण्णासाहेब साठ्यांच्या या व्यवसाय कुशल नातवाने, धनश्री केटरर्स आणि विजय स्टोअर्स या दोन्ही व्यवसायांत वेगाने प्रगती केली. धनश्री केटरर्सचा व्यवसाय, लग्न समारंभातील उत्तम भोजन व्यवस्थेसाठी नावाजला असून त्याला विलेपारल्यातील राजपुरीया बागसह मुंबईतिल चार – पाच अन्य लग्नाच्या सभागृहांचे मोनोपोली हक्क प्राप्त झाले आहेत. औरंगाबाद – रत्नागिरी – नाशिक – पुणे येईल मोठ्या लग्न समारंभाचे भोजन व्यवस्थापन, श्री पराग साठे, धनश्री केटरर्सच्या माध्यमातून आता करत आहेत. भाऊसाहेब – आण्णासाहेब आणि मनोहर साठे यांच्या कुटुंबाला अभिमान वाटेल अशीच ही यशाची चढती कमान आहे.

भाऊ साहेब आणि आण्णासाहेब साठे यांचा किराणा व्यापाराचा आणि ताज्या खाद्य पदार्थांच्या व्यवसायाचा वारसा

त्यांच्या दोन नातवांनी पुढे चालू ठेवला आहे. श्री मंदार साठे यांनी अंधेरीच्या विजयनगर सोसायटीत सुरु केलेले जोशीज खाऊघर हे दुकान अलीकडे दिवाळीत, हनुमान रोडवर स्वामी समर्थ मठाच्या बाजूला स्थलांतरीत केले आहे. दुसरा नातू श्री आमोद बेडेकर, सुप्रसिध्द मसालेवाले बेडेकर कुटुंबाचा एक सदस्य आहे. गिरगावात बेडेकर केटरर्स या केटरिंगच्या व्यवसायात यशस्वी वाटचाल करत आहे. योगायोग असा की हा लेख प्रकाशित होईल त्याच जानेवारी महिन्यात, सुभाष रोडवरील मराठा भुवन इमारतीत आमोदच्या मराठी आण्णा या नावाने सुरु होणाऱ्या दुकानात, विविध साऊथ इंडियन खाद्यपदार्थ, विलेपारल्यातील रसिक खवय्याची रसना तृप्ती करणार आहेत.

कर्तुत्ववान प्रभावी व्यक्ति आणि त्यांनी स्थापन केलेला व्यवसाय याना वेगळे काढणे शक्य नसते. सत्याऐंशी वर्षे जुन्या आणि विलेपारले उपनगराच्या बरोबरच विकसित होऊन प्रगत झालेले, अभूतपूर्व मासिकाच्या नव्या लेखमालेतील पहिले मराठी बलुतेदार विजय स्टोअर्सचे भाऊसाहेब साठे – आण्णासाहेब साठे आणि त्यांच्या पुढील पिढ्यांच्या यशाचा हा आलेख...!

--००--

विलेपारल्यातील बलुत २ / २

# श्री मधुकर जाधव आणि शशिकांत मेन्स सलून



विलेपारल्यातली त्या दिवसातली या गोष्ट आहेत ज्यावेळी आपल्या चाळीत किंवा वाडीत वळचणीच्या आसऱ्याला येणाऱ्या, न पाळलेल्या प्रत्येक कुत्र्याचे नाव मोती - खंड्या किंवा ब्लॅकी असायचे. किंवा वाडीतल्या भाटीने जन्माला घातलेल्या आठ-दहा पिल्लावर सगळी छोटी मुले जीवापाड प्रेम करायची. आपल्या चाळीतली सगळी मुलं एकत्र येऊन दिवाळीत किल्ले बनवायची, तऱ्हेतऱ्हेचे नक्षीदार कंदील सजवायची.

प्रत्येक घराचा दरवाजा उघडा असणाऱ्या त्या दिवसात, चाळी चाळीतून आणि वाड्यावाड्यातून शाळकरी मुलांचा आवाजी

लपंडाव रंगायचा. लपण्यासाठी नव्या जागा कशा शोधल्या त्या शोधकार्यावर चर्चा होत होत हा रंगलेला लपंडाव, सहजीवनाच्या आनंदाचा मेवा होता. कुमार – किशोर वयांत विलेपारल्यात बालपण सजलेल्या प्रत्येकाच्या या आठवणी, आता गंमतगाथा होऊन गेल्या आहेत. लांजेकर आणि मुसळूणकर सोनाराने कान टोचल्यावरच विलेपारल्यातील प्रत्येक बाळाचे खरे रडू फुटायचे. मुख्य म्हणजे मधूशेठ जाधव यांच्या केशकर्तन कौशल्याने प्रत्येक मुलाच्या जावळ आणि मौंजिबंधनाचा सोहळा संपन्न व्हायचा.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन – तीन दशकांपर्यंत पारंपरिक बलुतेदारीची ग्रामीण परंपरा महाराष्ट्रासह भारतात प्रचलित होती. तत्कालीन रत्नागिरी (सिंधुदुर्ग) जिल्ह्यातील गुहागर जवळच्या तळवली गावातील नाभिक व्यवसाय करणारे जाधव कुटुंब, पंचक्रोशीत परिचित असणारे एक बलुतेदार होते. न्हाविकाम अर्थात नाभिक व्यवसाय असलेल्या याच कुटुंबात १९१६ या वर्षी मधुकर शिवराम जाधव याचा जन्म झाला. या बाळाच्या जन्मदिवशी नियतीने लिहिलेले त्याच्या जीवनकार्याचे आलेख कोणीही वाचले असण्याची शक्यता नव्हती. वडिलांच्या अकाली मृत्युनंतर वयाच्या निव्वळ तेराव्या - चौदाव्या वर्षी,

मोठ्या भावाच्या मदतीने १९२९ - ३० सालात विलेपारल्यात आलेला मधुकर शिवराम जाधव नावाचा हा कुमार, पुढच्या फक्त तीस वर्षात, श्री मधूशेठ जाधव या नावाने, नव्याने वसणाऱ्या तत्कालीन विलेपारले उपनगरातील एक नामवंत बलुतेदार बनला होता. त्याच मधूशेठ जाधव आणि त्यांच्या ७७ वर्षे जुन्या शशिकांत मेन्स सलूनची, ही यशोगाथा.

तळवली गावामध्ये आणि पंचक्रोशीत नाभिक व्यावासातील जाधव कुटुंब जरी परिचित असले तरी घराची आर्थिक परिस्थिती बेताचीच होती. तत्कालीन प्रथेप्रमाणे प्रत्येक गावातील घरोघरी जाऊन किंवा गावातील मध्यवर्ती पारावर एखाद्या वड किंवा पिंपळाच्या झाडाखाली, आठवड्यातून एखाद्या दिवशी केशकर्तन आणि स्मश्रू (मिशीला आकार देणे) असे काम चालत असे. पंचक्रोशीतील मुलांचे जावळ – मुंज असे मंगल विधी असो किंवा घरातील वडिलधार्यांच्या मृत्युनंतर पुरुषांचे मुंडण असो, अशी सर्व परंपरागत कामे, मोठ्ठे बंधू केशव आणि काकांकडून शिकलेल्या मधुकर जाधव या किशोराने, विलेपारल्यात आल्यावर आपले अंगभूत कौशल्य वापरून काम करायचे ठरवले होते.

१९३०-४० हा कालावधी विलेपारले उपनगराच्या प्राथमिक जडणघडणीचा काळ होता. मुंबईत आल्यावर सुरुवातीची तीन – चार वर्षे उमेदवारी केल्यानंतर, मधुकरने तत्कालीन प्रथेनुसार घरोघरी जाऊन केशकर्तन सेवा देण्यास सुरुवात केली. त्या १९३० -४० या दिवसात केस कापण्यासाठी कुठलेही केशकर्तनालय अथवा सलून उपलब्ध नव्हते. घरोघरी जाऊन सेवा देण्याचे अनेक फायदे होते. स्नेहशील आणि गप्पिष्ट मधुकरचे, या काळात विलेपारल्यातील अनेक समवयस्क तरुणांशी मैत्र जमले होते.

आपल्या अनुभवातील प्रत्येक बलुतेदाराला, निसर्गदत्त गुणवत्ता प्राप्त झाली होती. १३ – १४ व्या वर्षी मुंबईत आलेल्या मधुकरचे शालेय शिक्षण झालेले नव्हते. मेहनती मधुकर सत्शील आणि प्रमाणिक होता. त्याच्या व्यवहारात सातत्य आणि नियमितपणा होता. वयाच्या पंचविशीतच केशकर्तन कलेचे कौशल्य त्याला अखंड सरावाने प्राप्त झाले होते. चतुर मधुकर आता आपल्या दुकानाचे स्वप्न पाहत होता. आधीच्या सर्व बालुतेदारांप्रमाणेच जात्याच हुशार आणि संवेदनशील मधुकर सामाजाभिमुख होता. एका जागी स्थिर होऊन केशकर्तन सेवा देता येईल असे आपले स्वतःचे दुकान असाये असे स्वप्न तो पहात

होता. त्याच्या हुन्नर आणि नेटक्या वृत्तीचा परिचय असलेल्या श्री गंगाराम पंड्या या गुजराती गृहस्थांनी, मधुकरला बिनव्याजी कर्ज देण्याची व्यवस्था केली आणि मधुकरचे दुकानाचे स्वप्न वास्तवात साकार झाले.




श्रद्धानंद रोडवरील श्रीराम मंदिराच्या अगदी सामोर, "शशिकांत मेन्स सलून" या नावाचा ऐटदार बोर्ड तुमचे लक्ष वेधून घेतो. हेच मधुकर जाधव या तरुणाचे १९४३ या वर्षी स्थापन झालेले पहिले दुकान. आज या दुकानाला ७७ वर्षे पूर्ण झाली आहेत. वयाच्या पंचविशीतच, मधुकर शिवराम जाधव या तरुणाला आता आदराने मधूशेठ आणि वडिलकीच्या भावनेने मधुभाई किंवा मधुकाका असे संबोधले जाऊ लागले. त्याला कारणही तसेच होते. माझ्या त्यावेळच्या रहात्या घरासमोरच मधुकाकांचे दुकान होते. हा लेख लिहिताना अगदी बालपासून प्रत्येक आठवणीचा पदर उलगडत जात होता आणि मधुकाका समोर दिसत होते. आत्ताची इमारत

होण्याआधीचे हे वखारिया हाऊस. अगदी सुरुवातीला श्रीराम मंदिरा समोरच्या बाजूसह दुकानाच्या चारी बाजूला नळीदार लोखंडी पत्रा आणि वरचे छत असे दृश्य आजही मला स्वच्छ दिसते आहे. दुकानाच्या अर्ध्या भागात खास पद्धतीच्या पाच खुर्च्या आणि मागे लावलेले लांब – रुंद आरसपानी आरसे. उरलेल्या अर्ध्याभागात वेटिंग लॉज. आज प्रचलित असलेला “वेटिंग लॉज” हा शब्द इथे वापरतोय कारण माधुकाकानी ही सोय सत्तर वर्षांपूर्वीच केली होती. ग्राहकांची नियमित वर्दळ असल्याने केस कापायला आल्यानंतर आपला नंबर येईपर्यंत वाट पहावी लागे त्यासाठी गादी लावलेल्या दोन लांब बाकांची व्यवस्था या “वेटिंग लॉज” मध्ये केलेली असे.

चौफेर पसरलेले हिंदी आणि इंग्लिश फिल्मफेअरचे आणि स्क्रीनचे सोबत रसरंग या मराठी साप्ताहिकांचे अंक ही त्या वेटिंग लॉजची विशेष लक्षात राहिलेली गोष्ट. अगदी खरे सांगतो...हिंदी सिनेसृष्टीचा त्रोटक चित्रमय परिचय “शशिकांतच्या” या वेटिंग लॉजमध्ये मला प्रथम झाला. आपला नंबर येईपर्यंत वाट पहाणाऱ्या ग्राहकांना गुंतवून ठेवण्याचे माधुकाकांचे मार्केटिंग कसब किती

प्रभावी होते त्याची जाणीव, त्या आठवणीचे पदर उलगडताना आज होते.

मधुकाका जाधव यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा जनसंपर्क, विजय स्टोअर्सच्या आण्णासाहेब साठे यांच्यासारखा समृद्ध होता. माणसांची पारख करण्याची दोघांचीही खास हातोटी होती. अप्पू हा मल्याळी गृहस्थ माधुकाकांचा जवळचा सहकारी कारागीर होता. मधुकाकांच्या अनुपस्थितीत अप्पुभाई दुकानाचे सर्व व्यवहार नेमकेपणे सांभाळत असत. त्याकाळात कॉंग्रेस पक्ष राजकारणात आणि त्याचे सेवादल समाजकारणात अग्रेसर होते. संवेदनशील आणि समाजाभिमुख असलेले मधुकाका अगदी तरुण वयांत या दोन्ही चळवळीत सामील झाले होते. त्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात ते नगरसेवक म्हणून निवडून सुद्धा आले होते. अशा असंख्य सामाजिक कामात व्यस्त असले तरी त्यांचे "शशिकांतमध्ये" येणे नियमित असे.

दुकानात शिरल्यावर डाव्या हाताची पहिली खुर्ची मधुकाकांची आवडती होती. मी त्याना नेहेमीच या पहिल्या खुर्चीत ग्राहकांचे केस कापताना पाहिले आहे. केस कापताना एकाचवेळी अन्य खुर्च्यांवर केस कापायला बसलेल्या ग्राहकांशी त्यांचा संवाद

सुरूच असे. ज्यावेळी अप्पुभाई त्या खुर्चीवरच्या ग्राहकाचे केस कापताना दिसत त्यावेळी मधुकाका दुकानात नाहीत याची जाणीव होत असे. माझ्या स्मरणात राहिलेली त्याकाळात अनुभवलेली दुसरी गोष्ट म्हणजे काही आग्रही ग्राहकांचा संयम अर्थात मधुकाकांना मिळालेली ब्रॅंड लॉयल्टी. श्री शामराव गोडबोले हे माझ्या आईच्या चुलत बहिणीचे यजमान, माधुकाकांचे घनिष्ट स्नेही होते. मधुकाकाना यायला वेळ लागणार आहे असे अप्पुभाईनी सांगितले की शामराव समोरच असलेल्या आमच्या घरी येत असत. त्यांच्या अंतापर्यंत शामरावांनी मधुकाकांशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही केस कापून घेतले नाहीत हे माझ्या स्मृतीत कायम नोंदले गेले आहे.

श्री शामराव गोडबोल्यासारखे अनेक ग्राहक मधुकाकांची आग्रहाने आणि संयमाने वाट पाहताना मी पाहिले आहेत. मधुकाकांचे समकालीन समवयस्क तरुण स्नेही नंतरच्या काळांत नामवंत – कीर्तिवंत नागरिक झाले. माननीय श्री पु ल देशपांडे – डॉ धुरंधर – धुरंधर वकील – राम मंदिरातले पुजारी खरेशास्त्री – समोरच्या डोंगरे बंगल्यातले भिडेशास्त्री – विजय स्टोअर्सचे भाऊसाहेब आणि आण्णासाहेब साठे हे बंधूद्वय आणि माझे वडील दिनकर फडके ही मधुकाकांच्या समृद्ध लोकसंग्रहातली काही नावे.

मधुकाका आणि त्यांच्या पिढीतल्या अनेकांनी या जगाचा निरोप घेतला आहे. मात्र जगनमित्र मधुकाकांच्या स्नेहभाव आणि आपुलकीमुळे हे सर्व आणि अन्य असंख्य सुर्हूद, अंतापर्यंत त्यांच्या कायम संपर्कात राहिले.

उद्यमशील मधूशेठ जाधव यांच्या व्यवसायाचा विस्तार त्यांच्या पहिल्या दुकानानंतर खूप वेगाने झाला. विसाव्या शतकाच्या पाचव्या - सहाव्या दशकात विलेपारल्यात अनेक सहकारी निवासी संकुलांची निर्मिती झाली होती. नागरिकांची वाढणारी वस्ती आणि त्यानुसार त्यांच्या वैयक्तिक गरजांची जाणीव माधुकाकाना निश्चितपणे होती. पार्लेश्वर मंदिरा समोरच्या जोशी वाडीत - आत्ताच्या अल्फा इमारतीत - १९४८ मध्ये शशिकांत हेअर कटिंग सलूनची दुसरी शाखा सुरु झाली. त्या मागोमाग नेहरू रोडवर विलेपारले रेल्वे स्टेशन समोर – सध्याच्या शबरी हॉटेल समोर – १९५१ मधे तिसरी शाखा सुरु झाली.

शशिकांत मेन्स सलून या नावातले शशिकांत हे मधुकाकांचे सर्वात मोठे सुपुत्र. आज वयाची ऐंशी वर्ष पार केलेले शशिभाई निरंतर उत्साहाने आपल्या पिढीजात व्यवसायांत आणि

त्याबरोबरच स्वतःच्या व्यवसायात व्यस्त आहेत. माधुकाकांच्या शिस्तीत वाढलेल्या शशिभाई आणि त्यांच्या सर्व भावांनी आपल्या वडिलांनी स्थापन केलेल्या व्यवसायाची संस्कृती आजही कशी जपली आहे त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. सतत ग्राहकांची वर्दळ असलेल्या केशकर्तनालयात जमिनीवर पडलेले केस प्रत्येक तासाला साफ करावे लागतात. स्वतः मधुकाका आणि त्या नंतर शशिभाई – बच्चूभाई – अशोक – सुभाष – लक्ष्मीकांत आणि पूर्णचंद्र या पुढच्या पिढीतील आणि त्यानंतर तिसऱ्या पिढीतील सर्व सदस्य हे स्वच्छतेचे काम आजही तितक्याच निगुतीने करताना दिसतात. पोटापाण्याच्या व्यावासायाप्रतीची ही बांधीकली, प्रत्येक तरुण व्यावसायिकाचा आदर्श व्हायला हवी. मधुकाकांच्या पुढच्या पिढीतील प्रत्येक सदस्य आपापल्या क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. हीच ती विलेपारल्याची DNA संस्कृती.

कॉंग्रेस आणि सेवादलाच्या कामात सहभागी झालेल्या मधुकाकांची समाजाप्रती बांधिलकी खूप प्रखर होती. १९४०/५० च्या सुमारास विलेपारल्यात वीज उपलब्ध झाली होती तरी ती प्रत्येक घरात आली नव्हती त्यामुळे घराघरात तेलाचे दिवे असत.

आपल्या केशकर्तनालयात मधुकाकानी विजेचे कनेक्शन घेतले होते. दुकानाचे काम संपल्यानंतर मधुकाकांनी तिथे रात्र शाळा चालू केली होती. त्यांचे स्नेही आबा सहस्रबुद्धे आणि  अनुभवी वरिष्ठ शिक्षक मधुकर भावे मास्तर हे दोघे, गरजू विद्यार्थ्यांचा गणित आणि इंग्लिश भाषेचा अभ्यास घेत असत.

विलेपारल्याच्या प्राथमिक जडणघडणीत सहभागी असलेल्या किंबहुना विलेपारल्याच्या DNA चे घटक असलेल्या उद्यमशील आणि कार्तबगार बलुतेदारांच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांच्या निसर्गदत्त गुणवत्तांचा, त्यांनी सरावाने प्राप्त करून घेतलेल्या व्यवस्थापन कौशल्याचा आणि त्यांच्या समाजाभिमुख कामाचा परिचय, विलेपारल्यातील बलुतेदारांच्या या लेखमालेमध्ये विशेष विस्ताराने करून दिला जातो आहे. याचे कारण एकच – "उद्यम हे नाम आणि उद्यमशील हे विशेषण" हे एकच रसायन असते. विलेपारल्यातील संस्कृतीवर प्रभाव टाकणारा हा आपला दुसरा मराठी बलुतेदार, श्री मधुशेठ जाधव. त्यांच्या पुढील पिढ्यातील व्यावसायिकांना अनेकानेक शुभेच्छा...!

--oo--

विलेपारल्यातील बलुत २ / ३

# भोगले परिवार आणि
# जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो प्रा. ली.



श्री दिलीपभाई भोगले

वर्ष १९०६ मधे झालेल्या विलेपारले रेल्वे स्थानकाच्या स्थापनेच्या साधरण २५ वर्षांनंतर, १९३०/३२ या दोन वर्षात, विलेपारल्यासह पश्चिम रेल्वेच्या उपनगर सेवेचे विद्युतीकरण झाले आणि उपनगर रेल्वे विजेवर धावू लागली. याच साधारण १९३५ ते १९५० या काळांत, विलेपारले पूर्व उपनगरातील नागरी वस्ती स्थिरावली होती. आज विलेपारले उपनगराच्या दोन प्रमुख जीवन वाहिन्या असलेल्या पारले टिळक विद्यालय या शिक्षण संस्थेची स्थापना १९२१ मधे आणि लोकमान्य सेवा संघ, पारले या सामाजिक – सांस्कृतिक संस्थेची स्थापना १९२३ मधे झाली होती. समाज जीवनातील शिक्षण – सामाजिक मूल्य – सांस्कृतिक मूल्य

यांची निश्चित बांधणी करणाऱ्या या घटनांचा आढावा अशासाठी घेणे आवश्यक आहे कारण त्यातूनच, चतुर – उद्योजक नागरिकांनी, जीवनावश्यक वस्तू आणि दैनंदिन गरजा पुरवणाऱ्या व्यवसाय आणि उद्योगांची निर्मिती केली.

कपडे शिलाई – वाण सामान – पेन-पेन्सिल-वह्या-पुस्तके – स्वयंपाकघरातील वस्तू-भांडी-शेगडी दुरुस्ती – दूध-फरसाण अशा असंख्य व्यवसाय – उद्योगांची सुरुवात, हे या विकसित होऊन सतत बदलत्या समाज जीवनाचे पडसाद होते. विलेपारल्यातील अशा अनेक उद्योजक - व्यवसायिक बलुतेदारांचा परिचय आपण या लेखमालेतून करून घेतला आहे. विलेपारले पूर्व रेल्वे स्टेशन पासून ते गोखल्यांचे श्रीराम मंदिर या पायी चालत जाण्यासारख्या परिसरात प्रामुख्याने याच साधारण १९३५ ते १९५० या काळांत असंख्य बलुतेदारांनी आपले छोटेसे व्यवसाय सुरु केले होते. विलेपारले पूर्व रेल्वे स्टेशन परिसरातील आजच्या प्रगत झालेल्या बाजाराची ही प्राथमिक मांडणी होती.

आधीच्या अनेक लेखात वर्णन केल्याप्रमाणे, १८९० ते १९३० या साधारण चाळीस वर्षांच्या काळात इथे येऊन स्थायिक

झालेली बहुतांशी चाकरमानी मराठी कुटुंब, काही सन्मान्य अपवाद वगळता, कुलाबा – रत्नागिरी अशा कोकण परिसरातून आणि त्यापलीकडील वेंगुर्ला-कुडाळ—मालवण आणि गोवा या प्रदेशातून आलेली होती. पुढच्या शिक्षणासाठी किंवा चरितार्थासाठी, मुंबईला रहाणाऱ्या मामाकडे-काकांकडे-मावशीकडे-आत्याकडे-मोठ्या भावाकडे अथवा मोठ्या बहिणीकडे जायचे अशा जिवलग नात्यातून, या कुटुंबांच्या मागोमाग त्यांचे अन्य सगे-सोयरे विलेपार्ल्यात आले होते.

सातवीपर्यंत शालेय शिक्षण झालेले श्री मारुती भोगले, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आपल्या मसुरे या गावातून १९४० च्या सुमारास आपली सहचारिणी सुमतीबाई यांच्यासह मुंबईत दाखल झाले होते. आजच्या सुभाष रोडवरील त्याकाळात असलेल्या साटम वाडीत, वेंगुर्ला - कुडाळ – मालवण परिसरातून आलेल्या नागरिकांची वस्ती होती. दहा बाय दहाच्या २५ /२८ खोल्यांतिल बिऱ्हाडांनी साटमवाडी गजबजलेली होती. १९४८ मधे श्री मारुती भोगले, पत्नी सुमतीबाई यांच्यासह विलेपारल्यात या साटम वाडीत स्थायिक झाले.

प्रत्येक चाकरमानी मराठी तरुणाप्रमाणे, मुंबईत दाखल झाल्यावर, मारुती भोगले यांना तात्काळ कोहिनूर मिलमधे नोकरी मिळाली. मिलमधे काही काळ काम केल्यावर भोगले यांची पोलीस खात्यात वर्णी लागली. सौम्य स्वभावाच्या मारुती भोगले यांना पोलिसी बाणा फार काळ रुचला नाही आणि त्यांनी पोलीस खात्याचा राजीनामा दिला. १९४७ च्या आधीच्या त्या काळात, प्रत्येक तरुण – तरुणी स्वातंत्र्याच्या अपेक्षेने भारलेली होती. मारुती भोगले या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले. १९४७ मधे भारत स्वतंत्र झाला आणि प्रत्येक भारतीयाचे अवकाश मोठे झाले. श्रद्धानंद रोड आणि नेहरू रोडच्या चौकाला स्वातंत्र्यसैनिक श्री मारुती भोगले यांचे नाव दिले गेले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या या काळांत, तरुण मारुतीराव भोगले यांनी एक धाडसी निर्णय घेतला. अगदी सुरुवातीला भाजी विक्रीचि सुरुवात झाली आणि मग श्रद्धानंद रोडवरील गोखल्यांच्या श्रीराम मंदिरासमोर त्यांनी एक छोटी जागा भाड्याने घेतली. त्यांचे परिचित श्री चिपळूणकर आणि भोगले मास्तर शाळेमधे शिक्षक होते. भोगले मास्तरांचे लिमलेटच्या गोळया आणि चॉकलेटचे छोटेसे दुकान होते मात्र शाळेच्या वेळा सांभाळून दुकानाचा व्यवसाय

करणे त्याना अडचणीचे ठरत होते. श्री चिपळूणकरांच्या सल्ल्यानुसार भोगले यांनी लिमलेटच्या गोळया आणि चॉकलेटचे छोटेसे दुकान चालवायला घेतले. १९३७ या वर्षी विलेपारल्याची मंडई सुरु झाली होती त्याच्या अगदी समोर गोखालेवाडीत म्हणजे आत्ताच्या साठे कम्पाउंडमधे सहजीवनमधे असलेल्या छोट्या दुकानात भोगल्यांचा व्यवसाय सुरु झाला.

आपला प्रत्येक बलुतेदार निसर्गदत्त उद्यमशील आणि संवेदनशील विचार घेऊन प्रगत झाला आहे. १९४७ ते १९५० या काळांत विलेपारल्यात ब्राह्मण समाजाची वस्ती मोठी होती. हा समाज चतुर आणि व्यवहारी होता, आजही आहे. कोंकण परीसरातून मुंबईत आलेले असल्याने स्वयंपाकातील नारळाच्या ओल्या खोबऱ्याचा वापर, प्रत्येक कुटुंबात अनिवार्य होता. मारुती भोगल्यानी याचा अभ्यास केला आणि लिमलेटच्या गोळया आणि चॉकलेट बरोबरच ताज्या फोडलेल्या नारळाची अर्धी वाटी विकायला सुरुवात केली. ज्याकाळात फ्रीजची सुविधा उपलब्ध नव्हती त्या काळांत हा नारळाची अर्धी वाटी विकायचा त्यांचा प्रयोग खूपच यशस्वी झाला. या बरोबरच कोंकणातील कुळथाचे पीठ आणि ताजी आमसुले आता दुकानात उपलब्ध झाली होती.

आता दुकानात पेन-पेन्सिली-वह्या-पुस्तके रंगीत कागद असे शालोपयोगी साहित्य विक्रीला ठेवावे या चिपळूणकर मास्तरांच्या सल्ल्याने अशा वस्तूंची विक्री हळूहळू सुरु झाली. आजच्या नामांकित अशा एका यशस्वी व्यवसायाची, जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो प्रा लिमिटेड, या भोगले कुटुंबाच्या प्रगती आणि यशाकडे केलेल्या वाटचालीचे पहिले पाऊल होते. या सर्व प्रगतीच्या काळांत, श्री मारुती भोगले यांच्या पत्नी सुमतीबाई खंबीरपणे त्यांच्या मागे उभ्या होत्या. स्वतःचे दुकान व्हावे म्हणून दोन हजार रुपये जमवण्याचे प्रयत्न निष्फळ ठरू लागले होते त्यावेळी पत्नी सुमतीबाईनी आपले सोन्याचे दागिने त्यांच्या हातात ठेवले आणि कुटुंबाच्या पुढील प्रगतीची वाट मोकळी केली होती.



श्री दिलीपभाई भोगले

१९४७ मधे दुकान सुरु केले असले तरी १९५० मधे हे दुकान त्यांनी विकत घेतले. स्वातंत्र्य चळवळीत असलेल्या सहभागाचा प्रभाव इतका होता की तत्कालीन पहिले पंतप्रधान श्री जवाहरलाल नेहरू यांचे जवाहर हे नाव दुकानाला दिले गेले. दुकानाच्या उजव्याबाजूला भाऊसाहेब आणि आण्णासाहेब साठे यांचे १९३७ मधे स्थापन झालेले यशस्वी विजय स्टोअर्स आणि डावीकडे १९५० मधे जवाहर स्टोअर्स बरोबरच सुरु झालेले गोहिल केमिस्ट हे दुकान आणि मुसाभाईचे स्टोव रिपेअरिंग चे दुकान असे शेजारील हे सर्व व्यवसाय वेगाने प्रगत झाले.  मारुतीरावांचा मोठा मुलगा मोहन भोगले, अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाला आणि लगेचच दुकानात वडिलांच्या मदतीला आला. आता मोहनभाईंच्या मदतीने दुकानातील विक्रीसाठी शालोपयोगी असंख्य वस्तूंची भर पडली. मारुतीरावांचा दुसरा मुलगा, त्यावेळी सातवी इयत्तेत शिकणारा दिलीप, मोठाभाऊ मोहनभाई बरोबर त्याचवेळी दुकानात मदतीला येवू लागला होता.

राष्ट्रीय सण – चातुर्मास – गणेशोत्सव – दिवाळी अशा वर्षभरातील प्रत्येक उत्सवाच्यावेळी आवश्यक चिवडा-लाडू-पेढे-श्रीखंड-जिलेबी अशा ताज्या पदार्थांची विक्री ही विजय

स्टोअर्सची संस्कृती होती. शाळेची उन्हाळी सुट्टी संपली की पुस्तक – वह्या – कंपास विक्री, गणेशोत्सवात मखर आणि सजावटीचे सामान आणि दिवाळीत फटाके विक्री ही जवाहार स्टोअर्स या दुकानांची संस्कृती होती. मात्र कालांतराने बदलत्या समाजजीवन आणि परिस्थितीनुसार यात फरक पडला आहे. या दीर्घ प्रयत्नाने प्रगत झालेल्या मोसमानुसार बदलणाऱ्या विक्री संस्कृतीचा मी शाळेतल्या दिवसांपासून साक्षीदार आहे.

**जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो.**



श्रद्धानंद रोडवरील आपल्या दुकानाच्या बाजूला भरणारी साहित्य जत्रा हे जवाहर स्टोअर्सचे एक खास वैशिष्ट्या होते आणि विलेपारल्याच्या साहित्य संस्कृतीचे वैभव होते. अगदी अलीकडे, लोकमान्य सेवा संघ, पारले आणि मॅजेस्टिक बुक डेपो प्रस्तुत

मॅजेस्टिक गप्पा आणि पुस्तक विक्री असा दहा दिवसाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. पूर्वी गप्पांचा हा कार्यक्रम जानेवारी महिन्यात सादर होत असे. त्याच्या आधी डिसेंबर महिन्यात होणारी जवाहर स्टोअर्सची साहित्य जत्रा, सलग ३३ वर्षे सादर झाली. यात अनेक नामवंत लेखक – कलावंत – प्रकाशक सहभागी होत असत. काही अपरिहार्य कारणामुळे २०१५ या वर्षात ही साहित्य जत्रा भरवणे बंद करावे लागले.

मारुतीरावांच्या पुढील पिढीतील सर्व कर्तुत्ववान आहेत. मोठा मुलगा मोहन भोगलेयांनी, अकरावी नंतर वडिलांच्या बरोबर जवाहार स्टोअर्समधे कामाला सुरुवात केली. मोहनभाईंच्या संकल्पनेतून अनेक प्रकाशकांची पुस्तके दुकानात विक्रीला उपलब्ध झाली होती. नंतरच्या काळात आपल्याला हवे ते पुस्तक निश्चित आणि सहज उपलब्ध होण्याचे जवाहर स्टोअर्स हे ठिकाण बनले. इथूनच पुढे मॅजेस्टिक बुक डेपोच्या कै श्री आण्णासाहेब कोठावळे यांच्या सहकार्याने साहित्य जत्रा सुरु झाली. या बरोबरच धाडसी मोहन भाईनी, मुंबईच्या जवळच्या परिसरात बंगले प्लॉट स्कीम सुरु केली. या व्यवसायांत त्यांना फार मोठे यश मिळाले. १९९० मधे नंदा पातकर रोडवर त्यांनी समर हार्वेस्ट हे मोठे हॉटेल

सुरु केले. उपनगरातील एक नामांकित हॉटेल म्हणून समर हार्वेस्ट आज ओळखले जाते. दुर्दैवाने मोहनभाई अल्पायुषी ठरले. आज त्यांचा मुलगा मिथिल समर हार्वेस्टचे व्यवस्थापन पहात आहे. दिलीपभाईंचे धाकटे बंधू श्री चंद्रशेखर भोगले यांनी गिरगावात आपले पुस्तकाचे दुकान सुरु केले होते. कालांतराने ते दुकान बोरीवलीमधे स्थलांतरित झाले. दुर्दैवाने श्री चंद्रशेखर भोगले अल्पायुषी ठरले. मारुतुराव भोगले यांच्या तिसऱ्या पिढीतील सर्वच तरुण – तरुणी उच्चशिक्षण घेऊन आपापल्या क्षेत्रात यशस्वी झाले आहेत.

श्री मारुती भोगले यांचे दुसरे चिरंजीव श्री दिलीपभाई भोगले. वयाच्या पंधराव्या वर्षी, वडिलांच्या मार्गदर्शनाखाली दुकानात उमेदवारी सुरु केलेले दिलीपभाई पुस्तकांच्या गराड्यात, एका छोट्याशा खुर्चीत मान खाली घालून तल्लीनतेने काही नोंदी करताना बसलेले दिसतात.आणि धाकटे बंधू दीपक नेहेमी काऊंटरवर व्यस्त असताट. आज जवाहर स्टोअर्सचे हे दोघे आधारस्तंभ आहेत.

जगन्मित्र असलेले अगत्यशील दिलीपभाई भोगले, विलेपारल्यातील असंख्य संस्थांमध्ये कार्यारत आहेत. लोकमान्य सेवा संघाच्या ग्रंथालय शाखेबरोबर त्यांचा बालजल्लोष हा शालेय विद्यार्थ्यांसाठीचा उन्हाळी सुट्टीतल कार्यक्रम, पालक आणि विद्यार्थ्यांसाठी खूप मोठे आकर्षण होते. विजय स्टोअर्सच्या आण्णासाहेब साठे यांच्या पश्चात कान्देनवमिचा स्नेहमिलन कार्यक्रम दिलीपभाईनी अन्य सुर्हुदांच्या सहकार्याने पुढे चालू ठेवला आहे. या स्नेहमिलन कार्यक्रमाने विलेपारल्याच्या समाज जीवनात एक आगळी परंपरा निर्माण केली आहे.

विलेपारल्याच्या शैक्षणिक - साहित्यिक - सांस्कृतिक जीवनात जवाहर स्टोअर्स आणि बुक डेपो प्रा लिमिटेड हे दुकान आणि सर्व भोगले कुटुंबीय एका महत्वाचा DNA घटक आहेत. यांच्या भविष्यातील प्रगतीसाठी अनेकानेक शुभेच्छा.

--oo--

विलेपारल्यातील बलुत २ / ४

# श्री अप्पासाहेब जोगळेकर आणि जीवन रेस्टॉरंट


श्री आप्पासाहेब जोगळेकर

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातले जांभूळपाडा हे गाव आज सुपरिचित झाले आहे. वासुदेव विठ्ठल जोगळेकर याचा जन्म १९३२ मधे याच जांभूळपाडा गावात झाला. गावातली शाळा चवथ्या इयत्तेपर्यंतच होती त्यामुळे तत्कालीन शिरस्त्याप्रमाणे वासुदेवने पुढील शिक्षणासाठी मुंबईची वाट धरली. मोठ्या बहिणीकडे ग्रँटरोडला राहायला आल्यानंतर, गिरगावातील जगन्नाथ शंकरशेट रोडवरच्या आर्यन हायस्कूलमधे वासुदेवाचे पुढील शिक्षण पूर्ण झाले. कालांतराने काही दिवस माटुंग्याच्या लोकमान्य सोसायटीत आणि १९४६ मधे बहिणीचे कुटुंब विलेपारल्यात स्थाईक झाले. असे स्थलांतर झाले तरी १९४९ मधे मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण

होईपर्यंत, वासुदेव गिरगावातील आर्यन हायस्कूल मधेच जात असे.

हे वर्णन, त्याकाळात शाळेत जाणाऱ्या विलेपारल्यातील प्रत्येक तरुणाचे असावे इतके ते सर्वसामान्य होते. विलेपारले गावाची जडणघडण होत असतानाच्या १८९० ते १९४० या साधारण पन्नास वर्षांच्या काळात इथे येऊन स्थायिक झालेली बहुतांशी चाकरमानी मराठी कुटुंब, काही सन्मान्य अपवाद वगळता, कुलाबा – रत्नागिरी अशा कोकण परिसरातून आणि त्यापलीकडील वेंगुर्ला---कुडाळ—मालवण आणि गोवा या प्रदेशातून आलेली होती. पुढच्या शिक्षणासाठी किंवा चरितार्थासाठी, मुंबईला रहाणाऱ्या मामाकडे-काकांकडे-मावशीकडे-आत्याकडे-मोठ्या भावाकडे अथवा मोठ्या बहिणीकडे जायचे अशा जिवलग नात्यातून, या कुटुंबांच्या मागोमाग त्यांचे अन्य सगे-सोयरे विलेपारल्यात आले होते. वासुदेवसुद्धा, बहिणीकडे रहाणारा असाच एक शाळकरी मुलगा होता.

आज यशस्वी झालेल्या बलुतेदारांच्या प्रगती आणि यशाचा आलेख मांडताना दोन पातळ्यांवर त्याचे विश्लेषण करणे मला आवश्यक वाटते आहे. कारण या लेखात विलेपारले या उपनगराच्या जडणघडणीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण (Objective) आणि त्याचबरोबर प्रत्येक बलूतेदाराच्या प्रगतीचे, व्यक्तिमत्वानुसार व्यक्तीनिष्ठ विश्लेषण (Subjective) आहे. अशा प्रत्येक बलुतेदाराचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे निसर्गदत्त – उपजत गुणवत्ता (Natural Gifts) आणि दुसरे वैशिष्ट्य म्हणजे प्रयत्न आणि अनुभव यातून प्राप्त झालेले ज्ञान (Acquired skills). मला फक्त व्यवसाय करायचा आहे अशी उद्यमशील वृत्ती – संवेदनशील मन – दुसऱ्यांच्या भावना आणि स्वभावधर्म ओळखण्याचे निसर्गदत्त कसब – प्रयत्नवाद – सातत्य – नियमितपणा – वक्तशीरपणा – दूरदृष्टी -- समाजाच्या नेमक्या गरजा ओळखण्याची हातोटी – निर्णयक्षमता – स्पर्धेत टिकून राहण्याची जिद्द या सगळ्या एखाद्या यशस्वी उद्योजकाच्या निसर्गदत्त गुणवत्ता आहेत (Natural Gifts). याउलट उद्यमशीलवृत्तीने, कुठलाही अनुभव नसताना निव्वळ निरीक्षण आणि अभ्यास यातून घेतलेले निर्णय – संयम – आपल्या व्यवसायाच्या विषयाची पूर्ण ओळख करून घेताना नवे काही शिकण्याची तयारी – चुकलेले निर्णय समजून घेऊन नवे प्रयत्न करायची स्वयंप्रेरणा हे सर्व म्हणजे निरीक्षण,

विश्लेषण आणि अनुभव यातून प्राप्त झालेले ज्ञान आहे (Acquired skills).

वासुदेवाचे शालेय शिक्षण पूर्ण झाले त्यानंतर मुलाने नोकरी करणे ही त्या काळातली प्रचलित प्रथा होती, कुटुंबासाठी गरजही होती. मात्र वासुदेवाला नोकरीची जी पहिली संधी मिळाली, ती त्याच्या भविष्यावर प्रभाव पाडणारी ठरली. भाऊसाहेब साठे यांच्या विजय स्टोअर्स मधील १९४९ ते १९५१ अशी दीड वर्षे केलेली नोकरी हा त्याच्या उमेदवारीचा काळ होता. आजच्या शब्दात सांगायचे झाले तर, सत्तर वर्षांपूर्वी, भविष्यातील एका उद्योजकासाठी ती नोकरी नव्हे तर जणू ती अप्रेंटीसशिप होती.

आपला स्वतःचा व्यवसाय करायचा आहे या एका ध्येयाने सतत स्वयंप्रेरणा मिळत होती आणि ती ऊर्जा स्वस्थ बसू देत नव्हती. त्यावेळी, विलेपारले रेल्वे स्टेशनच्या पूर्वेला तेजपाल रोडवर अगदी समोरच कांबळी वाडीमधे नार्वेकर नावाच्या गृहस्थाचे छोटेसे भारत हिंदू हॉटेल होते. आत्ताचे रामकृष्ण हॉटेल त्याकाळात मद्रास कॅफे या नावाने ओळखले जात असे. त्याच्या अगदी बाजूचे हे भारत हिंदू हॉटेल. ते विकायचे आहे हे लक्षात

आल्यावर वासूदेवने चौकशी सुरु केली आणि त्या जागेसकट हे छोटेसे हॉटेल त्याने १९५१ मधे विकत घेतले. चहा – गरमागरम भजी – बटाटे वडे इतकेच मोजके न्याहारीचे पदार्थ त्यावेळी या हॉटेलात मिळत असत. वासुदेव विठ्ठल जोगळेकर या फक्त १९ वर्षाच्या तरुणाचे, त्या काळात हे मोठेच धाडस होते.

याला धाडस अशासाठी म्हणावे कारण या तरुणाचे वय फक्त १९ वर्षाचे होते. हॉटेल व्यवसायातला कुठलाही अनुभव गाठीशी नाही आणि मोठे आर्थिक पाठबळ उपलब्ध नाही ही या तरुणाची पार्श्वभूमी होती. निसर्गदत्त उद्यमशील धारणा - ऊर्जा आणि विजय स्टोअर्समधे माननीय श्री भाऊसाहेब साठे यांच्याकडून मिळालेले शिस्तीचे धडे आणि व्यवहार चातुर्य या मात्र या तरुणाच्या दोन जमेच्या बाजू होत्या. आपल्या सर्वच बलुतेदारांप्रमाणे, संवेदनशील वासुदेव जोगळेकरचा, तत्कालीन विलेपारल्यातील समाजाचा आणि त्यांच्या गरजांचा आभ्यास त्या त्या काळांत निश्चितपणे झाला असावा. भारत हिंदू हॉटेलचे नामकरण आता जीवन हॉटेल असे झाले होते. स्थापने पासून पुढील चार वर्षांत १९५५ पर्यंत, या हॉटेलचा व्यवसाय थोडासा स्थिरावला होता.




जीवन हॉटेल

शिक्षण संपून नुकतीच नोकरी लागलेल्या आणि शालेय शिक्षणासाठी विलेपारल्यात रहाणाऱ्या किंवा शिक्षण चालू असताना नोकरी करणाऱ्या तरुणांची संख्या त्या काळांत मोठी होती. त्यातले अनेकजण एकटे रहात असल्याने, सकाळी आणि संध्याकाळी न्याहारी आणि मराठी पद्धतीच्या जेवणाची त्यांची गरज होती. १९५५ पासून जीवन हॉटेल मधे न्याहारीचे ताजे मराठी पदार्थ आणि जेवणाची थाळी उपलब्ध झाली होती. वाचून कदाचित आश्चर्य वाटेल परंतु त्याकाळात ही थाळी फक्त सहा आण्यात मिळत होती. मात्र याला एक शिस्त होती. न्याहारीचे पदार्थ सकाळी अकरा वाजे पर्यंतच आणि थाळी सकाळी अकरा ते दुपारी एक वाजेपर्यंत मिळत असे. दुपारी चार नंतर पुन्हा

न्याहारीचे पदार्थ आणि संध्याकाळी सात नंतर पुन्हा जेवणाची थाळी. रविवारी सकाळी मिष्टान्न थाळी म्हणजे त्यात एक गोडाचा पदार्थ असे, मात्र रविवारी संध्याकाळी थाळी मिळत नसे. नियमित जेवायला येणाऱ्या ग्राहकांसाठी एक महिन्याची कुपन पद्धत उपलब्ध होती. जीवन हॉटेलच्या सुरुवातीच्या त्या काळात, खास मराठमोळया खानावळीच्या व्यवहाराचा प्रभाव जास्त असावा.

१९५५ ते १९७० हा, जीवन हॉटेलच्या वेगवान प्रगतीचा काळ होता. आधी उल्लेख केलेल्या हॉटेलच्या वेळांमधे हळूहळू बदल झाला. न्याहारीचे पदार्थ म्हणजे स्नॅक्स आयटेम मधे खूप वैविध्य आले आणि जेवणाच्या थाळीसह ते पदार्थ दिवसभर उपलब्ध झाले. मराठी पदार्थ होतेच पण आता त्यात साऊथ इंडियन आणि पंजाबी पदार्थांची भर पडली होती. त्या थाळीचे वैशिष्ट्य, काळ बदलला तरी आजही जपले गेले आहे. आता हॉटेलची जागा अपुरी पडू लागली होती आणि त्यामुळे अगदी शेजारच्या दुकानाचा गाळा विकत घेऊन जीवन हॉटेलचा विस्तार झाला होता. पहिल्या मजल्यावरचि जागा सुद्धा आता वापरासाठी उपलब्ध झाली होती. अलीकडे हॉटेलच्या मागील बाजूची जागा घेऊन जीवन हॉटेलचा मोठा विस्तार झाला आहे. गेली सत्तर वर्षे

स्पर्धेमधे टिकून रहाणे आणि विशेषतः विलेपारल्यातील चिकित्सक नागरिकांची रसनातृप्ती अव्याहत सुरु ठेवणे हे आप्पासाहेबांच्या जीवन रेस्टॉरंटचे व्यवसायातले मोठेच यश आहे.

श्री वासुदेव विठ्ठल जोगळेकर या विलेपारल्यातील तरुण उद्योजकाला आता आदर आणि सन्मानाने आप्पासाहेब जोगळेकर असे संबोधित केले जाऊ लागले होते. हा दूरदृष्टी असलेला चतुर व्यवहारी उद्योजक, आदर्शवादी आहे. मनुष्य स्वभावाची आणि त्याच्या गुणवत्तेची पारख हे आप्पासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे त्यांच्या कारकिर्दीचे आणि मिळालेल्या यशाचे वैशिष्ट्य आहे. अगदी नेमके बोलणाऱ्या सौम्य स्वभावाच्या आप्पासाहेबांचा आत्मविश्वास हे त्यांचे दुसरे वैशिष्ट्य. आप्पासाहेबांच्या निखळ आणि पारदर्शक माणुसकीचा परीचय आपल्याला नक्कीच झाला आहे आणि त्याचा अनुभवसुद्धा आपण घेतला आहे. व्यवसायांत यशस्वी होत असताना, आप्पासाहेबांनी त्यांच्या तरुण वयांत अनेक तरुणांच्या पालन पोषण आणि शिक्षणाची जबाबदारी स्वयंप्रेरणेने स्वीकारली होती. यासाठी त्यांच्या कुटुंबियांची मिळालेली साथ फार महत्वाची होती आणि आजही आहे.

नंतरच्या काळांत यातील अनेक विद्यार्थी खूप यशस्वी झाले आणि त्यांचे कुटुंबीय आजही यासाठी कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात.

कुटुंबाने आणि समाजाने नाकारलेल्या, व्यसनात फसलेल्या अनेक नागरिकाना, आप्पासाहेबांनी आधार दिला. हॉटेलातील कॅशियरचि आणि व्यवस्थापकाची महत्वाची जबाबदारी देऊन त्यां नागरिकांना आत्मविश्वास दिला. त्यांना व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवला. वर उल्लेख केलेला हाच तो आप्पासाहेबांचा आत्मविश्वास, जो त्यांनी दुर्बल व्यक्तीना सबल होण्यासाठी दिला.

पारले टिळक विद्यालयातील कॅन्टीनमध्ये मिळणारा समोसा आणि बटाटेवडा यावर विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या पोसल्या गेल्या आहेत. प्रत्यक्षात हे कॅन्टीन आप्पासाहेबांनी साधारण १९६० पासून सुरु केले होते. समोसा आणि बटाटेवड्याची आजही जिभेवर रेंगाळणारी चव हे दोन्ही, त्या काळात आप्पासाहेबांच्या R & D चे फलित होते. आप्पासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ही R & D संस्कृती आता जीवन हॉटेलच्या पदार्थाची चव आणि रसना कौशल्याचे वैशिष्ट्य झाले आहे. आपला सुपरिचित बाबू वडेवाला, त्याच्या तरुणपणी याच कॅन्टीनमधे त्या काळांत नोकरी करत होता.

पारले टिळक विद्यालयाच्या इंग्लिश माध्यमाची शाळा नवीन इमारतीत सुरु झाली त्यावेळी, आपल्या सहकाऱ्याप्रती आपुलकी – प्रेम आणि निखळ माणुसकीतून, सामानासह कॅन्टीनचा व्यवसाय आप्पासाहेबांनी बाबूच्या स्वाधीन केला. पुढच्या पिढीतील यशस्वी उद्योजक म्हणून बाबू वडेवाला आपल्याला सुपरिचित आहे. अगदी सुरुवाती पासून जीवन मधे किचन सांभाळणारे दामले यांची आठवण आप्पासाहेब आजही कृतज्ञतेने सांगतात.

१९७८ पासून सलग वीस वर्षे, विलेपारल्यातील दिनानाथ नाट्यगृहाचे कॅन्टीन, अंधेरीतील MIDC परिसरातील एक झुणका भाकर केंद्र आणि सहार गावातील कार्गो कॉम्प्लेक्स मधील कॅंटीन हे सर्व अनेक वर्षे आप्पासाहेब जोगळेकरांच्या जीवन रेस्टॉरंटच्या व्यवस्थापनाखाली होते. मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रशासकीय विभागांमधे एका त्रयस्थ संस्थेमार्फत, स्वच्छता मानांकनाप्रमाणे डिसेंबर २०१७ या महिन्यात स्वच्छता सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणात जीवन रेस्टॉरंटला, मुंबईतील सर्वात स्वच्छ हॉटेल म्हणून प्रथम क्रमांकाने गौरवण्यात आले होते.

आप्पासाहेबांच्या पुढील पिढीतील त्यांचा सुपुत्र श्री विद्येश जोगळेकर आज जीवन रेस्टॉरंटचे आणि केटरींग व्यवसायाचे व्यवस्थापन करतो आहे. सुकन्या श्रीमती वर्षा करंदीकर, गेली तीस वर्षे केटरिंग सर्विस संदर्भातील स्वतःचा व्यवसाय करत आहे. ही दोघेही, आप्पासाहेबांची व्यवसाय नीती स्वीकारून व्यवसायात यशस्वी झाले आहेत.

आप्पासाहेबांची समाजाप्रती असलेली बांधिलकी, अनेक संस्थांच्या उत्तम सामाजोपयोगी उपक्रमाना आर्थिक सहाय्य देऊन सिद्ध झाली आहे. अशा उत्तम उपक्रमांची पारख करून, आप्पासाहेब स्वतः अशा उपक्रमांसाठी आर्थिक आधार देऊन ते सर्व उपक्रम यशस्वी करतात. गेली सत्तर वर्षे, विलेपारल्याचे शैक्षणिक – सामाजिक – सांस्कृतिक जीवन समृध्द करणारे श्री वासुदेव विठ्ठल उपाख्य आप्पासाहेब जोगळेकर – त्यांचे कुटुंबीय आणि जीवन रेस्टॉरंट हा त्यांचा नामवंत ब्रॅन्ड, निश्चितपणे विलेपारल्याचे DNA घटक आहेत...!...श्री आपासाहेब जोगळेकर – कुटुंबीय आणि जीवन रेस्टॉरंट या सर्वांना अनेकानेक शुभेच्छा...!!

--००--

विलेपारल्यातील बलुत २ / ५

# व्हि एम मुसळूणकर अँड सन्स ज्वेलर्स प्रा लिमिटेड

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन - तीन दशकांपर्यंत पारंपरिक बलुतेदारीची ग्रामीण परंपरा महाराष्ट्रासह भारतात प्रचलित होती. पारतंत्र्याच्या काळात भारतीय इतिहासाची झालेली मोडतोड आणि नंतरच्या काळात लादलेले अयोग्य नागरिकशास्त्र यामुळेच ही ग्रामीण बलुतेदार परंपरा अस्तंगत झाली. समाजशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या पंडितांच्या अलीकडच्या निष्कर्शानुसार ही बलुतेदारी म्हणजे तत्कालीन भारतीय समाजाची प्रगत ecosystem म्हणजे परिस्थितीकी तंत्रज्ञान होते. विलेपारल्यातील बलुतेदारांच्या कारकीर्दीचा आणि प्रगतीचा अभ्यास करताना यातील एक लघुत्तम सामान्य वैशिष्ट्य दृश्यमान होत गेले. (लघुत्तम सामान्य वैशिष्ट्य म्हणजे smallest common characteristic) महाराष्ट्रातील गावागावात खंडित झालेली ही बलुतेदारी परंपरा, विलेपारल्यात मात्र विसाव्या शतकाच्या अखेर पर्यंत जपली गेली. बहुधा नेमक्या याच बलुतेदारीने विलेपारल्याचा DNA घडवला. हेच या विलेपारल्यातील बलुतेदारीचे लघुत्तम सामान्य किंवा सूक्ष्म सूत्र आहे.





**सुहास मुसळूणकर** **सुजन मुसळूणकर**

एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच, जुहू समुद्र किनाऱ्यापासून हाकेच्या अंतरावर असलेले तत्कालीन निसर्गरम्य विलेपारले गाव, दक्षिण मुंबईतील धनवंतांसाठी, आठवड्या अखेरचा हवापालट आणि विरंगुळ्याचे ठिकाण होते. नामवंत लेखक श्री सुमेध वडावाला रिसबूड यांनी लिहिलेल्या विजय स्टोअर्सच्या आण्णासाहेब साठे यांच्या चौऱ्यांशी पावले या चरित्रात याचा उल्लेख केला आहे. विलेपारल्याच्या नागरी वस्तीची सुरुवात एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात झाली होती. रोजीरोटीच्या शोधात जसे अमराठी बलुतेदार विलेपारल्यात वस्तीला आले तसेच आपले मराठी बलुतेदार सुद्धा आले होतेच.

तत्कालीन रत्नागिरी (सिंधुदुर्ग) जिल्ह्यातील गुहागर जवळच्या तळवली गावातील मधुकर जाधव हा नाभिक कुटुंबातील तरुण, वयाच्या चौदाव्या वर्षी १९२९/३० सालात पारल्यात आला. (विलेपारल्यातील मराठी बलुतं लेख क्र.२) त्याच तळवली गावातून महादेव मुसळूणकर हा सुवर्णकार कुटुंबातील पंधरा / सोळा वर्षांचा एक तरुण, त्याच दरम्यान विलेपारल्यात दखल झाला होता. सोन्याच्या दागिन्यांच्या घडाईची कारागिरी, हे कुटुंब परंपरेने आलेले कौशल्य ही महादेव मुसळूणकरची गुणवत्ता होती. पुढील काळात त्यांचे दोन मुलगे प्रभाकरभाऊ – वसंतराव आणि पुढच्या पिढीतील सुहास आणि सुजन या सुवर्णकार मुसळूणकर कुटुंबीयांनी, गेली सत्तर – ऐंशी वर्षे विलेपारल्याच्या DNA वर सोनेरी साज चढवला आहे त्याची ही गोष्ट.

विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत, विलेपारल्यातील आपल्या सर्व बलुतेदारांची कारकीर्द आणि प्रगती काहीशी मक्तेदारी स्वरूपाची होती. याचे पहिले कारण, अगदी अलीकडेपर्यंत, विलेपारले हे उपनगर, बलुतेदारी परंपरेतील एक प्रगत मॉडेल होते,

कारण इथे गावातला प्रत्येकजण प्रत्येकाला ओळखत होता. याचे दुसरे कारण असे की विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत या बलुतेदारांना फारशी स्पर्धा नव्हती. आपल्या प्रत्येक बलूतेदाराने ग्राहकाच्या Brand Loyalty चा अनुभव घेतला होता. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला मात्र सर्व समाज माध्यमातून अत्यंत आक्रमक मार्केटिंग अर्थात विक्रीव्यवस्थाशास्त्राचे वापर सुरु झाले आणि त्याचा परिणाम म्हणजे बलुतेदारांना स्पर्धा निर्माण झाली आणि पर्यायी व्यवस्था निर्माण झाली. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच, बदलणाऱ्या या परिस्थितीचा नेमका अंदाज, सुहास आणि सुजन या दोन मुसळूणकर सुवर्णकार बंधूनी ज्या अचूकपणे आणि चातुर्याने घेतला होता, तो त्यांचा वेग मला अचंबित करतो. आपल्या विलेपारले उपनगरातिल समाजाचा वेगाने बदलणारा चेहेरा आणि प्रत्येक बलुतेदाराची प्रगतीशील कारकीर्द याचा ताळमेळ शोधणे फारच रंजक आहे.

विलेपारल्याच्या बाजारातील गोखल्यांच्या राममंदिरासमोरच्या आण्णासाहेब साठ्यांच्या सहजीवन इमारतीत (तत्कालीन गोखलेवाडी) १९३२/३३ पासून माझ्या कुटुंबाचे बिऱ्हाड होते. राममंदिराच्या आवारात रस्त्याला लागून असलेल्या

घरात, राममंदिराचे पुजारी खरेशास्त्री रहात असत. त्यांच्या बाजूच्या दोन गाळयात, सुवर्णकार मूसळूणकर आणि मानकाम्यांची लॉन्ड्री होती. या लॉन्ड्रीच्या जागी आज प्रभुकृपा स्टोअर्स आहे. याच सुवर्णकार मूसळूणकरांनी, माझ्या बारशाचेवेळी माझे कान टोचले होते. प्रभाकर आणि वसंत हे मूसळूणकर बंधू सोन्याचे दागिने घडवत असतानाचे, माझ्या घराच्या गॅलरीतून समोर दिसणारे, माझ्या बालपणापासून पाहिलेले दृश्य, आजही मला स्पष्ट दिसते आहे.




व्ही एम मुसळूणकर यांचे दुकान.

प्राचीन भारतातील ग्रामीण परंपरेतील बलुतेदारी ही नेहेमीच पंचक्रोशीतील कुटुंबसंस्थेशी जोडलेली असे. साळी – बुरुड – कुंभार – शिंपी – लोहार – पुरोहित – सुतार – सुवर्णकार असे बलुतेदार दीर्घकालीन परंपरेने अनेक कुटुंबाना सेवा पुरवत असत.

आपल्या लेखमालेतील सर्वच बलुतेदारांनी, ही सेवा पुरवठा परंपरा विलेपारल्यात सुद्धा समृध्द केली होती. सुवर्णकार मूसळूणकर असेच असंख्य कुटुंबांचा विश्वास संपादन करणारे, एक सेवा पुरवठा करणारे बलुतेदार कुटुंब होते आणि आजही आहे. माहादेव मूसळूणकर आणि त्यांचे दोन्ही सुपुत्र यांनी त्यांच्या सुरुवातीच्या काळात सोन्याचे दागिने घडवण्याचे काम सुरु केले होते. सुवर्ण अलंकार बनवण्यातील त्यांच्या कौशल्यामुळे विलेपारलेकरांची पसंती मिळाली होती आणि राममंदिरासमोरील दुकानात वर्दळ वाढली होती. मधल्या दरम्यान प्रभाकारभाऊ आणि वसंतराव या दोघांनी स्वतंत्र व्यवसाय करायचा निर्णय घेतला होता.

मंदिरासमोरील जागेत आता, वसंतराव मूसळूणकर यांच्या व्यवसायाला स्थैर्य प्राप्त झाले होते तरीही त्यांचा संपूर्ण भर स्वतःच्या कारागीरीवरच होता. शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कॉलेजात शिकतानाच मोठा मुलगा सुहास वडिलांच्या हाताखाली सुवर्णालंकार बनविण्याचे कसब शिकत होता. हे कसब शिकून १९८८ मधे बावीस वर्षांचा सुहास पूर्णवेळ वडिलांच्या व्यवसायात दाखल झाला होता. व्हि एम मुसळूणकर अँड सन्स ज्वेलर्स प्रा लिमिटेड या व्यवसायाची प्रगती इथूनच वेगाने सुरु झाली होती.

आज आपल्याला दिसतो त्या विलेपारल्याच्या भाजी बाजाराचे स्वरूप बदलण्याची सुरुवात साधारण १९६५ पासून झाली होती. विलेपारले पूर्वेकडील स्टेशनपासून, उत्तरेकडील हनुमान रोड आणि दक्षिणेकडच्या नेहरू रोड या दोन्ही दिशांच्या मधल्या परिसरात, मोठी बाजारपेठ हळूहळू आकार घेत होती. पूर्वीच्या मोरबंगल्याच्या जागी आता अग्रवाल मार्केटच्या दोन मोठ्या इमारती उभ्या राहिल्या होत्या. याच्या तळमजल्याला दुकानांची रेलचेल होती. १९६५ पासून १९९० या पंचवीस वर्षांच्या काळात भाजी - फळ बाजार आणि अन्य व्यवसाय प्रगत होऊन स्थिरावले होते. मात्र या विविध व्यवसायांत मराठी व्यावसायिकांची उपस्थिती फारच अभावाने होती. यासुमारास वसंतरावांच्या व्यवसायाला साधारण पस्तीस वर्षे पूर्ण झाली होती. वसंतराव मूसळूणकरांचा सुहास, याच काळांत व्यवसायात दाखल झाला होता. सुवर्णालंकार निर्मिती आणि विक्री व्यवस्था यातील अनुभव समृध्द वडिलांच्या मार्गदर्शनाखाली चतुर - धाडसी सुहास मूसळूणकर आणि धाकटा भाऊ सुजन यांनी १९९० ते २०२० या पुढच्या तीस वर्षात फार मोठी झेप घेतली आहे.

राममंदिरासमोरची जागा विलेपारल्याच्या भर बाजारपेठेत आहे. १९९१/९२ मधे रिटेल व्यवसायाला सुरुवात केली होती. आपले दुकान दृश्य स्वरूपात नागरिकांना दिसावे ही दोन्ही भावांची महत्वाकांक्षा होती. १९९३/९४ मधे या जागेत व्हि एम मुसळूणकर अँड सन्स ज्वेलर्स यांची पहिली सुसज्ज रिटेल शोरूम सुरु झाली. दर्शनी भागात व्हि एम मुसळूणकर अँड सन्स ज्वेलर्स असे दुकानाचे नाव झळकले. बदलत्या काळानुसार आणि आधुनिक विक्रीशास्त्र व्यवस्थेनुसार विविध सुवर्णालंकारांचे दर्शन आता ग्राहकाला दुकानात प्रवेश करताच होत होते. कुठला सोन्याचा दागिना आणि कसा बनवायचा त्याचा निर्णय ग्राहक सहज करू शकत होते. कॉलेजचे शिक्षण पूर्ण करून सुहासचा धाकटा भाऊ सुजन आता रिटेल शोरुमच्या व्यवस्थापनात दाखल झाला होता. धाडस – दूरदृष्टी – व्यवस्थापन कौशल्य, या आपल्या प्रत्येक बलुतेदाराच्या निसर्गदत्त गुणवत्ता होत्या आणि आहेत. आपल्या या दोन तरुण सुवर्णकार मुसळूणकर बंधूनी, बदलत्या सामाजिक गरजांनुसार विचारपूर्वक आधुनिक व्यवसाय तंत्र स्वीकारले होते.

कुठल्याही आर्थिक स्तरातील आपण भारतीयांसाठी, विशेषतः स्त्रीयांसाठी, सोन्याचे दागिने म्हणजे जिव्हाळ्याची गोष्ट

असते. थोडेसे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षणही असते. यामुळे प्रत्येक ग्राहक खूप चिकित्सक असतो. उत्तम - नाविन्यपूर्ण कारागिरी आणि योग्य दर्जा हा सुवर्णालंकार व्यवसायातला महत्वाचा मुद्दा आहेच या बरोबरच विश्वासार्हता तितकीच महत्वाची आहे. घरातले सोन्याचे जुने दागिने मोडून नवीन बनवण्याच्या पारंपरिक जुन्या पद्धतीमधे, ग्राहकाला सोन्याच्या वजनातील घट स्वीकारावी लागत असे. यांत ग्राहकाचे आर्थिक नुकसान होत असे. सुहास आणि सुजन या दोघांनी रिटेल शोरूमच्या आरंभाला ही पद्धत बंद करून केडीयम (KDM) मिश्रित दागिन्यांची घडाई सुरु केली. त्यानंतर झालेल्या बदलानुसार, २००१ मधे सरकारने BIS म्हणजे ब्युरो ऑफ इंडियन स्टॅन्डर्ड या संस्थेतर्फे, दागिने बनवण्याच्या सोन्याच्या शुद्धतेची हॉलमार्क ही निश्चित मानके बनवली. ही सर्व मानके आंतरराष्ट्रीय दर्जाची होती. अशी शुद्धता पारख करण्यासाठी निवडक सुवर्णकारांना परवाने देण्यात आहे. त्या काळांत, हा परवाना मिळवणारे व्हि एम मुसळूणकर अँड सन्स हे विलेपारल्यातील पहिले सुवर्णकार होते. याचा दुहेरी फायदा आला. ग्राहकांसाठी ही विश्वासाची पावतीच होती. त्याबरोबरच दागिने बनवणाऱ्या कारागिरांना योग्य त्या शिस्तीत काम करणे शक्य झाले होते.

विश्वासार्हता आणि दर्जा या बरोबरच सोन्याच्या दागिन्यांचे आकर्षक डिझाईन आणि नाविन्य महत्वाचे असते. आपल्या देशात प्रदेशागणिक दागिन्यांच्या पारंपरिक पद्धती आहेत. अनेक ग्राहक अशा पारंपरिक डिझाईनचा आग्रह धरतात. सोन्याचे दागिने बनवणारे तीन कारागीर आता दुकानाच्या सेवेत दखल झाले होते. मात्र याबरोबरच आता Out sourcing ला सुरुवात झाली होती. गुजरातेतील जुनागड आणि राजकोट ही शहरे सोन्याच्या पारंपरिक दागिन्यांसाठी, ॲन्टिक ज्वेलरीसाठी प्रसिद्ध आहेत. बंगाल मधील कोलकाता, कर्नाटकातील गोकाक, कारवार आणि बेळगाव या शहरातही सोन्याच्या ॲन्टिक ज्वेलरी घडवल्या जातात. या प्रत्येक शहरातील दागिन्यांचे डिझाईन खास असते. या सर्व शहरातून नव्या निवडक डिझाईनचे दागिने आयात करायला सुरुवात झाली आणि त्याला ग्राहकांची पसंती मिळाली.

२००१ मधे चांदीच्या दागिने आणि मंगल कार्यासाठी आवश्यक वस्तूंचे वेगळे दालन महात्मा गांधी रोडवरच्या भिडे बंगल्यात सुरु झाले आणि आता व्हि एम मुसळूणकर अँड सन्सच्या व्यवसायाचा विस्तार सुरु झाला. मुंबईसह नाशिक, बंगलोर, कोलकाता इथून वेगळ्या आकर्षक चांदीच्या वस्तूंचि आयात सुरु

झाली आणि हे दालनही समृद्ध झाले. कोल्हापूरचा प्रसिद्ध चांदीचा साज आता ग्राहकांना उपलब्ध झाला होता.

नैसर्गिक गुणवत्ता, व्यवसायवृद्धीची जिद्द, नाविन्याचा ध्यास, समाजमनाचा कानोसा घेण्याची हातोटी आणि सततचा अनुभव यातून आपल्या प्रत्येक बलुतेदाराची प्रगती झाली आहे. महात्मा गांधी रोडवर केसकर बागेसमोर रेलेकॉन हाऊस या इमारतीत, २०१७ मधे व्हि एम मुसळूणकर अँड सन्सची तिसरी रिटेल शोरूम सुरु झाली. आता सोन्याच्या दागिन्यांची असंख्य डिझाईन उपलब्ध झाली. याबरोबरच प्लॅटिनमची अधिकृत विक्री करण्याचा परवाना आता प्राप्त झाला होता. डायमंड – माणिक – पाचू – पोवळे - मोती याच्या दागिन्यांसह ही नवी रिटेल शोरूम सजली आहे. सागर मुसळूणकर हा पुढच्या पिढीतला उच्च शिक्षित तरुण आता रिटेल शोरुमच्या व्यवस्थापन व्यवहारात, वडिल आणि काकांच्या मदतीला आला आहे. पदवी परीक्षेनंतर सागरने जेमॉलॉजिकल इन्स्टिट्यूट ऑफ अमेरीका या नामवंत शिक्षण संस्थेचा एक वर्षाचा, डायमंड ग्रॅजुएट प्रोग्रॅम हा आभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्यानंतर लंडन येथे जाऊन लक्झरी ब्रॅन्ड मॅनेजमेन्टचा अभ्यासक्रमही पूर्ण केला. हरेकृष्ण इंटरनॅशनल या प्रख्यात डायमंड

निर्यातदार व्यवसायामध्ये दीड वर्षाचा अनुभव घेऊन आता सागर मुसळूणकर नव्या उत्साहाने नव्या शोरूमचे व्यवस्थापन पहातो आहे.

माझ्या अभ्यासातील विलेपारल्याच्या प्रत्येक बालुतेदाराशी गप्पा मारणे हे माझ्यासाठी ज्ञानसमृद्धीचे अनुभव असतात. खूप छान परिचय असला तरी या लॉकडाऊन मुळे सुहास मुसळूणकरशी फोनवर मारलेल्या गप्पा मोठ्या रंगतदार आणि स्मरणरंजक झाल्या होत्या. मराठी भाषा - आपल्या कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय आणि आपले विलेपारले याचा सुहासला खूप अभिमान आहे. मी कारागिराचा व्यापारी झालो आहे असे सुहास मोठ्या अभिमानाने सांगतो. आपल्या मराठी सुवर्णकारांकडे परंपरेने आलेले खूप मोठे कौशल्य आहे. मात्र ते व्यवसायाकडे वळले पाहिजेत, त्यांच्या मराठी नावाच्या पाट्या जागोजाग दिसल्या पाहिजेत. व्यवसाय कुठलाही असो, मराठी माणसाच्या मराठी नावाचे व्यवसायाचे बोर्ड शहरभर दिसले पाहिजेत ही आस्था आणि कळकळ ही सुहास मुसळूणकरचि एक अजून वेगळी खास ओळख आहे.

बदलती सामाजिक परिस्थिती – सतत बदलणारे व्यवसायाचे अर्थकारण – आक्रमक मार्केटिंग – चोखंदळ ग्राहकांची आवड - सशक्त स्पर्धा आणि अर्थात मराठी भाषा आणि मराठी अस्मिता या आणि अशा सर्व धोरणे आणि धारणांचे भान असलेले व्हि एम मुसळूणकर अँड सन्सचे तरुण वारसदार सुहास – सुजन – सागर – क्षितिज मुसळूणकर आणि त्याचे सर्व प्रगतीशील कुटुंबीय याना अनेअनेक शुभेच्छा...!!

--oo--

विलेपार्ल्यातील बलुतं ६

# सुभाष आणि सुबोध जोशी बंधू.
# सुबोध टाईपरायटर्स आणि गुलमोहोर ट्रॅव्हल्स

ठाकुरद्वार परिसरातील झावबा वाडी; गंगाराम खत्री वाडी, देना वाडी, शिक्का नगर, गिरगाव बॅक रोडवरची आंग्रे वाडी, खाडिलकर रोडवरील केशवजी नाईक चाळी आणि मॅजेस्टिक सिनेमाच्या अगदी जवळ मोहन बिल्डींग, बाजूची गोरेगावकर चाळ आणि तारा बाग, गिरगावातल्या या सगळ्या वाड्या आणि चाळी, संपूर्ण विसाव्या शतकांत राजकीय घडामोडी आणि मराठी संस्कृती - परंपरेची मोठी केंद्र होती. नंतरच्या काळांत गिरगावातील ही चाळ संस्कृती हळूहळू दादर – विलेपारले – बोरीवली – विरार अशी मुंबईच्या उत्तरेला जशी सरकली तशीच ती ठाणे – डोंबिवली – कल्याण अशी सेन्ट्रल रेल्वेच्या दिशेनेही सरकली, असे आज अभ्यासाने लक्षांत येते. मात्र या गिरगावकरांची मूळ वृत्ती, विलेपारल्याच्या मराठी समाजमनाशी आणि शिक्षण – उद्योग – साहित्य – नाटक अशा सामाजबांधणीशी खास साधर्म्य सांगणारी होती आणि अजूनही आहे. गृहिणीच्या माहेर – सासरच्या दोन घरांसारख हे आपुलकीच नातं.

गिरगावातल्या मोहन बिल्डींगमधे रहाणारे विनायक बर्वे आणि वसंत बर्वे हे गिरगावातील मॅजेस्टिक टाईपरायटिंग इन्स्टिट्यूटचे मालक आहेत. बर्वे बंधू, सुभाष आणि सुबोध जोशी या बंधुद्वयांचे मामा. बर्वे बंधूंचा हा व्यवसाय आजही प्रगतीशील आहे. आपल्या भावांच्या मार्गदर्शनाखाली १९७८ पासून, शोभनाताई जोशी म्हणजे सुभाष आणि सुबोधच्या आईने एक गृहउद्योग सुरु केला होता. विलेपारल्यातील नागरिकांची मराठी टायपिंगची कामे करून द्यायला त्यांनी सुरुवात केली होती.

आधीच्या अनेक लेखात वर्णन केल्या प्रमाणे, १८९० ते १९३० या साधारण चाळीस वर्षांच्या काळात इथे येऊन स्थायिक झालेली बहुतांशी चाकरमानी मराठी कुटुंब, काही सन्मान्य अपवाद वगळता, कुलाबा – रत्नागिरी अशा कोकण परिसरातून आणि त्यापलीकडील वेंगुर्ला – कुडाळ – मालवण - सावंतवाडी आणि गोवा या प्रदेशातून आलेली होती. कुटुंब व्यवहारात परंपरेने जपली जाणारी मूल्य संस्कृती हे या सर्वच कुटुंबांचे अंगभूत वैशिष्ट्य होते. संयम – सौजन्य – उद्यम – सातत्य – चिकाटी - भगवंतावरील निष्ठा – नियमितपणा – वक्तशीरपण – प्रयत्नवाद – प्रेम – आपुलकी –

वात्सल्यभावना या सर्व गुणवत्ता हा या मूल्य संस्कृतीचा परिचय आहे. मात्र या सर्व गुणवत्तानां, कुटुंबाच्या सामान्य आर्थिक परिस्थितीची झालर कायमच लावलेली दिसायची. यामुळेच उत्पन्न – खर्च – बचत याचि गणिते कटाक्षाने मांडली जायची आणि हर तऱ्हेने उत्पन्न वृद्धीसाठी अथक मेहनत केली जायची. याच आणि अशाच सततच्या प्रयत्नातून सुभाष – सुबोधच्या वडिलांनी, श्री मधुकर दत्तात्रय जोशी यांनी पर्यटकांसाठी मोटारी आणि बस भाड्याने देण्याचा सुरु केलेला व्यवसाय, हा जोशी कुटुंबाचा पहिला स्टार्टअप असेच म्हणायला हवे.

अलीकडच्या काळात आपले माननीय पंतप्रधान, स्टार्टअप या व्यवसाय संस्कृतीचा संदर्भ सतत देताना सामान्य भारतीय नागरिकांना, छोटासा का होईना, स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याची प्रेरण देत आहेत. मात्र सुभाष आणि सुबोध या जोशी बंधूंच्या आईचा, शोभनाताईंचा स्टार्टअप हा दुसरा स्टार्टअप असेच म्हणायला हवे कारण पहिल्या स्टार्टअपचे श्रेय अर्थातच, सुभाष आणि सुबोधचे वडील श्री मधुकर दत्तात्रय जोशी यांचे आहे. अशा उद्यमी आणि सत्शील कुटुंबात जन्म मिळणे हे पूर्वजन्मीचे संचीतच म्हणायला हवे. मात्र या कुटुंबातील संगोपनात लागलेली शिस्त,

मिळालेले प्रमाणिक अनुभवाचे धडे, अशा भांडवलावर अगदी प्राथमिक पातळीवर उमेदवारी करतांना साधारण पन्नास – पंचावन्न वर्षांपूर्वी आई आणि वडिलांनी सुरु केलेल्या याच नेमक्या दोन स्टार्टअपचा विस्तार आणि झालेली प्रगती, असा आपल्या या महिन्यातील बलुतेदाराच्या या यशस्वी कारकीर्दीचा परिचय.

मधुकर जोशींचा मोठा मुलगा सुभाष १९७८ मधे दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला. प्रवासी मोटारी आणि बस भाड्याने देण्याच्या वडिलांच्या व्यवसायात उमेदवारी करायला सुरुवात करण्यासाठी प्रथम त्याने बस आणि मोटारींच्या इंजिनांच्या दुरुस्तीचे काम शिकायचे ठरवले. कुठलाही संकोच न बाळगता बसचा क्लीनर म्हणून आपली कारकीर्द सुरु करणारा सुभाष, वयाची अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर मोटारी आणि बस चालवायला शिकला. नंतरच्या काळांत पर्यटकांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसचा ड्रायव्हर बनून तो वडिलांच्या व्यवसायचे जणू तो सारथ्य करत होता. १९८० ते २००० पर्यंत, महाराष्ट्रात आणि भारतभर पर्यटकांच्या बसचे आणि मोटारींचे ड्रायव्हर म्हणून सारथ्य करण्याचा भला मोठा अनुभव गाठीला बांधून, सुभाष, २००० या वर्षी धाकटा भाऊ

सुबोध बरोबर एकत्र व्यवसायात दखल झाला. मधुकर जोशींच्या व्यवसायाच्या स्टार्टअपचा प्रगतीचा काळ सुरु झाल होता.

मधुकर जोशींचा धाकटा मुलगा सुबोध जोशी, १९८० या वर्षी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. आईच्या सल्ल्यानुसार साहजिकपणे लगेचच, विनायक बर्वे या मामाकडे, टाईपरायटर मशिनच्या दुरुस्तीचे काम शिकण्यासाठी त्याने उमेदवारी सुरु केली होती. साधारण चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वीचा शोभनाताई जोशींचा हा स्टार्टअप होता आणि आज त्याचा विस्तार आणि प्रगती, हे या आपल्या मराठी बलुतेदार मालिकेतील सहाव्या लेखाचे प्रयोजन आहे.

आपले मामा श्री विनायक बर्वे यांच्याकडे टाईपरायटर दुरुस्तीच्या कामाचि उमेदवारी सुरु झाली तेंव्हा सुबोध जेमतेम सोळा – सतरा वर्षांचा होता. हा टाईपरायटर उघड, त्यातला प्रत्येक छोटा मोठा पार्ट - स्क्रू - वॉशर जपून बाजूला काढ आणि ते सगळे एका मोठ्या ट्रे मधे जमा कर असा अगदी प्राथमिक उपक्रम सुरुवातीच्या पहिल्या आठ – दहा दिवसात मामानी सुबोधला

करायला सांगितला होता. खरे म्हणजे सुबोधला आश्चर्यच वाटले होते... मी हे शिकण्यासाठी आलोय का...?.. असा प्रश्न त्याला सुरुवातीला पडला होता. मात्र १९८० ते १९८४ या पुढच्या चार वर्षात, दहा बारा प्रकारच्या टाईपरायटर मशीनची दुरुस्ती या विषयांत सुबोध पारंगत झाला.

साधारण १९९२ / ९३ पर्यंत प्रत्येक कार्यालयात त्यावेळी, टाईपरायटर मशीनला पर्याय नव्हता. कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार एक किंवा दोनपासून दहा ते बारा मशीनचा वापर खाजगी आणि सरकारी कार्यालयात होत असे. बॉम्बेसेन्ट्रल ते चर्चगेट या परिसरात, बर्वे मामांची, टाईपरायटर मशीनच्या दुरुस्ती आणि सर्विसिंगचि साधारण तीनशे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट असत. मशीन दुरुस्तीमध्ये कौशल्य प्राप्त केल्यानंतर, १९८१ ते १९८४ काळांत या कॉन्ट्रॅक्टचि पूर्ण जबादारी, मामांनी सुबोधकडे सोपवली होती.

शेजारीच रहाणाऱ्या चि अनुराधा बेडेकरशी १९८४ मधे सुबोधने लग्नगांठ बांधली आणि त्याच्या संसारात आता प्रगतीचा नवा आध्याय सुरु झाला होता. याच काळात मामाशी सल्ला मसलत करून सुबोधने, विलेपारल्यात टाईपरायटर मशीनच्या

दुरुस्तीचा स्वतंत्र व्यवसाय सुरु केला. मराठी – हिंदी – गुजराथी -- इंग्लिश या चार भाषातील टायपिंगची कामे करणे चालू होतेच. पुढील आठ वर्षात सुबोध आणि सौ अनुराधा यांनी मोठी प्रगती केली होती. बांद्रा ते बोरीवली परिसरातील खाजगी आणि सरकारी कार्यालये आणि विशेषकरून अनेक पोलीस स्टेशनमधे, स्वतःची ऐंशी टाईपरायटर मशीन भाड्याने दिली जाऊ लागली होती. याबरोबरच मशीन दुरुस्ती आणि सर्विसिंगचि साधारण तीनशे वार्षिक कॉन्ट्रॅक्टचि कामे ही या आठ वर्षातिल प्रगतीची गणिते होती.




**↑सौ अनुराधा - श्री सुबोध - श्री सचिन**

**↑सौ अजिता - श्री सुभाष**

आमनेश्वर निवास मधील तळमजल्यावरच्या घरात टाईपरायटर बरोबर आता दोन सायक्लोस्टायलिंग मशीनची भर पडली होती. अनेक शाळांच्या विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांच्या

छपाईची कामे रात्रंदिवस सुरु झाली होती. १९९० – १९९२ हा भारतीय व्यवसाय व्यवस्थापनाच्या स्थित्यंतराचा काळ म्हणावा लागेल. याच वेगवान बदलाच्या काळांत, सुभाष आणि सुबोध जोशी या बंधुद्वयाने , टाईपरायटरच्या युगातून इलेक्ट्रोनिक टाईपरायटरच्या युगांत आणि लगेचच कॉम्प्युटरच्या युगांत, प्रवेश केला होता. विलेपारल्यातील आपल्या प्रत्येक बलूतेदाराकडे काही गुणवत्ता समान आहेत याचा मला नेहेमीच अभिमान वाटत आलाय. समाजात घडणाऱ्या बदलाचे योग्य अनुमान – दूरदृष्टी – धाडस – दीर्घकाळ परिश्रम करण्याची तयारी - अचूक निर्णय घेण्याची क्षमता – संघभावना या सर्व गुणवत्ता सुभाष + सुबोध या जोडीची तर्कशुद्ध बलस्थाने आहेत.

१९९२ या वर्षी, कॉम्प्युटर युगांत प्रवेश करतांना, ब्याण्णव हजार रुपयांचा, 286 मॉडेलचा पहिला कॉम्प्युटर आणि सोबत एक प्रिंटर सुबोध टाईपरायटर्स मधे दाखल झाला. यासाठी ब्राईट कॉम्प्युटर मधे महिनाभराचा कॉम्प्युटर अभ्यासक्रम सुबोधने पूर्ण केला. त्याकाळात ही रक्कम फार मोठी होती. त्यासाठी बँकेचे कर्ज उपलब्ध झाले होते. यावेळेपर्यंत सुभाष आणि सुबोधच्या व्यवसाय वृद्धीसाठी आणि कुटुंबाच्या प्रगतीसाठी एक निश्चित धारणा आणि दृष्टीकोन तयार झाला होता. आवश्यक त्यावेळी बँकेचे कर्ज

घ्यायचे आणि त्याचा तणाव न घेता, परतफेडीच्या ध्येयाने योग्य ती आर्थिक गणिते मांडायची.

१९८७ मधे, सुबोधच्या बायकोच्या मोठ्या बहिणीशी, चि अजिता बेडेकरशी सुभाष जोशींनी लग्नगांठ बांधली. १९८९ मधे जोशीबंधूनी पहिली दहा सीटर मॅटेडॉर व्हॅन खरेदी केली आणि सौ अजित आणि सुभाषच्या संसारात प्रगतीचा पुढचा टप्पा सुरु झाला होता. सौ अजीता जोशी या, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाच्या आहेत. जम्मू – काश्मीर मधील विधवा महिलांनी स्वबळावर सुरु केलेल्या बिस्कीट निर्मितीच्या व्यवसायाला, अथक प्रयत्नांनी आणि निरपेक्ष वृत्तीने, मुंबईतील विक्रीव्यवस्थेसाठी त्या सहाय्य करत आहेत.

क्लीनर – ड्रायव्हर पासून उमेदवारी सुरु केलेला सुभाष आणि टाईपरायटर मशिनच्या दुरुस्तीपासून उमेदवारी सुरु करणारा सुबोध हे दोघे, सुरुवातीच्या काळांत जे कष्ट करत होते त्यातील सातत्य, अथक प्रयत्न, सतत कार्यमग्न रहाण्याची नैसर्गिक ऊर्जा, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा आणि विश्वासार्हता अशा त्यांच्या आणि कुटुंबाच्या गुणवत्ता, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला

अनुभवता येत होत्या. यातूनच त्यांच्या दैनंदिन जीवनात अनपेक्षितपणे किंवा योगायोगाने भाग्योदय घडवणाऱ्या घटना नित्यनेमाने घडत राहिल्या. Serendipity या इंग्लिश शब्दाचा अर्थ फार मजेशीर आणि वेगळाच आहे. अशा किमान चार घटनां या दोघांनी अनुभवल्या आहेत. याना Serendipitious event असे म्हटले जाते. एखाद्या वाचकाला कदाचित माझे हे विधान अतिशयोक्ती वाटेल. मात्र सुभाष आणि सुबोधच्या जवळच्या स्नेही – सुर्हुदानी याची वास्तव वर्णने निश्चितच ऐकली असतील.

१९८४ पाऊन सुबोध टाईपरायटर्स आणि गुलमोहोर ट्रॅव्हल्स या दोन व्यवसायांची हळूहळू प्रगती झाली होती. २००० या वर्षात सुभाषने ड्रायव्हिंगचे काम बंद केले. पूर्णवेळ कार्यालय व्यवस्थापनाची जबाबदारी सुभाषने स्वीकारली. वर्ड प्रोसेसिंग – झेरॉक्सची येणारी कामे आणि त्यासाठी येणाऱ्या कर्मचार्यांचे नियोजन, दहा - बारा मोटारी, बस याची वेळापत्रके – ड्रायव्हर कर्मचारी नियोजन आणि दुरुस्ती या सर्व कामाचे नियंत्रण – व्यवस्थापन यामुळे सुसूत्र झाले होते. २००४ मधे आमनेश्वर निवास या चाळीच्या जागी नवी इमारत उभी राहिली. दोन्ही व्यवसायाचे व्यवस्थापन नव्या प्रशस्त कार्यालयात करणे सोयीचे झाले आही.

मोटारी – बस भाड्याने देण्याच्या गुलमोहोर ट्रॅव्हल्स या पर्यटन व्यवसायाची पुनर्रचना १९९८ / ९९ मधे झाली. श्री ययाती बापट या विलेपारल्यातील तरुण उद्योजक मित्राच्या सल्ल्याने, दापोली येथे त्यांनी बांधलेल्या आर्यावर्त या निवासी संकुलात तीन बंगले बांधून तयार होते. यातूनच कुटुंबीय आणि स्नेही-सुर्हुदांच्या दोन – तीन दिवसांच्या सहलींची सुरुवार झाली होती. सुभाष आणि सुबोधच्या वडिलांच्या स्टार्टअप पासून सुरु झालेला गुलमोहोर ट्रॅव्हल्स आता एक अग्रगण्य पर्यटन व्यवसाय म्हणून पर्यटकांत लोकप्रिय झाला आहे. मे महिन्यात कोकणातील आम्रमहोत्सव यासह गेल्या वीस वर्षात शंभर सहलींचे आयोजन केले गेले आहे. याबरोबरच महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांवर पर्यटकांचा विश्वास प्राप्त झालेल्या साडेतीनशे सहली यशस्वी झाल्या आहेत. सौ अनुराधा + सुबोध जोशी हे दोघे या प्रत्येक सहलीचे नेतृत्व – नियोजन जातीने करत असतात. अशा अनुभवी - कुशल पालकांच्या मार्गदर्शनाखाली उमेदवारी करून त्यांचे सुपुत्र श्री सचिन जोशी यांनी केल्या सात-आठ वर्षांत स्वतंत्रपणे महाराष्ट्राबाहेरच्या पर्यटन स्थळांच्या सहलींचे यशस्वी आयोजन केले आहे.

विलेपारल्यातील बलुतेदार या आपल्या लेखमालेतील हा अठरावा लेख. आधीच्या लेखातील सर्व बलुतेदार, त्यांच्या व्यापारी व्यवसायात यशस्वी झाले होते. सुभास + सुबोध हे जोशी बंधू आपल्या लेखमालेतील पहिले सेवा पुरवठादार म्हणजे Service Provider Entrepreneur आहेत. दोन भिन्न व्यक्तिमत्व असलेले सुभाष आणि सुबोध हे दोघे उद्यमशील भाऊ. शिस्त – सौजन्य — नियमित – प्रमाणिक - वक्तशीर सेवाधारणा या दोघांच्या समान गुणवत्ता आहेत. विलेपारल्याचे सुबोध जोशी हे एक अजब रसायन आहे. उत्तम जनसंपर्क – मोठा लोकसंग्रह हे याचे बलस्थान आहे. व्यवसायाचे असो की सामाजिक – सांस्कृतिक असो ... प्रत्येक कामातील या गृहस्थाचा कमालीचा उत्साह हा याच्या व्यक्तिमत्वाचा विशेष पैलू आहे.

उद्यमी – सौजन्यशील अशा सर्व जोशी कुटुंबियाना त्यांच्या भविष्यातील योजनांसाठी अनेकानेक शुभेच्छा..!!

--००--

विलेपारल्यातील बलुत २ / ७

# गोखले कुटुंबीय आणि विष्णू स्टोअर्स

मॅट्रिकची म्हणजे तत्कालीन अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्याला आता नेमकी पन्नास वर्षे झाली. त्यावेळी रोज घरातून निघून शाळेत जाण्याच्या वाटेवर असलेली प्रत्येक इमारत आणि दुकान आजही पक्के स्मरणात आहे. माननीय बाबुराव परांजपे यांच्या बेस्ट सिल्व्हर कंपनीचे दुकान त्यावेळी परांजपे बंगल्याच्या आवारात होते. त्या बंगल्याच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला लागून विष्णू स्टोअर्स हे दुकान त्यावेळी जाता येताना रोज दिसत असे आणि अर्थात अजूनही दिसतेच. आजूबाजूच्या परिसरात खूप बदल झाले तरी तेंव्हापासून विष्णू स्टोअर्स दुकानाचा दर्शनी भाग फारसा बदलला नाही. हे दुकान स्थापन करणारे पुरुषोत्तम विष्णू गोखले, त्यांचा मुलगा महेश आणि त्याची पत्नी सौ उमा आणि पुढच्या तिसऱ्या पिढीतील तेजस आणि श्रेयस गोखले अशा तीन पिढ्यांचा आणि गेल्या सत्तर वर्षांतील विष्णू स्टोअर्सच्या प्रगतीचा आलेख, आजच्या या विलेपारल्यातील बलुतेदारांच्या सातव्या लेखात मांडला आहे.

विलेपारले रेल्वे स्टेशनच्या अगदी समोर पूर्वेला थोडे चालत पुढे यावे आणि एखाद्या दिवशी संध्याकाळी महात्मा गांधी रोडवर फेरफटका मारावा, की झगमगणाऱ्या निऑनच्या दिव्यांनी सजलेल्या आकर्षक महिरपी प्रत्येक दुकानाच्या नावाचे दर्शन देतात. तयार कपडे – साड्या – सोन्याचे अलंकार – खेळणी – आकर्षक चस्मे – किराणा - तयार खाऊ – चोकोलेट – बिस्किटांची दुकाने आणि दोन – चार हॉटेलं आणि दाटीवाटीने वसलेले भाजीपाला आणि फळांचे ठेले यांनी हा शॉपिंग स्ट्रीट कायम गजबजलेला असतो. हनुमान रोड सिग्नल ते नेहेरू रोड सिग्नल यांना जोडणाऱ्या परिसरातला हा रस्ता आता महत्वाची बाजारपेठ झाला आहे. परांजपे बंगल्याच्या आवारातल्या, रस्त्याच्या दर्शनी बाजूकडे असलेल्या व्यंकटेश हॉटेलने आकर्षक अंतर्गत सजावट धारण करून कात टाकली आहे. एक दुकान पलीकडे असलेले विष्णू स्टोअर्स मात्र अजूनही सत्तर वर्षे जपलेला सौम्य – गंभीर – मध्यम वर्गीय चेहेरा आणि ग्राहकांचा विश्वास धारण करून उभे आहे.

भिडे – बागुल – साठे – सप्रे या वाण सामान विक्रेत्या नामवंत मराठी कुटुंबांची, एक शतकाहून दीर्घ परंपरा विलेपारल्याला

लाभली आहे. विलेपारल्याच्या सांस्कृतिक परंपरेने जसे रसिक प्रेक्षक आणि श्रोते घडवले अगदी तसेच दर्दी,चोखंदळ - रसिक ग्राहक आणि खवय्ये घडवण्याचे काम याच आदर्श मराठी व्यापार्यांनी केले आहे. विष्णू स्टोअर्सचे गोखले कुटुंब अगदी थेट याच मराठी व्यापारी परंपरेतले.

स्वातंत्र्यपूर्व काळात, श्री विष्णुपंत गोखले यांचे विरार येथे वाण सामानाचे दुकान होते. श्री विष्णुपंत गोखले यांचा अनपेक्षित अकाली मृत्यू झाला आणि चिरंजीव श्री पुरुषोत्तम गोखले यांना आपल्या जयंत आणि अनंत या दोन भावांसह, आपले विरार मधील वास्तव्य सोडून, आपल्या बहिणीकडे विलेपारल्यात स्थलांतर करावे लागले होते. विरारमधे असताना वडिलांच्या वाण सामानाच्या व्यापाराचा अनुभव पुरुषोत्तमच्या गाठीशी होता. वीस – बावीस वर्षाच्या पुरुषोत्तमला तोच वडिलोपार्जित व्यापार पुन्हा सुरु करण्याची जिद्द होती. हा तरुण पुरुषोत्तम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिस्तीत वाढलेला होता. वाण सामानाचे दुकान सुरु करावे या उद्देशाने, तत्कालीन विलेपारल्यातील समाजाचा आधारवड असलेल्या माननीय श्री बाबुराव परांजपे यांची पुरुषोत्तमने भेट घेतली. दुकानासाठी परांजपे बंगल्याच्या

आवारातील जागा मिळाली आणि १९४९ मधे पुरुषोत्तमने आपल्या वडिलांच्या नावाने विष्णू स्टोअर्सचि स्थापना केली. सत्तरी पार केलेला, विलेपारल्याच्या DNA च्या जडणघडणीला सहाय्यभूत असलेला हा एक महत्वाचा बलुतेदार.

पोटापाण्याचा व्यवसाय म्हणजे विष्णू स्टोअर्स ही उपजीविका आणि आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जिव्हाळयाची संघटना, पुरुषोत्तम गोखले यांची जीविका होती. संघाच्या गणवेशातल्या पुरुषोत्तम गोखले यांना आपल्या दुकानात काम करताना अनेकदा पाहिल्याचे वाचकाना निश्चित स्मरत असेल. सौम्य स्वभावाचे गोखले कष्टाळू होते. दुकानाच्या स्थापने नंतरच्या तीस - बत्तीस वर्षात स्थिरावलेल्या व्यवसायाची पक्की गणिते तयार झाली होती आणि ग्राहकांचा विश्वास आणि विकल्या जाणाऱ्या मालाला पसंती मिळाली होती. धान्य – कडधान्य यासह विलेपारल्यातील चिकित्सक गृहिणीच्या आणि तिच्या कुटुंबाच्या रसना कौशल्य – रुचीला स्वीकृत आणि सणवार – व्रत - वैकल्यासाठीचे आवश्यक असे दर्जेदार वाण सामान - तयार पीठे हा गोखल्यांच्या विष्णू स्टोअर्सचा मुख्य परिचय होता. आजच्या मार्केटिंग तंत्राच्या भाषेत विष्णू स्टोअर्स हा ब्रॅंड तयार झाला होता. ग्राहकांची ब्रॅंड लॉयल्टी

प्राप्त झाली होती. दुर्दैवाने पुरुषोत्तम गोखले अल्पजीवी ठरले. त्यांच्या नंतर १९८२ मधे आता दुकानाची जबाबदारी, मुलगा महेश गोखले याच्याकडे आली होती.



< श्री तेजस - श्रीमती उमाताई - श्री श्रेयस

सौम्य आणि शांत स्वभाव – नियमितपणा – वक्तशीर व्यवहार अशा महेश गोखले यांनी पुढील वीस वर्षात वडिलांनी आखून दिलेल्या चौकटीत विष्णू स्टोअर्सचा व्यापार - व्यवहार सांभाळला. दुर्दैवाने, महेश गोखले यांचाही २००४ मधे अकाली मृत्यू झाला. पत्नी श्रीमती उमाताई आणि कुटुंबाला हा मोठाच धक्का होता. दोन्ही मुले शाळा आणि कॉलेजात शिकत होती. या गंभीर परिस्थितीत उमाताईंनी स्वतःला सावरले आणि या धैर्यशील – खंबीर गृहिणीने दुकान अन्य व्यवसायीकाला चालवायला देण्याचा निर्णय घेतला होता.

दुकान चालवायला दिलेल्या व्यवहाराचा कालावधी वर्ष २००७ मधे पूर्ण झाला होता. श्रीमती उमाताई आणि महेश गोखल्यांचा मोठा मुलगा तेजस, इलेक्ट्रोनिक या विषयातले शिक्षण पूर्ण करून, विष्णू स्टोअर्सच्या वडिलोपार्जित व्यवासायची जबाबदारी घेण्यासाठी सिद्ध झाला होता. उमाताईंनी दिलेला सल्ला आणि पाठींबा यामुळे २००७ मधे तेजस गोखले या तेवीस वर्षांच्या तरुणाने विष्णू स्टोअर्स या दुकानाची मांडणी पुन्हा सुरु केली होती. व्यवसायाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी खेळत्या भांडवलाची प्रमुख गरज होती. त्यासाठी गोखले कुटुंबीयांन काही धाडसी निर्णय घ्यावे लागले होते. या दोन्ही तरुणांच्या कष्टातून, विष्णू स्टोअर्सचि पुन्हा ऊर्जितावस्थेकडे झालेली वाटचाल हे या धाडसी निर्णयाचे फलित आहे. “साहसे श्री प्रतिवसति” हेच खरे असे म्हणावेसे वाटते.

विलेपारल्यातील बलुतेदारांच्या कारकीर्दीचा अभ्यास करताना, त्यांच्या व्यवसाय कौशल्य – प्रगती – वृद्धीचा आलेख चित्रित करताना भेटलेले सर्वात तरुण उद्यमी व्यापारी म्हणजे विष्णू स्टोअर्सचा तेजस गोखले आणि त्याचा धाकटा भाऊ श्रेयस गोखले. सळसळता उत्साह – असंख्य स्वप्न – निश्चित ध्येय धारणा

तरीही सावध पवित्रे, अशा तरुणाईच्या सजग आणि साक्षर व्यवहारांचा, मला नव्याने परिचय झाला.

आक्रमक मार्केटींगच्या या जमान्यात, विलेपारल्याच्या या मोठ्या बाजारपेठेतील प्रत्येक दुकानाच्या बाह्यरुपात आणि अर्थातच अंतर्गत सजावटीत महत्वाचे बदल नियमितपणे घडत राहिले. खरे सांगायचे तर विष्णू स्टोअर्सच्या दर्शनी बाह्यरुपात, गेल्या साठ – सत्तर वर्षांत फार बदल झाले नाहीत. दुकानाची प्रगती होत होती तरी दुकानाच्या आतल्या उपलब्ध मार्यादित जागेचे व्यवस्थापन याचा विचार कौशल्याने करणे आवश्यक होते. तेजस गोखलेशी झालेल्या संवादातून दुकानाच्या जागेचा वापर अर्थात Optimum Space Utilisation किती चातुर्याने केले आहे त्याचा परिचय झाला.

कुठल्याही व्यापार – व्यवसायाच्या प्रगतीचा आलेख चित्रित करताना काही मापदंड तपासणे आवश्यक असते. व्यवसाय विस्तार आणि धाडसी निर्णय हे दोन्ही प्रत्येक व्यवसायिकाच्या हातात हात घालूनच प्रवास करत असतात. आपल्या परिसरातील – दुकानात येणाऱ्या नियमित ग्राहकाच्या बदलत्या रुची आणि गरजांचा सूक्ष्म अभ्यास करणारा व्यापारी नेहेमीच यशस्वी झाला

आहे. आपल्या प्रत्येक बलुतेदाराची ही प्राथमिक गुणवत्ता आहे. विष्णू स्टोअर्सच्या नियमितपणे मार्गी लागलेल्या वाण सामान व्यवसायाला पूरक आणि दर्जेदार पदार्थांची जोड दिली गेली होती. प्रत्येक कुटुंबात लोकप्रिय असलेला तयार खाऊ म्हणजे चिवडा – चकल्या – शेव – लाडू. सुरुवातीला उमाताई हे सर्व पदार्थ घरीच तयार करत असत. जशी मागणी वाढली तसे आपल्या अपेक्षित प्रतीचे आणि चवीचे असे पदार्थ पुरवठादारांकडून बनवून घेतले जाऊ लागले. यामुळे खाऊच्या पदार्थातील वैविध्य आणि वाढलेली मागणी याबरोबरच दुकानाच्या जागेचे नियोजन सहज झाले.

शिक्षण आणि नोकरी – व्यवसायासाठी अनेक कुटुंबातील तरुण – तरुणी परदेशांत वास्तव्य करतात. दिवाळीच्या उत्सवप्रसंगी हे सर्व खाऊचे पदार्थ नीटनेटके पॅक करून खास दिवाळी हॅम्पर बनवले गेले आणि परदेशातील अशा अनेक शहरांमध्ये याची विष्णू स्टोअर्स तर्फे निर्यात सुरु झाली. यापुढे आपणच या सर्व पदार्थांची स्वतः निर्मिती करायची आणि फ्रॅंचाइशि दुकानांची साखळी उभी करायची जिद्द या तरुण व्यापाऱ्यांनी धारण केली आहे.

लोकमान्य सेवा संघ, पारले ही संस्था म्हणजे विलेपारल्याच्या हृदयावरचा जणू कौस्तुभमणी. या संस्थेतले संवेदनशील युवक – युवती, समाजातील “नाही रे” वर्गाच्या आणि त्या कुटुंबातील छोट्या मुलांच्या भावनांच्या सूक्ष्म जाणीवा नेमकेपणी नोंदवतात. २०१९ च्या दिवाळीत खाऊच्या पाकिटांचि भेट देऊन हे युवक – यवती त्या कुटुंबांच्या आणि छोट्या मुलांच्या आनंदात सहभागी झाले. चार सहा प्रकारचे खाऊ असलेली काही हजार पाकिटे दोन – तीन दिवसात तयार करणे हे मोठेच आव्हान होते. पहिल्या टप्प्यानंतर काही हजार पाकिटांची गरज पुन्हा निर्माण झाली. विष्णू स्टोअर्सच्या या दोन युवा उद्योजकांनी हे आव्हान स्वीकारले आणि अडीच दिवसात पुन्हा काही हजार खाऊची पाकिटे बनवली गेली. यासाठी आपल्या Vendor म्हणजे अनेक पुरवठादारांच्या सहाय्याने केलेले वेळेचे नियोजन (Outsoursing Management) हे अंगभूत चातुर्य आणि कौशल्याचे, या बलुतेदाराच्या क्षमतेचे अनुभवसिद्ध प्रमाण आहे.

विष्णू स्टोअर्सच्या व्यवसाय विस्ताराच्या पुढच्या टप्प्यावर आता आंब्याचा प्रवेश झाला होता. वाशीच्या घाऊक बाजारातील

व्यापारी आणि थेट कोंकण परिसरातील आंबा बागाईतदार यांच्याकडून एप्रिल – मे महिन्यात दर्जेदार आंब्याची खरेदी सुरु झाली. हा प्रयत्न पहिल्याच वर्षी यशस्वी झाला. आंब्याची पसंती तो चाखल्याशिवाय मिळत नाही. ग्राहकाला आग्रहाने आंब्याच्या ताज्या फोडींचा आस्वाद देण्याची कल्पना हे या यशाचे मुख्य गमक होते.

विष्णू स्टोअर्सच्या श्रीमती उमाताई – श्रेयश – तेजस यांचेसह सर्व गोखले कुटुंबियांना अनेकानेक शुभेच्छा…!**--००--**

विलेपारल्यातील बलुत / ८

# सप्रे कुटुंबीय आणि सप्रे आणि मंडळी

विलेपारल्यातील नागरी वस्तीची प्राथमिक जडणघडण आणि कालांतराने त्यात नियमितपणे झालेला विस्तार या किमान पावणेदोनशे वर्षे घडत राहिलेल्या प्रक्रियेला एक अनोखी शिस्त आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील अनेक उपनगरांच्या इतिहासाचा मागोवा घेतांना, विशेषतः वांद्रे – खार -- सांताक्रूझ या उपनगरांच्या पश्चिमेकडील (रेल्वेच्या पश्चिमेला) आणि विलेपारले पूर्व आणि पश्चिमेच्या नागरी वस्तीची मांडणी किमान दीडशे वर्षांपासून खूप शिस्तीत झालेली दिसते. माझा संदर्भ आहे तो खास करून नगर रचनेच्या व्यवस्थेला.

तत्कालीन मुंबई शहर आणि विशेषतः विलेपारले उपनगराच्या जडणघडणीत अनेक महत्वाच्या घटना घडल्या. त्यातली विशेष उल्लेख करावा अशा दोन घटना आहेत. वर्ष १८४५ मधे लेडी जमशेटजी जीजीभॉय यांनी स्वतःच्या निधीतून बांधून दिलेला, मुंबई शहर आणि उपनगराना जोडणारा माहीम कॉजवे हा पूल. त्यानंतर एकशेपासष्ट वर्षांपर्यंत, मुंबई शहर आणि उपनगराना जोडणारी ही एकमेव महत्वाची जोडणी होती. त्यानंतर

वर्ष २००९ मधे, वांद्रे पश्चिम आणि वरळी याना जोडणारा सी लिंक हा ५६०० मीटर लांबीचा वैशिष्ट्यपूर्ण पूल बांधला गेला.

वर्ष १८५१ मधे बॉम्बे, बरोडा अँड सेन्ट्रल इंडिया रेल्वे अर्थात बी बी अँड सी आय रेल्वे या कंपनीची झालेली स्थापना, ही विलेपारले उपनगराच्या जडणघडणीत घडलेली दुसरी महत्वाची घटना होती. या कंपनीने, चर्चगेट ते विरार या रेल्वे मार्गाची बांधणी, १२ एप्रिल, १८६७ या दिवशी पूर्ण केली होती. नंतरच्या काळात ही रेल्वे लाईन कुलाब्यापर्यंत विस्तारित झाली होती. या रेल्वे मार्गावर चर्चगेट नंतर, ग्रॅन्टरोड, दादर, वान्द्रे, अंधेरी, बोरीवली आणि विरार अशी सुरुवातीची स्थानके, बांधली गेली होती. वेस्टर्न रेल्वे नकाशावर आजही हीच प्रमुख स्थानके दर्शवली जातात. सांताक्रूझ रेल्वे स्थानक १८८८ मधे बांधले गेले होते. श्री गोकुळदास  तेजपाल याच्या आर्थिक देणगीतून, त्यांनी दिलेल्या जमिनीवर, वर्ष १९०६ मधे विलेपारले रेल्वे स्थानकाची निर्मिती झाली होती. स्थानक होण्याच्या आधी ट्रेन इथे थांबत असे. मात्र प्रवाशांना उतरण्यासाठी पोर्टर दरवाजाला शिड्यां लावत असत.

असा १८५१ ते १९०६ या साधारण पन्नास – पंच्चावन्न वर्षांच्या काळातील घटनांमुळे, आपले विलेपारले उपनगर प्रथमच मुंबईच्या नकाशावर अंकित झाले होते. वर्ष १९३० मधे बांधला

गेलेला आणि १९४७ पर्यंत ब्रिटीश रॉयल एअर फोर्स च्या ताब्यात असलेला सांताक्रूझ – विलेपारले परिसरातील एअरपोर्ट, स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारत सरकारच्या अधिपत्याखाली आला होता. वर्ष १९३२ मधे विलेपारले पश्चिमेचा विमानतळ बांधून पूर्ण झाला आणि यामुळे आपले विलेपारले उपनगर, जागतिक नकाशावर अंकित झाले होते.

विलेपारल्याच्या ईशान्येला तेजपाल कुटुंबाची मोठी शेत जमीन होती. तिथे एक मुख्य रस्ता बनवून (सध्याचा तेजपाल स्कीम मुख्य रस्ता) त्याला काटकोनात पाच छोटे रस्ते बनवले आणि ४०० / ५०० वाराचे जमिनीचे प्लॉट घरे बांधण्यासाठी विक्रीसाठी उपलब्ध करून दिले. याच आजच्या तेजपाल स्कीमच्या पाच गल्ल्या. याचवेळी श्री विष्णू बाळकृष्ण परांजपे (चांदीवाले परांजपे – माननीय श्री बाबुराव तथा श्री मोरेश्वर परांजपे यांचे वडील) यांनीही आपल्या मालकीच्या जमिनीचे प्लॉट पाडून घरे बांधण्यासाठी विक्रीसाठी उपलब्ध केले. परांजपे ए स्कीम आणि परांजपे बी स्कीम या नावाने या रस्त्याना आपण आज ओळखतो. यामुळे विलेपारल्यात नवी नागरी वस्ती, झपाट्याने प्रगत होत होती. वर्ष १९२१ मधे विलेपारले पूर्व उपनगराची लोकसंख्या

७००० हजार होती. दहा वर्षांनंतर १९३१ मधे ती दुपटीने वाढून १५८६८ झाली आणि वर्ष १९४१ मधे पाच पटीने वाढून ३८४९३ इतकी झाली होती.

विसाव्या शतकाच्या मध्यापासून घडणाऱ्या अशा घटनांच्या आणि त्यातून मुंबईसह विलेपारले उपनगराच्या प्रगतीच्या वार्ता सर्वदूर चर्चील्या जात होत्याच. वर्ष १९४५ पासून देशाच्या शहरा शहरात – गावा गावात, नागरिकाना भारतीय स्वातंत्र्याचे वेध लागले होते, नवी समाज रचना आकार घेत होती. देशभर उत्साहाचे उधाण आले होते. गावा गातील तरुणांना प्रगती हवी होती. त्यातल्या शिक्षित आणि महात्वाकांशी तरुणांना शहरात म्हणजे मुंबईत पोटापाण्याचा व्यवसाय आणि काम शोधायला जाण्याची ओढ लागली होती. आपल्या लेखमालेतील या सर्व बलुतेदारांचे आज दिसणारे यश हे आपल्या उपनगराच्या याच शिस्तबद्ध उभारणीचे फलस्वरूप आहे. आजच्या शब्दात सांगायचे झाले तर मार्केट तयार झाले होते आणि सप्लाय व्हेंडरचि वाट पाहत होते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, अशी स्वप्न घेऊन मुंबईत आणि विलेपारल्यात आलेल्या अनेक नागरिकांनी, इथल्या समाजाचा DNA घडवला आहे. आपापली कुटुंबाची मूळ गावे आणि घरे सोडून खूप तरुण वयांत इथे येऊन स्थायिक झालेल्या

विद्यार्थ्यांना – दांपत्यांना, त्यांच्या अन्न – वस्त्र – निवारा या प्राथमिक कौटुंबिक गरजांसह...त्यांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक अपेक्षांची पूर्तता, हा या DNA चा नक्की आणि नेमका अर्थ आहे. शतकपूर्ती झालेल्या आणि शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या विलेपारल्यातील शैक्षणिक – सामाजिक – सांस्कृतिक संस्था यासह विलेपारल्यातील आपले असंख्य बलुतेदार, हेच सर्व या DNA चे मुख्य घटक आहेत. विसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला, साधरण शंभर वर्षांपूर्वी इथे स्थाईक झालेले, आधी उल्लेख केलेले चतुर आणि दूरदृष्टी असलेले नागरिक हे अगदी प्राथमिक बलुतेदार होते. आजच्या विलेपारले उपनगराच्या प्रतिमेचे पूर्ण श्रेय याच समाज धुरिणांचे आहे. याचे कारण याच नागरिकांनी विलेपारल्याच्या टाऊन प्लांनिंग स्कीमची प्राथमिक आखणी केली होती.

कोकणातील राजापूरजवळ जवळेथर नावाच्या छोट्याशा गावात, राजाराम लक्ष्मण सप्रे या तरुणाच्या कुटुंबाचे, किरण - वाण सामानाचे दुकान होते. तरुण राजाराम १९५५ या वर्षी नशीब आजमावण्यासाठी मुंबईला आला. विलेपारल्याच्या जडणघडणीचा हाच नेमका पोषक काळ होता. कोणा परिचिताच्या ओळखीतून गिरगावातील नानिवडेकर यांच्या दुकानात राजाराम कामाला राहिला. आपले स्वतःचे किराणा - वाण सामानाचे दुकान

मुंबईत असावे असे एकच ध्येय त्याच्या डोळयासमोर होते. नानिवडेकरांच्या दुकानात दोन-तीन वर्षे उमेदवारी झाली होती. मुंबईच्या होत असलेल्या प्रगतीची निश्चित जाणीव नानिवडेकराना होती. किराणा - वाण सामानाचे दुकान काढून व्यापार करायला तुला उत्तम ठिकाण म्हणजे विलेपारले उपनगर. तिथे नवी वस्ती होते आहे, तू तिथे जाऊन प्रयत्न करावा असा सल्ला नानिवडेकरांनी दिला आणि राजारामचा उत्साह द्विगुणीत झाला.



↑ श्री विनय आणि सौ वरदा





↑ श्री नितीन आणि सौ नेहा

राजाराम लक्ष्मण सप्रे यांनी जून १९६० मधे, हनुमान रोड वरील दत्त मंदिराच्या समोर असलेल्या, शिल्प महाल या नावाने परिचित असलेल्या इमारतीत, आपल्या सप्रे आणि मंडळी या

दुकानाची स्थापना केली होती. २०२० हे या दुकानाचे हीरक महोत्सवी वर्ष आहे. आज हे दुकान सप्रे अँड कंपनी या नावाने आपल्याला परिचित आहे. आपला मुलगा विष्णू आणि कामाला दोन – तीन कर्मचारी यांच्यासह दुकानाचा मुहूर्त झाला होता.

विलेपारल्यात वस्तीला येऊन इथेच स्थायिक झालेले बहुतांशी नागरिक आणि त्यांची कुटुंबे कोंकण परिसरातून आलेली होती. आधीच्या लेखांमध्ये याचे वर्णन विस्ताराने केले आहे. या कुटुंब व्यवस्थेमध्ये व्रत-वैकल्ये, मंगलकार्य, दैनंदिन व्यवहार याला परंपरेने आलेली एक निश्चित शिस्त आणि संस्कृती होती. प्रत्येक कुटुंबाची पारंपरिक रुची – रसना आणि खाद्य संस्कृती हे याच कुटुंब संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. आपल्या मूळ गावातील घरात एकत्र कुटुंब पद्धतीत वर्ष भराचे साठवणीचे पदार्थ – मसाले, वेगवेगळी पीठे, कुटुंबातील महिला घरीच बनवत असत. त्याकाळात विलेपारल्यातल्या समाजातील कुटुंबांची ही गरज, राजाराम लक्ष्मण सप्रे यांनी नेमकेपणे ओळखली होती. समाजातील आपल्या ग्राहकांच्या नेमक्या गरजा आणि त्यात नियमितपणे होणारे बदल याचा योग्य परिचय आणि अभ्यास ही राजाराम सप्रे

आणि मुलगा श्री विष्णू सप्रे या आपल्या अन्य बलुतेदारांप्रमाणे याही बलुतेदाराची निसर्गदत्त गुणवत्ता होती.

दुकानातली नियमित आणि वक्तशीर उपस्थिती, स्वच्छ आणि दर्जेदार माल, प्रमाणिक आणि पारदर्शक व्यावहार या सर्व अनुभवांमुळे, सप्रे आणि मंडळींच्या दुकानातील ग्राहकांची वर्दळ दिवसेंदिवस वाढत गेली. श्री राजाराम सप्रे यांचे चिरंजीव श्री विष्णू सप्रे आता या व्यवसायात पारंगत झाले होते. वर्ष १९६० मधे वयाच्या अठरा – विसाव्या वर्षी वडिलांच्या हाताखाली उमेदवारी सुरु करून त्यानंतर वर्ष २०१८ पर्यंत म्हणजे सलग अठ्ठावन्न वर्षे श्री विष्णू सप्रे यांनी दुकानाचे व्यवस्थापन सांभाळले. एक प्रकारे हा विक्रमच म्हणायला हवा.  ग्राहकांचे सामान घरपोच करण्याची जबाबदारी सुरुवातीला त्यांच्यावरच होती. आपल्या कुटुंबातील रोजच्या जेवणातील आवश्यक मसाले बनवण्याच्या खास पारंपरिक पद्धती, त्यांचे वडील श्री राजाराम सप्रे यांनी आपल्या मोडी लिपीत लिहून काढल्या आणि आपल्या घरीच ते बनवायची सुरवात केली. यात नियमित वाढ होत गेली. आजही असे लोकप्रिय चवीचे विविध मसाले खास पद्धतीनुसार, सप्रे कुटुंबाच्या घरीच बनवले जातात. गोडा मसाला – गरम मसाला – मालवणी मसाला – साठवणीची हळद आणि लाल तिखट या सर्व मसाल्याच्या, मोडी लिपीतील फॉर्म्युल्यांच्या नोंदी खास दस्तऐवज

म्हणून, सप्रे आणि मंडळी या दुकानाचे सप्रे कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील श्री विनय आणि श्री नितीन यांनी जपून ठेवल्या आहेत. या दोघांच्या सौभाग्यवती सुद्धा दुकानाच्या व्यवस्थापनात सहभागी आहेत.

विलेपारल्यातील प्रत्येक बलुतेदाराच्या दुकानात उपलब्ध पदार्थांची काही खास वैशिष्ट्ये आहेत. आता नाव बदललेल्या सप्रे अँड कंपनी या दुकानातही स्वतः तयार केलेल्या अनेक मसाल्यांच्या बरोबरच, ज्वारी – बाजरी – तांदूळ याच्या पिठांसह अनेक तयार पीठे ग्राहकप्रिय आहेत. लाडू बनवण्यासाठी खास दळलेले मुग डाळ पीठ – बेसन आणि आंबोळीचे पीठ – मालवणी वडा पीठ - घरगुती मेतकुट – मुखवासाची सुपारी यामुळेच या बलुतेदाराला ग्राहकांच्या ब्रॅंड लॉयल्टीची मोहोर लागली आहे. मात्र ग्राहकांची ब्रॅंड लॉयल्टी मिळायला कारणीभूत झाले आहेत, दुकानात कायम उपलब्ध असलेले साधारण दहा बारा प्रकारचे तयार लाडू. मुग डाळ लाडू – बेसन लाडू – मेथी लाडू – रवा लाडू – नाचणी लाडू – डिंक लाडू या सर्व लाडूना बारा महिने मागणी असते. चिवडा – शेव – चकल्या या बरोबरच हे सर्व लाडू सप्रे अँड कंपनी या दुकानाचा जणू USP बनला आहे.

सप्रे अँड कंपनी या दुकानाचे व्यवस्थापन श्री विनय आणि सौ वरदा आणि श्री नितीन आणि सौ नेहा हे तिसऱ्या पिढीतील सप्रे कुटुंबीय करत असतात. अनेक प्रकारच्या लाडवांसह चिवडा – शेव – चकल्या – मसाले आणि पीठे बनवण्याचे आणि विक्रीचे व्यवस्थापन सौ वरदा आणि सौ नेहा या सप्रे कुटुंबातील महिला करत आहेत. दुकानासह बालाजी कार रेंटल या विस्तारित व्यवसायाचे व्यवस्थापन श्री विनय सप्रे करत आहेत.

जून १९६० मधे स्थापन झालेल्या आणि २०२० मधे स्थापनेचा हिरक महोत्सव साजरा करत असलेल्या, सप्रे अँड कंपनी या दुकानाचा आणि बलुतेदार मालक – व्यवस्थापक सप्रे कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा परिचय करून देणारा हा लेख हा एक छान योगायोग आहे. सर्व सप्रे कुटुंबियाना भविष्यातील उपक्रमांसाठी अनेकानेक शुभेच्छा...!

बलुतेदार लेखासाठी संदर्भ सौजन्य: मुंबई नगरी - लेखक प्रा न र फाटक, विलेपारले स्मृती ग्रंथ लेखक: कै श्री रा ग बर्वे, कै श्री र ब फणसळकर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती प्रकाशित स्मृती सुगंध.

--oo--

विलेपारल्यातील बलुत २ / ९

# श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे आणि कुटुंबीय
# एक्सलसियर लॉन्ड्री

अभूतपूर्व श्री श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे हे आजच्या आपल्या लेखातील बलुतेदार आहेत. विलेपारले उपनगराच्या इतिहासाच्या उपलब्ध नोंदीनुसार, शतकापूर्वी वर्ष १९१६-१७ मधे आपले दुकान थाटून, किराणा वाणसामानाच्या व्यापाराची सुरुवात करणाऱ्या श्रीधर बाळाजी  याना आद्य बलुतेदार म्हणायला हवे. सावकारी आणि कमिशन एजंटचा व्यवसाय करणाऱ्या तत्कालीन विलेपारल्यातील श्री श्रीधर वासुदेव फाटक यांच्या भगिनी रमाबाईचा विवाह श्री श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे यांच्याशी झाला आणि श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे उपाख्य बापूराव, विलेपारल्यात वास्तव्याला आले. नामवंत पारलेकर माननीय कै पु ल देशपांडे यांच्या एका लेखात, श्रीधर बाळाजी यांच्या या दुकानाचा उल्लेख आहे.

आपल्या उपनगराच्या जडणघडणीच्या काळातील शतकापूर्वीच्या या व्यक्ती आणि आता इतिहास बनलेले घटनाक्रम याचा परिचय विस्ताराने करून घ्यायला हवा.



< श्री श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे उपाख्य बापूराव.

एकोणीसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकांत आणि विसाव्या शतकाच्या पाहिल्या दशकांत, निव्वळ दोन हजार लोकवस्तीच्या विलेपारले पूर्व उपनगरात, नागरी वस्तीची वाढ झपाट्याने होत होती. वर्तमानातील बलुतेदारांच्या कारकीर्दीचा आणि प्रगतीचा अभ्यास करत असतांनाच, या सुरुवातीच्या काळातील अनेक बलूतेदारांनी माझे लक्ष वेधून घेतले होते.

कोकण परिसरातून मुंबईत स्थलांतरित झालेल्या अशा दक्षिणी समाजातील कुटुंबांचि वस्ती विलेपारले पूर्व या उपनगरात एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस वाढत होती. परांजपे – फाटक – पारधी – भिडे – आगाशे – पेठे – बागुल – गोखले – ओक – पडवळ – वैद्य – लिमये – वकील पटवर्धन – रानडे – डॉ कांबळी – महंत पडते – शिल्पकार म्हात्रे – जोग -- बेलसरे ही यातली प्रमुख

दक्षिणी ब्राह्मण कुटुंबे होती. सावकारी - व्यापार - उद्योग आणि डॉक्टर – वकील असे पेशा असलेल्या या कुटुंबातील सर्वच स्त्रिया आणि पुरुष हे विलेपारल्यातील आद्य बलुतेदार आणि समाजसेवक होते. या सर्वच कुटुंबांच्या मालकीच्या मोठ्या जमिनी विलेपारल्यात होत्या. याच दूरदर्शी नागरिकांनी, लोकमान्यांच्या स्मृतीपश्चात दोन संस्थांची स्थापना केली होती. आज या दोन्ही संस्था, विलेपारल्याचि प्रमुख ओळख आहेत.

इथे वापरलेले दक्षिणी ब्राह्मण समाज हे संबोधन, त्याकाळात प्रचलित होते. हे कुठलेही ज्ञातिवाचक संबोधन नाही. याला काही भौगोलिक संदर्भ आहे.



< ब्रिटीश राज्यातील मुंबई इलाका.

वरील नकाशातील लाल रंगातील मुंबई इलाका, १९०१ या वर्षीच्या नकाशातील आहे. आजच्या पाकिस्तानातील सिंध प्रांतापासून महाराष्ट्र राज्याच्या

खाली दक्षिणेला  असलेल्या कर्नाटक राज्यातील तत्कालीन उत्तर कर्नाटक प्रदेश अशा या इलाक्याच्या सीमा होत्या. या नकाशातील मुंबई शहर, कोकण परिसर आणि उत्तर कर्नाटक हे प्रदेश या नकाशाच्या दक्षिण दिशेकडे आहेत. या तीनही प्रदेशात वास्तव्य असलेल्या नागरिकांना त्या काळांत दक्षिणी अथवा दक्षिणी ब्राह्मण समाज, असे संबोधित केले जात असे.

आज याचे दोन संदर्भ उपलब्ध आहेत. पहिला संदर्भ असा की लोकमान्य टिळकांच्या निधना आधी एक वर्ष, १९१९ मधे, विलेपारल्यातील नागरिकांनी आपल्या मंडळातर्फे, गोखले कुटुंबाच्या श्रीराम मंदिरात श्रीगणेशोत्सवाची स्थापना केली होती. या मंडळाचे नांव दक्षिणी मंडळी असे होते. लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेच्या वर्ष १९२३ मधील स्थापनेनंतर, वर्ष १९२४ मधे या मंडळाच्या विनंतीनुसार हा श्रीगणेशोत्सव, लोकमान्य सेवा संघ या संस्थेमधे विलीन करण्यात आला. आधीच्या लेखात उल्लेख केल्यानुसार, वर्ष १९२० मधे विलेपारल्याची लोकसंख्या ७००० होती. गेल्याच वर्षी २०१९ मधे, संस्थेच्या या श्रीगणेशोत्सवाची शताब्दी साजरी झाली. लोकमान्य टिळकांची ध्येय-धोरणे  आजही जपणाऱ्या संस्थेच्या श्रीगणेशोत्सवाला,

माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी भेट देऊन, श्रीगणेशाचे दर्शन घेतले होते. या आज या सर्व नोंदी, लोकमान्य सेवा संघाच्या दफ्तरात उपलब्ध आहेत.

याचा दुसरा संदर्भ असा की साधारण गेली १७५ वर्षे, माझे फडके कुटुंबीय, गुजरात मधील बडोदा म्हणजे आजच्या वडोदरा शहरात स्थायिक झाले आहेत. अशी अनेक मराठी भाषिक कुटुंब आजही गुजरातेतील अनेक शहरात वास्तव्य करतात. या सर्वांना आजही दक्षिणी असे संबोधित केले जाते.

श्री गोपाळ रामचंद्र फाटक आणि श्री श्रीधर वासुदेव फाटक यांचे अविभक्त फाटक कुटुंब हा तत्कालीन विलेपारल्यातील एक नामवंत परिवार होता. खूप मोठ्या जमिनी या परिवाराच्या मालकीच्या होत्या. याकाळांत, मशीद बंदर या मुंबईच्या व्यापारी पेठेत या फाटक बंधूंचा, सावकारी आणि किराणा – धान्य – कडधान्याचा कमिशन एजंटचा व्यवसाय होता. यातील श्री श्रीधर वासुदेव फाटक यांचे अल्पवयात निधन झाले. वर्ष १९३४ मधे, त्यांच्या सौभाग्यवती श्रीमती गंगाबाई फाटक यांनी लोकमान्य सेवा संघाच्या वाचनालय आणि ग्रंथालयाला आपल्या दिवंगत पतीच्या

स्मरणार्थ रुपये ५,०००/- देणगी दिली होती आणि ग्रंथालयाला श्रीधर वासुदेव फाटक यांचे नाव दिले जावे अशी इच्छा व्यक्त केली होती. म्हणून आज हे ग्रंथालय श्री वा फाटक ग्रंथसंग्रहालाय या नावाने ओळखले जाते. याच फाटक बंधूंच्या सहकार्याने, श्रीधर बाळाजी सहस्रबुद्धे यांनी आपले किरणा व्यापाराचे दुकान वर्ष १९१६-१७ मधे डॉ कांबळे यांच्या मालकीच्या जागेत स्थापन केले होते. पूर्व पारल्यातून पश्चिम पारल्यात जाण्यासाठी, विलेपारल्याच्या दक्षिणेला एक रेल्वे फाटक होते जे अलीकडच्या काळात बंद झाले आहे. या फटका जवळ, या दुकानाची जागा होती.

मूळ चिपळूण जवळच्या परशुराम या गावात स्थाईक असलेल्या सहस्रबुद्धे कुटुंबातील श्रीधर बाळाजी आणि आण्णासाहेब सहस्रबुद्धे हे दोन बंधू. श्रीधर वासुदेव फाटक यांची भगिनी रमाबाई हिच्याशी विवाह झाल्यानंतर श्रीधर बाळाजी म्हणजे बापूराव, विलेपारल्यात स्थाईक झाले. वर्ष १९१६-१७ पासून वर्ष १९४० पर्यंत, बापुरावांचे दुकान विलेपारल्याच्या दक्षिणेकडील रेल्वे फटका जवळ होते. बापूराव सहस्रबुद्धे हे किराणा दुकान सांभाळत असत तरी त्यांचा मूळ पिंड समाजसेवेचा

होता. नरकेसरी लोकमान्य टिळकांचे विचार आणि नेतृत्व स्वीकारून स्वराज्याचि आकांक्षा बाळगणारे किंबहुना विलेपारल्यातील सर्वच तरुण उद्यमी होतेच, त्याबरोबर परिसरातील समाजाच्या प्रगतीसाठी सातत्याने क्रियाशील होते. लोकमान्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पश्चात विलेपारल्यात दोन मोठ्या संस्था स्थापन करणारे हेच तरुण विलेपारल्याच्या समाजमनाचे शिल्पकार आहेत. आपले बलुतेदार बापूराव सहस्रबुद्धे लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेचे संस्थापक मंडळाचे सदस्य होते.

बापूरावांचे बंधू आण्णासाहेब यावेळी दुकानाचे व्यवस्थापन पाहात होते. त्यामुळे बापूरावांना त्यांच्या समाजकार्याला वेळ देता येत असे. १९३० च्या आसपास, विलेपारल्याच्या वेशीवर पश्चिम द्रुतगती मार्गाच्या पूर्वेकडे असलेल्या परिसरात महारोग्यांची वस्ती होती. या रोगाने बाधित नागरिकांना, बापूराव त्यावेळी औषधोपचार करत असत. त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था करत असत. मधूभाई जाधव यांचे शशिकांत हेअर कटिंग सलून वर्ष १९४५ मधे श्रीराम मंदिरा समोर स्थापन झाले होते. त्याकाळात संध्याकाळी सलून बंद झाल्यानंतर, बापुराव आणि श्री मधुकार

भावे हे दोघे, गरजू विद्यार्थ्यांचे इंग्लिश आणि गणिताची शिकवणी त्या दुकानात घेत असत.

वर्ष १९४० च्या सुमारास बापूरावांचे दुकान, नेहरू रोडवर स्थलांतरित झाले. आज डी मार्टचे दुकान जिथे आहे त्याच ठिकाणी काही काळ हे दुकान होते. आज सारस्वत बँकेची शाखा असलेली श्रीमती माई फाटकांची इमारत, शहाणे वकिलांची इमारत या नेहरू रोडवरील परिसरापासून मालवीय रोडवर असलेल्या मातृछाया इमारती पर्यंतचा सर्व परिसर त्याकाळात अविभक्त फाटक कुटुंबाच्या मालकीचा होता. बापूराव सहस्रबुद्धे यांच्या वर्ष १९५२ मधे झालेल्या मृत्युच्या आधी हे किराणा वाण सामानाचे दुकान, शहाणे वकिलांच्या इमारतीत स्थलांतरित झाले होते. एकेकाळी ही इमारत सुद्धा फाटक कुटुंबाच्या मालकीची होती. आज या जागी एक्सलसियर लॉन्ड्रीचा व्यवसाय वृद्धींगत झाला आहे.

वर्ष १९५८ मधे, बापूरावांच्या किराणा वाण सामानाचा व्यवसाय बंद करून एक्सलसियर लॉन्ड्रीच्या व्यवसायाची सुरुवात म्हणजे बापूरावांच्या उद्यमशील कुटुंबातील एका कर्तुत्ववान आणि धाडसी महिलेच्या व्यवसाय व्यवस्थापन कौशल्याचा आणि यशाचा आलेख आहे.




< एक्सलसियर लॉन्ड्रीचा जुना फोटो.

बापूरावांचे सुपुत्र श्री दत्तात्रय श्रीधर सहस्रबुद्धे (आबा) आणि त्यांच्या सौभाग्यवती श्रीमती सुशिलाताई हे दाम्पत्य या सहस्रबुद्धे कुटुंबातील दुसऱ्या पिढीतील उद्योजक बलुतेदार आहेत. श्रीमती सुशिलाताई या पूर्वाश्रमीच्या इंदुताई जोगळेकर. आपल्या लेखमालेतिल एक नामवंत बलुतेदार, जीवन हॉटेलचे श्री आप्पासाहेब जोगळेकर यांची, सुशीलाताई मोठी बहिण आहेत. हे सर्व जोगळेकर कुटुंबीय उद्यमशीलतेचा निसर्गदत्त वारसा घेऊन आले आहेत.

या नंतर एक काळ असा आला की किराणा वाण सामानाच्या व्यवसायात म्हणावी तशी आमदनी होत नव्हती. बापूराव वृद्धत्वाकडे झुकले होते आणि बंधू आण्णासाहेब आपल्या गावी परशुराम येथे परतले होते.बापूरावांचे सुपुत्र श्री दत्तात्रय श्रीधर

सहस्रबुद्धे (आबासाहेब) नोकरीसाठी काही काळ चिपळूण मधे गेले होते.



< श्रीमती सुशीला दत्तात्रय सहस्रबुद्धे, पूर्वाश्रमीच्या इंदुताई जोगळेकर.

बापूरावांच्या किराणा व्यवसायावर कार्जाचा बोजा होता. अशावेळी बापूरावांची सून, दोन मुलांची आई असलेल्या श्रीमती सुशिला दत्तात्रय सहस्रबुद्धे यांनी त्यांचे मामा श्री टिळक यांच्या सल्ल्याने किराणा वाण सामानाचा व्यवसाय बंद करून वर्ष १९५८ मधे एक्सलसियर लॉन्ड्री या व्यवसायाची स्थापना केली होती. त्याकाळात, सुशिलाताईंचे मामा श्री टिळक यांचा, दादर येथे रानडे रोडवर ड्रायफ्रुट विक्रीचा आणि लॉन्ड्रीचा व्यवसाय होता. लॉन्ड्रीच्या व्यवसायात याच टिळक मामांचे मार्गदर्शन उपलब्ध झाले होते.

आपल्या प्रत्येक उद्यमशील बालुतेदाराचे व्यक्तिमत्व, धाडस – दूरदृष्टी – दीर्घ परिश्रमाची तयारी – चातुर्य या आणि अशा नैसर्गिक गुणवत्तेने समृद्ध असे आहे.



**< श्री दत्तात्रय श्रीधर सहस्रबुद्धे, (आबा)**

सुशिलाताईच्या माहेरच्या जोगळेकर कुटुंबाची निसर्गदत्त उद्यमशील वृत्ती आणि बापूसाहेब सहस्रबुद्धे यांच्या उद्योगाचा वारसा या दोन्हीचि पार्श्वभूमी त्याना लाभली होती. नेहरुरोड परिसर नेहमीच गुजराती बहुल वस्तीचा परिसर म्हणून ओळखला जातो. याच गुजराती ग्राहकांचा लॉन्ड्रीच्या व्यवसायाला प्रतिसाद मिळाला आणि पसंतीही मिळाली.




**< एक्सलसियर लॉन्ड्री.**

कालांतराने सुशिलाताईंनी फटाके विक्रीचा परवाना मिळवून दिवाळीमधे फटाक्यांची विक्री सुरु केली होती. याबरोबरच मार्च – एप्रिल महिन्यात दर्जेदार आंब्याची विक्रीही सुरु झाली.

कोकणातील आंबा बागाईतदारांकडील उत्तम स्वादाचा हापूस आंबा विक्रीसाठी दुकानात उपलब्ध झालं होता. या दोन्ही प्रासंगिक – नैमित्तिक व्यवसाय उपक्रमांना उत्तम ग्राहक प्रतिसाद मिळाला.

नव्वदी पार करून वयाच्या शंभरीकडे वाटचाल करणाऱ्या कर्तुत्ववान सुशिलाताई सहस्रबुद्धे, आता ब्याण्णव वर्षाच्या आहेत. वयाच्या सत्तरीपर्यंत, म्हणजे वर्ष २००० पर्यंत, साधारण चाळीस वर्षे त्यांनी एकहाती दुकानाचे व्यवस्थापन सांभाळले आहे. आपल्या विलेपारल्यातील बलुतेदार या लेखमालेतील त्या पहिल्या महिला बलुतेदार आहेत.



**<श्रीमती स्वाती सुहास सहस्रबुद्धे.**

एका शतकाचा वारसा असलेल्या बापूरावांचा बदललेला व्यवसाय एक्सलसियर लॉन्ड्रीने वर्ष २०१८ मधे आपला हीरक महोत्सव साजरा केला. सुशिलाताईंनी निवृत्ती घेतल्यानंतर सहस्रबुद्धे कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील त्यांची सून श्रीमती स्वाती सुहास सहस्रबुद्धे यांनी

एक्सलसियर लॉन्ड्रीचा व्यवसाय, गेली अठरा वीस वर्षे समर्थपणे सांभाळला आहे. स्वातीताई स्वतः मेकॅनिकल इंजिनीआर आहेत. सौम्य स्वभावधर्म असलेल्या या दोन महिला उद्योजक, सुशिलाताई आणि स्वातीताई जरी आपल्याला परिचित असल्या तरी त्यांचा उद्योजिका असा परिचय अप्रकाशित राहिला आहे. बापूराव सहस्रबुद्धे आणि त्यांच्या पुढच्या पिढीतील या दोन उद्योजीकांचा असा परिचय या लेखाच्या निमित्ताने करून देताना आनंद होतो आहे.



**< डॉ सुहास सहस्रबुद्धे.**

सुशिलाताईंचा मुलगा डॉ सुहास (चित्र क्र ८), दुर्दैवाने अप्लायुशी ठरला. ऑरगॅनिक केमिस्ट्री मधे डॉक्टरल आणि पोस्ट डॉक्टरल पदव्या त्याने प्राप्त केल्या होत्या. डॉ सुहास, अनेक परदेशी कंपन्यांमधे अधिकाराच्या पदावर काम करताना त्याचे वास्तव्य काही काळ परदेशात होते. डॉ सुहासच्य नावावर सात आंतरराष्ट्रीय पेटंट नोंदलेली आहेत. सुशिलाताईंची मुलगी, श्रीमती स्मिता

पुराणिक, लोकमान्य सेवा संघाच्या माजी कार्यवाह आहेत. बापूरावांचा लोकसेवेचा वारसा त्यांनी पुढे चालू ठेवला आहे.



**<श्रीमती स्मिता पुराणिक.**

विलेपारल्याच्या DNA चे हे घटक म्हणजे आपले सर्व अप्रकाशित बलुतेदार. बापूराव सहस्रबुद्धे आणि त्यांच्या पुढच्या पिढीतील उद्योजक महिला, यांनी वर्ष १९१६-१७ मधे स्थापन झालेल्या आणि आज वृद्धींगत होऊन यशाच्या शिखरावर असलेल्या व्यवसायाची ही शतकपूर्ती, नविन पिढीतील उद्योजकांना निश्चितच प्रेरणादायक आहे. सुशिलाताई आणि स्वातीताई यांचे कर्तुत्व आणि मागोमाग मिळालेले यश याचा उद्योजक युवतींनी अवश्य अभ्यास करावा.

सुशिलाताई - स्वातीताई यांच्यासह सर्व सहस्रबुद्धे कुटुंबियांना अनेकानेक शुभेच्छा...!

--oo--

विलेपारल्यातील बलुत २ / १०

# गंगाबाई इंदुलकर कुटुंबीय आणि श्री रघुवीर स्टोअर्स

कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला...या प्रसिध्द गाण्याच्या मुखड्यातून ध्वनित होणारा भावार्थ आपल्याला नक्कीच माहीत आहे. श्री श्रीधर विठ्ठल इंदुलकर या बाबाने अडुसष्ट वर्षांपूर्वी असे एक रोपटे, वर्ष १९५२ मधे विलेपारल्यातील हनुमान रोडवर लावले होते. कुटुंबाच्या पुढील पिढ्यातील सर्वांसाठी लावलेला तो कल्पवृक्ष म्हणजे श्री रघुवीर स्टोअर्स.




< श्री रघुवीर स्टोअर्स, हनुमान रोड

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या काळांत अनेक धाडसी आणि महत्वाकांक्षी तरुण आपली स्वप्ने घेऊन मुंबईत दखल झाले होते. विलेपारल्यातील बलुतेदार या आपल्या लेखमालेत, अशा उद्यमनीतीची निसर्गदत्त प्रेरणा घेऊन आलेल्या गुणवान उद्योजकांचा परिचय आपण करून घेतला आहे. आपले हे सर्वच बलुतेदार, विलेपारल्याच्या समाजाच्या बांधणीतील DNA गुणतत्वाचे महत्वाचे घटक आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या त्या काळात मुंबई शहर आही उपनगरातील प्राथमिक गरजांची विकास कामे सुरु झाली होती तरी विलेपारल्यातील बहुतांशी रस्ते मातीचे होते. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातिल केरोडे गावातून श्री श्रीधर विठ्ठल इंदुलकर, वर्ष १९४७ मधे मुंबईत आले होते. सुरुवातीला बर्माशेल या कंपनीत त्यांना नोकरीही मिळाली. मात्र स्वतःचा व्यवसाय करण्याचे स्वप्न उराशी घेऊन आलेल्या इंदुलकराना स्वस्थता नव्हती. व्यवसायासाठी जागेचा शोध करत असताना, पारले टिळक विद्यालयासमोरील बोरगावकरांच्या चाळीत हनुमान रोडवर दर्शनी भागात छोटीशी जागा मासिक भाडेतत्वावर त्यांना मिळाली होती.

भाड्याने मिळालेल्या जागेची सोय झाल्यानंतर, श्री श्रीधर विठ्ठल इंदुलकर यांनी वर्ष १९५२ मधे श्री रघुवीर स्टोअर्सची

स्थापना केली होती. अगदी समोरच मोठी शाळा असल्याने वह्या – पाट्या – पाटीच्या पेन्सिली - शाईची पेनं आणि शाई – पट्ट्या - कंपास पेट्या आणि गोळया - बिस्किटे अशा गोष्टी दुकानात उपलब्ध झाल्या होत्या. अगदी सकाळपासून पालक – विद्यार्थ्यांची वर्दळ सुरु झाली की शाळेतील साहित्याची किरकोळ विक्री सुरु होत असे. ट्रेन पकडण्यासाठी सकाळी रेल्वे स्टेशनकडे जाणारे आणि संध्याकाळी परत येणारे नागरिक जाता येत अशा सामानासाठी दुकानात थांबून आनंदाचे चार सहा शब्द बोलून ... दोन वस्तु विकत घेत असत. दुकानाच्या व्यवसायाचा असा जम बसू लागला होता. दाहा-बारा वर्षांमधे मनासारखी प्रगती झाली होती. मात्र नियतीची मांडणी वेगळीच होती. वर्ष १९६४ / ६५ च्या दरम्यान श्री श्रीधर इंदुलकर आजारी पडले आणि योग्य उपचार व्हावे आणि आराम मिळावा म्हणून काही दिवस गावी गेले. मात्र गावी जाताना दुकानाची जबाबदारी त्यांनी मोठ्या बंधूंवर सोपवली होती. गावी घरी गेल्यानंतर दुर्दैवाने, वर्ष १९६८ मधे श्रीधर इंदुलकरांचा आजार बळावला आणि त्यांचा अकाली मृत्यू झाला, कुटुंबावर आकाश कोसळले.

श्री श्रीधर इंदुलकरयांच्या सौभाग्यवती - चार मुलांची आई श्रीमती गंगाबाई यावेळी साधारण ३७/३८ वर्षांच्या होत्या. चारही मुले लहान होती, कमावता हात देवाघरी गेला होता तरी या

माऊलीने धीर सोडला नाही. मोठे दीर विश्वासाने दुकान चालवत होते तरी त्यानाही फार दगदग होत होती. श्री श्रीधर इंदुलकर यांच्या मृत्युनंतर, मोठ्या दिराने १९७१ मधे हे दुकान, पुढील पांच वर्षे भाड्याने चालवायला देण्याचा निर्णय घेतला होता.

इंदुलकर यांचे दुकान भाड्याने देणे आहे अशी माहिती अगदी शेजारी रहाणाऱ्या दोन मित्रांच्या कानावर गेली होती. आपलाही व्यवसाय असावा अशा जिद्दीचे हे दोन मित्र इंदुलकराना भेटले – चर्चा झाली आणि पुढील पाच वर्षांसाठी दुकान चालवायला घेण्याचे नक्की झाले. श्री रघुवीर स्टोअर्सच्या मागेच रहाणारे श्री पांडुरंग सप्रे आणि बाजूच्या नरसिंगाश्रमात रहाणारे श्री परशुराम उपाख्य राजाभाऊ हर्डीकर, हेचे ते दोन मित्र. राजाभाऊ हर्डीकर हे आपल्या अभूतपूर्व मासिकाचे मालक – संपादक श्री अनील हर्डीकर यांचे वडील. या उपक्रमात सौ शुभांगीताई सप्रे आणि सौ मंगलाताई हर्डीकर या दोघी गृहिणींची साथ होतीच. हर्डीकर + सप्रे जोडीच्या या व्यवसायाला सुद्धा आता पन्नास वर्षे होऊन गेली आहेत.

वर्ष १९६८ मधील पती निधनाच्या धक्क्यातून श्रीमती गंगाबाई श्रीधर इंदुलकर आता सावरल्या होत्या. सिंधुदुर्गातील केरोडे गावात राहात असल्या तरी दुकानाच्या, नियमित मिळणाऱ्या

तुटपुंज्या भाड्यावर घर चालवणे म्हणजे तारेवरची कसरतच असावी. मुलेही आता मोठी झाली होती. दुकान चालवायला दिलेला पाच वर्षांचा कालावधी १९७६ भाद्रपद महिन्यात पूर्ण होत होता. त्या आधी दोन महिने, कापडी पिशवीत निव्वळ पन्नास रुपये घेऊन, मुलाना माघारी ठेवून श्रीमती गंगाबाई इंदुलकर विलेपारल्याला आल्या. मुंबई शहर तसे अपरिचितच होते. मात्र विलेपारल्यात रहाणारे नामवंत उद्योजक श्री महादेवराव इंदुलकर यांच्याशी श्रीमती गंगाबाईंचा थोडासा परिचय होता. स्वदेशी ट्रंक मार्ट हे दादर स्टेशन समोरच्या विजयनगर इमारतीत असलेले प्रख्यात दुकान या श्री महादेवराव इंदुलकर यांच्या मालकीचे होते. त्याकाळात प्रवासाला लागणाऱ्या पत्र्याच्या ट्रंका आणि अन्य वस्तू बनवण्याचा मोठा व्यवसाय, श्री महादेवराव इंदुलकर यांच्या मालकीचा होता.

श्रीमती गंगाबाई इंदुलकर यांनी महादेवरावांची भेट घेतली आणि त्यांना सहकार्याची विनंती केली, ती त्यांनी आनंदाने स्वीकाराली होती. नंतरच्या काळांत त्यांचे प्रोत्साहन कायं मिळत होते. दुकान चालवणारे श्री राजाभाऊ हर्डीकर आणि श्री पांडुरंग सप्रे यांची लगेचच त्यांनी भेट घेतली आणि दुकान पुन्हा ताब्यात घेऊन स्वतः व्यवसाय करण्याचा विचार त्यांना बोलून दाखवला. इथे दोन गोष्टी झाल्या होत्या. हर्डीकर + सप्रे या दोन सज्जन आणि

नेमस्त मित्रांनी लगेचच गंगाबाईंची विनंती स्वीकारली आणि दुकान लगेचच त्यांच्या ताब्यात देण्याची तयारी चालू केली. हर्डीकर + सप्रे या सज्जन गृहस्थांच्या जोडीचा, दिलेल्या शब्दाला जागून केलेला हा प्रमाणिक व्यवहार, निश्चितच नोंद घेण्यासारखा आहे. पारलेकर संस्कृतीचे हे वैशिष्ट्य आहे. कोकणातील एका दूरच्या खेड्यातून, सामान्य पार्श्वभूमीतून मुंबईत आलेल्या, फारसे शालेय शिक्षण नसलेल्या एका मध्यमवयीन सबला उद्योजीकेचा जन्म, यावेळी झाला होता.



**↑दोन मुलांसह श्रीमती नंदिनी, श्री चंद्रशेखर आणि श्रीमती गंगाबाई इंदुलकर**

वर्ष १९७६ च्या अनंतचतुर्दशीच्या दिवशी श्रीमती गंगाबाई इंदुलकर यांनी, श्री रघुवीर स्टोअर्सच्या व्यवसायाची पंचवीस वर्षांनंतर नव्याने सुरुवात केली होती. एका छोट्या व्यवसायाच्या प्रगतीचा आलेख नव्याने लिहिला जाणार होता.

श्री चंद्रशेखर इंदुलकर हे श्रीमती गंगाबाई इंदुलकर यांचे सुपुत्र, गावातले शालेय शिक्षण पूर्ण करून, वर्ष १९८१ मधे, त्यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी मुंबईला आले. पुढील तीन वर्षे इलेक्ट्रिशियन या व्यवसायाचे शिक्षण १९८४ मधे त्यांनी पूर्ण केले. १९७६ ते १९८४ या आठ वर्षात श्रीमती गंगाबाई, श्री रघुवीर स्टोअर्सच्या व्यावसायात स्थिरावल्या होत्या. वाढलेल्या व्यवसायामुळे दुकानात आता त्याना मदतीची गराज भासत होती. मुलगा चंद्रशेखरने आईच्या मार्गदर्शनाखाली दुकानात उमेदवारी सुरु केली होती.

शालेय सामानाची मागणी हळूहळू कमी होत गेली होती त्याप्रमाणे श्रीमती गंगाबाई इंदुलकरांनी स्वतः घरी बनवलेल्या घरगुती खाऊच्या पदार्थांची विक्री सुरु केली होती. मुलगा चंद्रशेखरने दोन – चार वर्षांतच दुकानाच्या व्यवसायाची गणिते समजून घेतली आणि यथावकाश पूर्णवेळ दुकानाची जबाबदारी स्वीकारली होती. वह्या – पेन्सिलींची जागा आता चिवडा – लाडू

– चकल्या – पेढे – लाडू आणि अशाच खाऊच्या पदार्थांनी घेतली होती. चंद्रशेखरच्या मातोश्री श्रीमती गंगाबाई घरी राहूनच या सर्व पदार्थांच्या निर्मितीची व्यवस्था पहात होत्या. चंद्रशेखरचे लग्न झाल्यानंतर आता सुनबाई सौ नंदिनी कुटुंबाचे घरातले दैनंदिन व्यवहार पाहात होत्या तसेच दुकानासाठी खाऊचे पदार्थ आणि पेढे घरी बनवायला सहाय्य करत होत्या.

श्रीमती गंगाबाई मुंबईत आल्यानंतर रहाण्याच्या जागेची व्यवस्था श्री महादेवराव इंदुलकर यांच्या सल्ल्याने झाली होती. सर्व मुले कोकणातील घरी असल्यामुळे त्या एकट्याच रहात होत्या. दुकान सुरु केल्यानंतर काहीच काळांत दुकानात मोठी चोरी झाली होती. असे नुकसान होऊन परवडण्यासारखे नव्हते. या माऊलीने धीर सोडला नाही. पुन्हा चोरी होऊ नये या साठी श्रीमती गंगाबाई काही वर्षे रात्री एकट्या दुकानातच झोपत असत. व्यवसायाप्रती एका महिलेची अशी बांधिलकी खूप कौतुकास्पद होती. वर्ष १९७६ मधे दुकानाची पुन्हा सुरुवात करून श्रीमती गंगाबाई इंदुलकर, पुढील ४४ वर्षे, त्यांच्या वयाच्या नव्वदाव्या वर्षापर्यंत दुकानाच्या व्यवस्थापनात कार्यमग्न होत्या. अगदी अलीकडे ऑगस्ट २०२० मधे त्याना देवाज्ञा झाली.

आपल्या गावात रहाणाऱ्या मुलांची प्रगती आणि पतीने स्थापन केलेल्या दुकानाची हिमतीने – जिद्दीने पुनर्स्थापना अशा दोन्ही जबाबदाऱ्या श्रीमती गांगाबाईंनी समर्थपणे सांभाळल्या. आपल्या सर्वच बलूतेदारांकडे असलेली निसर्गदत्ता उद्यमप्रेरणा – ऊर्जा – सतत परिश्रमाची तयारी – ग्राहकांची नेमकी गरज ओळखून व्यवसायांत केलेले बदल – व्यवसायावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्याची क्षमता … या सर्व गुणवत्ता श्रीमती गंगाबाई इंदुलकर नावाच्या उद्योजक स्त्रीच्या व्यक्तीमत्वात परिपूर्ण होत्या. कुठल्याही प्रकारच्या प्रसिद्धीचा स्पर्श न झालेली ही आपली एक सबळ – सक्षम माहिला बलुतेदार आहे - होती. श्रोमती गंगाबाई इंदुलकर यांचा, वयाच्या चाळीशी नंतर सुरु झालेला, पन्नास वर्षांचा व्यवसाय व्यवस्थापन आणि त्याच्या वृद्धीचा आलेख प्रत्येक शाळा आणि कॉलेजात शिकवला जावा असाच प्रभावशाली आणि उत्तुंग आहे. खूप शिकून व्यवसाय करायला सुरुवात करणाऱ्या तरुण – तरुणींनी इथे एक लक्षात घ्यावे…की फार शालेय शिक्षण नसलेली…मुलाना गावाला ठेवून पती निधनानंतर एकटी राहून श्रीमती गंगाबाईनी हे अव्हान पेलले आहे आणि त्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.

आपल्या आईच्या हाताखाली उमेदवारी केलेले श्री चंद्रशेखर इंदुलकर, आज श्री रघुवीर स्टोअर्सच्या व्यवसायाचे व्यवस्थापन

पहात आहेत. १९८४/८५ पासून गेली पस्तीस वर्षे, त्यांनी व्यवसायात खूप प्रगती केली आहे. त्यांच्या पत्नी सौ नंदिनी आता त्यांच्या बरोबरीने व्यवसायाची जबाबदारी सांभाळत आहेत. श्री रघुवीर स्टोअर्स मधील खाऊचे ताजे पदार्थ आज खूपच लोकप्रिय आहेत. आपल्या खास चवीनुसार बनवलेल्या या पदार्थांची निर्मिती आता अन्य पुरवठादारांच्या तर्फे केली जाते. गेली कित्येक वर्षे श्रीमती गंगाबाईंनी या पुरवठादारांचि साखळी निर्माण केली आहे. आता चंद्रशेखरची पत्नी, सौ नंदिनी इंदुलकर याचे व्यवस्थापन पहात आहेत.

विलेपारल्यातील रसिक खवय्या नागरिकांच्या जिभेला उत्तम स्वादाची अनुभूती नियमित देणारे, उत्तम चवदार खाऊचा नियमित पुरवठा करणारे हे आपले श्री रघुवीर स्टोअर्स, विलेपारल्यातील एक नामवंत बलुतेदार. रसिक - खवय्या पारलेकरांच्या स्वादाच्या DNA चि जडण घडण...याच बलुतेदारांची किमया आहे.

सौ नंदिनी – श्री चंद्रशेखर इंदुलकर आणि कुटुंबियाना भविष्यातील उपक्रमांसाठी अनेकानेक शुभेच्छा...!!

--oo--

विलेपारल्यातील बलुत २ / ११

# स्वदेशी ट्रंक फॅक्टरी आणि शॉप्स, श्री महादेव विनायक इंदुलकर



विलेपारल्यातील बलुतेदार ही आपली लेखमाला आता अंतिम टप्प्यावर आली आहे. २०२० या वर्षातील अखेरच्या नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यातील दोन लेख प्रकाशित झाले की आपली ही लेखमाला सफल - संपन्न होईल. आपला बलुतेदार उद्योजक कसा घडला याची अनेक उदाहरणे आपण गेली दोन वर्षे वाचली. त्यांच्या समानशील गुणवत्तांचा आलेख वाचला. या सर्व बलुतेदारांच्या प्रगतीचा अभ्यास करताना, अनुभवाअंती माझा एक विश्वास दृढ झाला. या प्रत्येक बलुतेदाराची निसर्गदत्त उद्यमवृत्ती आणि ऊर्जा हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रथम वैशिष्ट्य आहे (Natural Talent). या निसर्गदत्त उर्जेने – उर्मीने, एका शून्यातून व्यवसायाचा श्रीगणेशा

करताना घेतलेले भले – बुरे अनुभव आणि त्यातून साध्य झालेली व्यवहाराची गणिते (Acquired Skills) हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दुसरे वैशिष्ट्य आहे. यशाच्या डोंगराच्या पायऱ्या त्यानंतर गवसल्या होत्या.

आजच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुका हे पूर्वीचे बावडा संस्थान. याच तालुक्यात तिरवडे (सौन्दल) गावात, सौ यमुनाबाई आणि श्री विनायक इंदुलकर या दांपत्यापोटी, वर्ष १९०५ मधे, महादेव विनायक इंदुलकर याचा जन्म झाला. महादेव हे त्यांचे चौथे अपत्य. घरात दुभत्या गायी – म्हशी – शेळ्या – मेंढ्या आणि वीस एकर शेत जमीन, असे श्री विनायक इंदुलकरांचे स्वावलंबी कुटुंब होते. दुभत्या जनावरांमुळे श्री विनायकराव तुपाचा व्यापार करत असत. घरीच बनलेले तूप, चिनीमातीच्या मोठ्या बरण्यांमधे भरून, त्या डोक्यावरू वाहून, दर आठ – पंधरा दिवसांनी घाट ओलांडून चालत कोल्हापूरला जाऊन ते तूप विकायचे असा त्यांचा शिरस्त होता. व्यवसायासाठी वडील करत असलेल्या श्रमांची जाणीव, महादेवला कळत – नकळत त्या बालवयांत झाली असावी.

दूर डोंगरात वसलेल्या तिरवडे गावातली शाळा चवथ्या इयत्ते पर्यंतच होती. जात्याच हुशार असलेल्या महादेवने चवथ्या इयत्तेची परीक्षा वयाच्या दहाव्या वर्षीच दिली होती. त्यापुढील शाळेत जाणे शक्य नव्हते त्यामुळे महादेव आपल्या भावन्डांबरोबर पहाटेपासून गुरे चरायला नेत असे. उठायला उशीर झाल्यामुळे दोन वेळा वडिलांच्या छडीचा प्रसाद मिळाल्यानंतर मात्र, पहाटे चार वाजता उठायची शिस्त महादेवाच्या आंगवळणी पडली होती. ही शिस्त महादेवने त्यानंतर आयुष्यभर पाळली होती. शाळा संपून साधारण दोन वर्षे झाली असावी, महादेव आता बारा – तेरा वर्षांचा झाला होता. एके दिवशी दुपारी, आई यमुनाबाईनी हाक मारल्यानंतर, महादेव जेवायला बसला. घरात दूध – तुपाने भरलेले फडताळ असल्याने महादेवला रोज ताटात दही वाढलेले हवे असायाचे. त्यादिवशी आईने ताटात दही वाढलेले नव्हते म्हणून महादेवला वाटले आई दही वाढायला विसरली असावी. त्याने आईकडे दह्याची मागणी केली. लेकरा आज नेमके दही संपले आहे असे आई म्हणताच, महादेवाने दह्यासाठी हट्ट केला. आईलाही राग आला. समजावून सांगूनही मुलगा ऐकत नाही हे पाहून आई थोड्याशा रागात म्हणाली अरे रोज रोज धय कुट्टून आनु...जा जत धय मिलेल तत ज्जा...!...

आईचे हे शब्द ऐकून महादेव जेवण - ताट अर्धवट टाकून ताडकन उठला आणि बाहेर ओसरीवर आला. तिथे वडील सुपारी कातरत बसले होते. हात धुवायच्या आधीच त्यांना म्हणाला ...बाबानु... आई धय देत नाय...मला उताऱ्याचे पैसे द्या ... मी मुंबईला जातो...! विनायकरावांनी विचार केला...मुलगा रागावलाय..अजून लहान आहे...म्हणून त्यांनी चंचीतून घडी करून ठेवलेली दहा रुपयाची नोट काढली आणि महादेवाच्या हातात ठेवली. अडीअडचणीला थोडे पैसे हाताशी असावे म्हणून विनायकरावांनी ती नोट जपून ठेवली होती. त्यांच्या मनात आले आसवे...होईल शांत थोड्या वेळाने आणि विसरेल सगळा राग...!..मात्र ज्या नियतीने महादेवला, निसर्गदत्त उद्यमवृत्ती आणि ऊर्जा देऊन समृध्द केले होते...त्याच नियतीने टाकलेले हे पटावरचे फासे होते, याची उमज त्यावेळी कोणालाही पडली नव्हती.

अगदी दोनच दिवसात महादेवाला मुंबईला जाण्यासाठी सोबत मिळाली. एका गोणपाटात एक बंडी - एक पंचा – एक लंगोट भरला आणि मागे वळून न बघता महादेव मुंबईला निघाला. त्यावेळी महादेव होता निव्वळ तेरा वर्षांचा. विसाव्या शतकाच्या प्रारंभी कोकण परिसरातून मुंबईला प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस

कोळशावर चालत असत. अशाच एका बसमधून महादेव मुंबईच्या बॉम्बेसेन्ट्रल बस स्थानकात पोहोचला होता. याला ग्रॅन्टरोडच्या चिखल वाडीत, श्री रामचंद्र इंदुलकर या माझ्या पुतण्याकडे पोहोचवा असे गावातून निघताना, सोबत असणाऱ्या गृहस्थाला महादेवच्या वडिलांनी सांगितले होते. बॉम्बेसेन्ट्रल बस स्थानकातून ग्रॅन्टरोडची चिखलवाडी हे अर्ध्या तासाचे अंतर पायी चालत निघालेला महादेव मुंबईचे हे अनोखे रूप, अचंबित होऊन प्रथमच पहात होता. विविध टोप्या घालून लगबगीने चाललेले सर्वधर्मीय – सर्व वयोगटातील नागरिक – रुबाबदार पोषाखातले इंग्रज – हातात लाठ्या घेतलेले पोलीस – हळूहळू निघालेली ट्राम आणि मधेच एखादी मोटार - सामानाची वेगाने ने आण करणाऱ्या हातगाड्या – उंच आणि रुंद इमारती...!..महादेवासाठी हे सगळेच दृश्य नवे होते.

श्री रामचंद्र इंदुलकर याच्याकडे महादेवाचे स्वागत फारसे उत्साहाने झालेच नाही. मी नोकरी शोधण्यासाठी आलोय या महादेवाच्या सांगण्याला दाजींनी हसण्यावारी नेले. नोकऱ्या काय अशा रस्त्यावर पडलेल्या मिळतात का अशा वाक्याने बोळवण झाल्यावर, महादेव निराशेने त्यांच्या घराबाहेर पडला. दुपार सरत

आली असावी अशावेळी पाय नेतील त्या मार्गाने चालत चालत महादेव गिरगाव परिसरात आला. उद्यमवृत्ती आणि ऊर्जा ज्या नियतीने दिली होती, बहुधा त्याच नियतीने महादेवाचा हा रस्ता, त्याच्या नकळत आखून दिलेला असावा. संध्याकाळी सहाच्या सुमारास, खांद्यावर एक गोणपाट आणि प्रवासाने काळवंडलेल्या चेहेऱ्याचा, चालून दमलेला अनवाणी महादेव, श्वास घेण्यासाठी नेमका एका कोळशाच्या दुकानासमोर थांबला. त्याचा असा अवतार पाहून दुकानदाराने त्याला हाक मारली. ए पोरा...ही कोळशाची गोण घेऊन या बाईंच्या घरी पोहोचवून ये...तुला एक आणा मजुरी मिळेल. आलेली संधी महादेवाने निमुटपणे स्वीकारली. कोळशाची गोण डोक्यावरून वाहून ठाकूरद्वारच्या बाईंच्या घरात पिंपात रिकामी केली आणि एक आणा मजुरी घेऊन महादेव उलट पावली कोळशाच्या दुकानापाशी आला. मुंबईत येऊन जेमतेम पाच-सहा तास झाले असतील...महादेवाला आयुष्यातली एका आण्याची पहिली कमाई झाली होती. जणू नियतीने महादेवाच्या पाठीवर मारलेली ही पाठींब्याची थाप होती. परत येईपर्यंत कोळशाचे दुकान बंद झाले होते.

ही घटना साधारण १९१७/१८ या वर्षात घडलेली आहे. या दिवशी एका दृष्ट्या श्रमयोग्याचा जन्म झाला होता. द्रष्टा श्रमयोगी हे संबोधन इतके समर्पक आहे कारण त्यापुढील किमान १५/१८ वर्षे, वर्ष १९३२ पर्यंत महादेवाने कुठलाही संकोच न बाळगता मोलमजुरी आणि अंग मेहनत केली होती. त्यानंतरच्या पन्नास वर्षात, महादेव नारायण इंदुलकर हा तरुण एक यशस्वी उद्योजक, श्री बाबासाहेब इंदुलकर या नावाने ख्यातकीर्त झाला होता. गेली सत्तर वर्षे विलेपारल्याचे रहिवासी असलेल्या याच एका यशस्वी बालुतेदाराचा, माननीय श्री बाबासाहेब इंदुलकर यांचा हा परिचय लेख. बाबासाहेब इंदुलकरांचे सुपुत्र आणि आपल्या विलेपारल्याचे माजी नगरसेवक माननीय श्री प्रतापराव इंदुलकर यांनी संकलित आणि संपादित केलेल्या बाबासाहेबांच्या चरित्रग्रंथाचे शीर्षक आहे उपभोगशून्य द्रष्टा श्रमयोगी. हा ग्रंथ अजून प्रकाशित झालेला नाही.

कोळशाचे दुकान बंद झाल्याचे पाहून महादेवाने जवळच्या चहाच्या टपरीवर, तीन पैशाच्या एक चहा आणि दोन नानखटाई खाऊन भूक भागवली. एक आण्यातले उरलेले तीन पैसे गोणपाटातील बंडीच्या खिशात जपून ठेवले आणि

दुकानाबाहेरच्या ओटीवर पाठ टेकली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने स्वच्छतागृहात अंघोळ करून चहा घेतला आणि नियती आणि पाय नेतील त्या मार्गाने चालत गिरगावातून भुलेश्वर गाठले आणि असाच विचार करत तो एका पत्र्याच्या ट्रंका विकणाऱ्या दुकानासमोर उभा राहीला. याच भुलेश्वर मध्ये त्याची नोकरी त्याचीच जणू वाट पहात होती. मालकाकडे बघून महादेवाने विचारले नोकरी मिळेल काय...??...मालक म्हणाले हो मिळेल पण रोज सकाळी दुकानाची जमीन धुवून साफ करायची आणि दुकानातल्या सर्व ट्रंकाना कपडा मारून त्या साफ ठेवायच्या. महिन्याला तीन रुपये पगार मिळेल. महादेवाने ती नोकरी आनंदाने स्वीकारली आणि लगेच त्याचे काम सुरु झाले.

चवथी मराठी शिकलेल्या महादेवाचे, शालाबाह्य शिक्षण या दुकानात पुन्हा सुरु झाले. नंतरची दहा-बारा वर्षे महादेवाने त्या दुकानात नोकरी केली. याच काळात आपल्या प्रमाणिक मेहनतीने मालकाचा विश्वास त्याने संपादन केला होतो. मात्र आता शेजारच्या दुकानातील समवयस्क गुजराती मुलांकडून, तो गुजराती बोलायला – वाचायला आणि लिहायला शिकला. खतावणी आणि रोजमेळ असे दुकानातील खर्च-उत्पन्नाच्या नोंदी लिहायला शिकला.

पत्र्याच्या ट्रंका बनविण्याच्या तंत्रात तो पारंगत झाला होता. या काळात या नोकरी बरोबरच तो डोक्यावरून समान नेण्याच्या मोलमजुरीची कामेही करत होता. पगाराशिवाय मिळणारे असे उत्पन्न पोस्टातील बचत खात्यात भरायला त्याने सुरुवात केली होती. महिन्याच्या रात्रीच्या एका वेळच्या जेवणाचे तीन रुपये खानावळीत द्यावे लागत असत. तिथे सहा-सात फुलके - भाजी - डाळ असे जेवण मिळत असे. महादेव त्यातले दोन फुलके बांधून आपल्या पिशवीत ठेवत असे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी चहा बरोबर त्याची न्याहारी होत असे. या तरुण वयातच, महादेवला अनुभव या शिक्षकाने नफ्याचे आणि बचतीचे गणित शिकवले होते.

आता नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय करायचा निर्णय घेऊन महादेवाने, गिरगावातील सरकारी तबेल्याजवळच्या रेळे बिल्डींगमध्ये एक गळा मासिक भाड्याने घेतला. नोकरी सोडतानाचा त्याचा पगार सात रुपये झाला होता. मोलमजुरी करून पोस्टाच्या बचत खात्यात साठवलेले ३००/- रुपये, त्याने सहा महिन्याचे आगाऊ भाडे म्हणून गाळा मालकाला दिले आणि ट्रंका ठेवण्यासाठी लाकडी खण बनवले. असंख्य अडचणींचा सामना

करत त्याने आपले दुकान सुरु केले. दुकानाचे नांव होते हनुमान ट्रंक डेपो. इब्राहीमभाई या ट्रंका बनवणाऱ्या बोहरी गृहस्थाबरोबर, आधीच्या नोकरीत स्नेह जमला होता. त्यांनी सौजन्याने आपल्या ट्रंका पाठवल्या आणि दुकानाचा व्यवहार नियमित सुरु झाला होता.

वयाच्या बारा-तेराव्या वर्षी कुठल्याही आधाराशिवाय कोकणातील आपल्या गावावरून एकट्याने मुंबईत आलेल्या महादेराव इंदुलकर यांनी वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी गिरगावात आपले पहिले दुकान थाटले होते. पुढील एका वर्षातच शेजारचा गाळा घेऊन दुकानाची प्रगती सुरु झाली होती. १९३३/३४ मध्ये महादेवरावांचे लग्न झाले आणि ठाकुरद्वार येथील दत्त मंदिराजवळच्या चाळीत तळमजल्यावरच्या एका खोलीत त्यांनी आपला संसार थाटला होता. याच दरम्यान त्यांनी पावसाळी छत्र्यांचा व्यापार सुरु केला होता. जास्त मेहेनतीची तयारी असणाऱ्या परिचिताना त्यांनी छत्र्या विकायला दिल्या आणि त्या ग्राहकांना हप्त्यावर विकण्यास सांगितले. या छत्र्यांच्या व्यापारात, त्यानंतरच्या काळात महादेवरावांनी खूप मोठे धाडस केले आणि त्याचा सर्वांनाच फायदा झाला होता. त्यानंतर रेनकोट – शाळेची

दप्तरे- प्रवासी होल्डॉल अशा वस्तूंचा व्यापार वाढत राहिला होता. दिवाळीच्या दरम्यान फटाके विक्री सुरु झाली होती आणि त्या व्यापाराने त्याकाळात मुंबईतील फटाक्यांच्या विक्रीचे सर्व विक्रम मोडले होते.

वर्ष १९३२ मध्ये पहिले दुकान सुरु केल्यापासून निव्वळ आठ वर्षात, वर्ष १९४० मध्ये महादेवरावांनी दादर स्टेशन समोरील विजयनगर बिल्डींगमध्ये दोन गाळयांचे दुकान भाड्याने घेतले आणि स्वदेशी ट्रंक मार्टचे दुसरे दुकान सुरू झाले होते. या सगळ्या व्यापारात महादेवरावांनी कुटुंबातल्या तरुण मुलांना नोकऱ्या दिल्या होत्या. त्यांच्यवर जबाबदाऱ्या सोपवल्या होत्या. नंतरच्या काळात, मुंबई पोलिसांसाठी लोखंडी कॉट बनवल्या आणि त्यांची विक्री हप्त्यावर केली होती. त्यावेळी दोन हजार कॉटची विक्री झाली होती. नंतरच्या काळांत, वर्ष १९४५ मधे, दादरच्या कबुतरखान्या जवळच्या दादरकर वाडीत महादेवरावांनी आपला ट्रंका आणि अन्य समान बनविण्याचा कारखाना सुरु केला होता.

वर्ष १९५० च्या सुमारास महादेवरावांनी विलेपारल्यातील हनुमान रोड वरील  पोस्ट ऑफिस समोरचा प्लॉट खरेदी केला

आणि तिथे राहण्यासाठी पार्वती निवास हे घर बांधले आणि ते पारलेकर झाले. त्याच्या बाजूलाच दुसरा प्लॉट घेऊन मालती निवास ही दुसरी इमारत बांधली. याचवेळी पारल्यात दुसऱ्या प्लॉट वर शिवाजी विद्यालय ही शाळा बांधली. पारल्यातच दुसऱ्या प्लॉटवर चाळ बांधली आणि परिचित लोकांची रहायची सोय केली. कोकणातील आपल्या तिरवडे गावात महादेवरावांनी रस्ते बांधले. थेट गावापर्यंत एसटी सुरु केली, शाळा बांधली आणि गावाचा कायापालट सुरु झाला होता.

महादेवराव म्हणजेच बाबासाहेब इंदुलकर यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या खजीनदार पदाची जबाबदारी स्वीकारली आणि त्याकाळात सत्याग्रहात सामील झालेल्या आणि तुरुंगवास झालेल्या कार्यकर्त्यांच्या घरी किराणा आणि अन्य साहित्य पोहोचवण्याची व्यवस्था केली होती. वर्ष १९६० मधे दादरच्या शिवाजी मंदीर या संस्थेच्या आर्थिक अडचणीच्या काळात ऐंशी हजार रुपयांच्या देणग्या गोळा करून संस्थेला पुन्हा उभारी दिली आणि आत्ताचे नाट्यगृह उभे राहू शकले.


श्री महादेवराव म्हणजेच बाबासाहेब इंदुलकर या उपभोगशून्य द्रष्टा श्रमयोगी उद्योजकाने, वर्ष १९३२ ते वर्ष १९८० या पन्नास वर्षांच्या काळात आपले मोठे उद्योग साम्राज्य उभे केले होते. निसर्गदत्त उद्यमवृत्ती आणि ऊर्जा आणि अनुभव यासह आपल्या बलुतेदाराच्या सर्वच गुणविशेषाने त्यांची सर्व कारकीर्द झळाळून उठली होती. प्रत्येक सामाजिक कामातील बाबासाहेबांची बांधिलकी आणि त्यांनी त्याप्रती परोपकारी - निरपेक्षवृत्तीने केलेली कामे याची आठवण आजही ठेवली गेली आहे.

एका निश्चित ध्येयाने आणि व्यापारी वृत्तीने आपला जीवनकाळ व्यतीत केलेल्या माननीय बाबासाहेब इंदुलकर यांनी २४ जुलै१९८६ रोजी या नश्वर जगाचा निरोप घेतला आणि वैकुंठाकडे प्रयाण केले...!..मराठी उद्यमनीतीचे साक्षात विद्यापीठ म्हणावे अशा माननीय कै बाबासाहेब इंदुलकर या विलेपारल्याच्या आदर्श बलुतेदाराला, तुमच्यासह माझे शतशत नमन...!

--००--

विलेपारल्यातील बलुत २ / १२

# श्री मोहन बढे आणि जी के स्पोर्ट्स



विलेपारल्यातील मराठी बलुतं या आपल्या लेखामालेतील हा बारावा आणि अंतिम लेख. या लेखमालेला वाचकांनी पसंतीची मोहोर आणि पसंती प्राप्त झाली त्यासाठी सर्व वाचकांना मनःपूर्वक धन्यवाद. या लेखामालेच्या माध्यमातून आपण या उपनगराचा अनोख्या इतिहास आणि सामाजिक – सांस्कृतिक DNA चा आलेख मांडताना रम्य भूतकाळाला स्पर्श केला. आपल्या उद्यमशील बलुतेदारांच्या समान गुणवत्तांचा – व्यक्तीमत्वांचा – प्रगतीचा परिचय करून घेतला. आपले जन्मग्राम विलेपारल्याच्या लिहिण्यासाठी खूप आठवणी अजूनही शिल्लक आहेत. एक वर्षाचा ब्रेक घेऊन जानेवारी २०२२ मध्ये वाचकांशी माझी भेट नक्की होणार आहेच.

वर्ष १९७३ मध्ये, मोहन बढे नावाचा तेवीस वर्षांचा तरुण नागपूरहून कल्याणमध्ये आला होता. तिथल्या बिर्ला कॉलेजमध्ये, स्पोर्ट्स डायरेक्टर या पदावर त्याची नेमणूक झाली होती. ही जबाबदारी एक वर्षभर सांभाळल्यानंतर, अंधेरीच्या एम व्ही एल यु महाविद्यालयात त्याची याच पदावर नेमणूक झाली होती. वर्षभर विमानदर्शन सोसायटीत श्री दिवाकर बर्वे यांचाकडे पेइंग गेस्ट म्हणून रहाण्याची व्यवस्था झाली होती, त्यानंतर बोमनवाडा परिसरात त्यांनी घर घेतले होते. हेच श्री मोहनराव बढे, आजच्या आपल्या लेखातील बलुतेदार आहेत. (सहार रोडवरील या परीसराला बामनवाडा असे संबोधित केले जाते. बोमनजीनी वाडी किंवा बोमनवाडा हे योग्य संबोधन आहे. या परीसराचा मूळ मालक बोमनजी या पारशी मालकाच्या नावाचा हा अपभ्रंश आहे.)

हा लेख लिहितांना मन थोडेसे सैरभैर झाले आहे. खरे म्हणजे नोव्हेंबर महिन्यातील  अंकासाठी श्री मोहनराव बढे आणि त्यांच्या जी के स्पोर्ट्स या दुकानाचा परिचय करून देण्यासाठी आखणी झाली होती. त्यानुसार श्री मोहनरावांचे चिरंजीव श्री अक्षय बढे याना १ सप्टेंबरला फोन केला होता. दुर्दैवाने त्याच दिवशी दोन तास आधी, नानावटी रुग्णालयात मोहनरावांचा मृत्यू झाला होता.

हा लेख लिहितांना मोहनरावांची भेट होऊ शकली नाही अशी हुरहूर मनात राहिली आहे.

नागपूरच्या कॉलेजमध्ये असताना बॅडमिंटन आणि हॉकी या दोन खेळात प्राविण्य मिळवणारे मोहनराव, १९७४ ते १९७९ अशी पाच वर्षे, एम व्ही एल यु महाविद्यालयाच्या स्पोर्ट्स डायरेक्टर या पदावर कार्यरत होते. त्यावर्षी सरकारच्या शिक्षण विषयक धोरणात काही बदल झाले आणि स्पोर्ट्स डायरेक्टर हे पद अतिरिक्त सेवा म्हणून घोषित झाले आणि मोहनरावांची सेवा खंडित झाली, परिणामी त्यांना महाविद्यालयाच्या सेवेतून कायमची रजा मिळाली होती. याच दरम्यान वर्ष १९७९ मध्ये मोहनरावांचा रंजनाताईंशी विवाह झाला होता. एखादा तरुण या प्रसंगामुळे निराश झाला असता किंवा गोंधळून गेला असता. मोहनरावांना मात्र यांत वेगळी संधी गवसली आणि जी के स्पोर्ट्स या दुकानाच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ झाली होती. त्याकाळात त्यंचे वास्तव्य बोमनवाडा या सहार रोडवरील परिसरात होते आणि विलेपारल्यातील अनेक कुटुंबांशी स्नेह जमला होता.

स्वतः खेळाडू असलेल्या मोहनरावांना आता महाविद्यालयातील स्पोर्ट्स डायरेक्टर या पदावर काम करण्याचा पाच – सहा वर्षांचा अनुभव गाठीला होता. अनेक खेळातल्या वापरल्या जाणाऱ्या साधनांचा उत्तम परिचय – त्याची प्रत आणि योग्यता ओळखण्याची हातोटी – खेळाडूने या साधनांचा योग्य वापर कसा करावा याचा अनुभव अशा भरभक्कम तयारीने आपण आता खेळाच्या साधनांचा व्यवसाय सुरु करण्याचा धाडसी निर्णय, आपली सहचारिणी सौ रंजना याच्याशी चर्चा करून, मोहनरावांनी घेतला होता.

सत्तर – ऐंशीच्या दशकांत, त्याकाळात नागरिकांना खेळाची साधने विकत घेण्यासाठी मरीनलाईन्सला, मेट्रो सिनेमाच्या परिसरात जावे लागत असे. मोहनरावांना याची निश्चित कल्पना होती. अशी खेळाची साधने आपण विलेपारल्यात उपलब्ध करून दिली तर नागरिकांचा प्रतिसाद निश्चित मिळेल आशी खात्री त्याना होतीच. आता विलेपारल्यात दुकानाच्या जागेचा शोध सुरु झाला होता.

पार्लेश्वर मंदिराच्या आवारात, महात्मा गांधी रस्त्याच्या दर्शनी भागात स्थापीत  असलेली चार दुकाने आपल्याला दिसतात. वर्ष १९९० मध्ये नियमित स्वरूपात ही दुकाने, आता दिसतात त्या स्वरूपात बांधली गेली होती. त्या आधी तिथे जनसंघ या राजकीय पक्षाचे कार्यालय होते. त्याकाळात श्री रामभाऊ आपटे त्या कार्यालयाचे प्रमुख होते. हे दुकान विक्रीसाठी उपलब्ध आहे असे समजल्यानंतर मोहनरावांनी चौकशीसाठी, श्री रामभाऊ आपटे यांची भेट घेतली. दुकान विकायचे आहे नक्की मात्र व्यवसाय काय करणार त्याची  चौकशी करून, विलेपारल्यातील मला परिचित एखाद्या व्यक्तीची हमी द्या असा सल्ला श्री रामभाऊ आपटेयांनी दिला. याचे कारण मोहनरावांचा श्री आपटे यांच्याशी परिचय नव्हता. त्याकाळात, पारले टिळक विद्यालयात, श्री नानासाहेब पटवर्धन नावाचे शिक्षक लोकप्रिय होते. त्यांच्या सौभाग्यवतीही शाळेत शिक्षिका होत्या. परिचयाचे असल्याने मोहनरावांनी श्री नानासाहेब पटवर्धन यांना,  श्री रामभाऊ आपटे याना शब्द टाकावा अशी विनंती केली आणि श्री नाना पटवर्धन यांनी श्री रामभाऊ आपटे यांना आवश्यक ती तोंडी हमी दिली. काही काळातच या दुकानाचा व्यवहार पूर्ण होऊन जी के स्पोर्ट्स हा व्यवसाय सुरु झाला होता.




मोहनरावांचे आजोबा श्री केशवराव बढे आणि काका श्री गणेश बढे यांच्यावर मोहनरावांचा विशेष जिव्हाळा होता. या दोघांचे प्रोत्साहन सतत मिळत होते.  त्यांच्या सन्मानार्थ म्हणून व्यवसायाचे नाव जी के स्पोर्ट्स असे ठेवले गेले. काही काळातच या व्यवसायाला प्रगतीची दिशा मिळाली आणि दिवसा गणिक हा व्यवसाय वृद्धिंगत होत गेला. याला काही निश्चित करणे ही होतीच. श्री नाना पटवर्धन याचा शब्द असा वेळेत कामी आला. स्वतः मोहनरावांचे स्वच्छ आणि पारदर्शक व्यवहार आणि त्यांचा परस्परातील स्नेहभावनाही याला कारणीभूत होती. याबरोबरच विजय स्टोअर्सचे मालक श्री आण्णासाहेब साठे यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोहनरावांच्या कुटुंबाला नेहेमीच प्राप्त झाले होते.

नागपूरहून मुंबईत आलेल्या आणि विलेपारल्यात आपला व्यवसाय यशस्वी केलेल्या या आपल्या बलुतेदाराकडे व्यवसायात यशस्वी होण्यासाठी आवश्यक त्या सर्व गुणावत्ता निसर्गदत्त होत्या. नुकताच विवाह झाला आहे आणि नोकरी गेली अशा अचानक उद्भवलेल्या परिस्थितीवर मात करण्याची हिम्मत आणि कणखर वृत्ती -- भवतालच्या परिस्थितीचे नेमके आकलन -- अथक प्रयत्न करण्याची तयारी – हाती घेतलेल्या विषयाचा सखोल अभ्यास – नियमितपण – वक्तशीर व्यवहार – ग्राहकाला योग्य मार्गदर्शन करून त्याला यशस्वी होण्याचा मार्ग दाखवणे – लाहान आणि तरुण वयातील होतकरू खेळाडूना प्रोत्साहन देणे – त्यांचे कौतुक करणे अशा पैलूदार व्यक्तिमत्वाच्या मोहनरावांना व्यवसायात खूप यश मिळाले.

मात्र मोहनरावांच्यासाठी जी के स्पोर्ट्स हा फक्त व्यवसाय नव्हता. खेळाचे सामान विकत घेण्यासाठी आलेला प्रत्येक ग्राहक – मग तो स्त्री असो की पुरुष – आपली अथवा आपल्या लहान वयातील मुलांची स्वप्ने जपण्यासाठी आलेला आहे याची निश्चित जाणीव मोहनरावांना असे. पालक आणि मुलांची नक्की गरज काय आहे आणि का आहे, याचा अनुभवाने त्यांनी योग्य अंदाज

आलेला असे. एका शिक्षकाच्या आणि मार्गदर्शकाच्या भूमिकेतून, मोहनराव पालक आणि मुलाला योग्य वस्तू निवडण्यासाठी सल्ला देत असत. चाळीस वर्षातील व्यवसायाच्या अशा दीर्घ कारकिर्दीत त्यांनी अशा अनेक स्वप्नांना साकार केले आहे.

जी के स्पोर्ट्सचा व्यवसाय कालांतराने वाढतच गेला. अक्षय आणि चैतन्य हे मोहनरावांचे दोन सुपुत्र जलतरणपटू आहेत. डायव्हिंग आणि स्वीमिंग या क्रीडाप्रकारात राष्ट्रीय पदक विजेते खेळाडू आहेत. आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून अक्षय तरुण वयातच वडिलांच्या हाताखाली उमेदवारी करण्यासाठी जी के स्पोर्ट्स मध्ये दाखल झाला होता. प्रबोधनकार ठाकरे जलतरण तलावासमोर अल्टिमेट स्पोर्ट्स या नावाचे अक्षयचे खेळाच्या सामानाचे दुकान, मोहनरावांच्या कुटुंबाच्या व्यवसायातील प्रगतीची साक्ष देते. मोहनरावांचे अक्षय आणि चैतन्य हे दोघे सुपुत्र वडिलांनी स्थापन केलेल्या या व्यवसायात खूप यशस्वी झाले आहेत.




वर्ष २००२ मध्ये मोहनरावांचा धाकटा मुलगा चैतन्य याने स्पोर्ट्स मेडिसिनचा अभ्यास करण्यासाठी रशियातील सेंट पिटसबर्ग युनिव्हर्सिटीमधे प्रवेश घेतला. पाच वर्षांचा हा अभ्यासक्रम पूर्ण करून तो स्कॉटलंड मधील एडीम्बर्ग युनिव्हर्सिटीमधे दाखल झाला. खेळाडूंसाठी आवश्यक Strength & Condition या विषयात त्याने एक वर्षाचा Post Graduet Diploma पूर्ण केला. वर्ष २०१० मध्ये डॉ चैतन्यने स्वतःची प्रॅक्टिस सुरु केली. तरुण होतकरू खेळाडुंना, खेळातील त्यांचे

प्राविण्य वाढवण्यासाठी Injury Prevention आणि Strength & Condition या संदर्भात तो मार्गदर्शन करतो.

स्वतंत्र प्रॅक्टिस सुरु केल्यानंतर वर्ष २०१७ मध्ये International Olympic Committee तर्फे डॉ चैतन्यची निवड Sports Nutrition याचा अभ्यास करण्यासाठी झाली होती. खेळाडूंच्या आहारा संदर्भातील या Post Graduet Diploma आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी त्याला शिष्यवृत्ती मिळाली होती. हा अभ्यासक्रम डॉ चैतन्याने यशस्वीपणे पूर्ण केला आहे. अनेक उभरते किशोर आणि तरुण खेळाडू, डॉ चैतन्यचा सल्ला घेण्यासाठी भारतभरातून येत असतात. अलीकडच्या खेलो इंडिया या राष्ट्रीय स्पर्धांमधून सहभागी झालेल्या डॉ चैतन्यच्या खेळाडूनां बत्तीस पदके मिळाली आहेत. त्याचा सल्ला घेणारे अनेक खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशस्वी होत आहेत.

मोहनराव – अक्षय – डॉ चैतन्य या तिघांच्या आणि जी के स्पोर्ट्ससह अल्टिमेट स्पोर्ट्स या सर्व प्रगतीमध्ये कुटुंबाचा एक आधारस्तंभ आहेत मोहनरावांच्या सहचारिणी श्रीमती रंजनाताई. विवाहानंतर आलेल्या अकस्मात अडचणींवर मात करत,

व्यवसायाच्या पहिल्या दिवसापासून त्यांच्या खांद्याला खांदा लाऊन प्रगतीच्या वाटेवर रंजनाताई मोहनरावां बरोबर प्रत्येक पाऊल चालल्या आहेत. व्यवसायाच्या अगदी पहिल्या दिवसापासून आणि आता मोहनरावांच्या पश्चात आजही, रंजनाताई जी के स्पोर्ट्स आणि अल्टिमेट स्पोर्ट्स या दुकानांच्या व्यवहारात नियमित लक्ष घालतात. अक्षय आणि डॉ चैतन्य या दोघाना मार्गदर्शन करत असतात.

विलेपारल्याच्या खेळ संस्कृतीच्या आणि खेळाडू विकास प्रक्रियेत, मोहनराव – श्रीमती रंजनाताई – श्री अक्षय - डॉ चैतन्य या बढे कुटुंबाचा आणि जी के स्पोर्ट्ससह अल्टिमेट स्पोर्ट्स या व्यवसायांचा सहभाग खूप मोठा आहे. डॉ चैतन्य बढे आज खेलो इंडिया या उपक्रमात आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात आपला प्रभाव पाडतो आहे हे फार कौतुकाचे आहे. रंजनाताईंसह सर्व बढे कुटुंबीय आणि त्यांच्या सहकाऱ्यांना, भविष्यातील उपक्रमांसाठी अनेकानेक शुभेच्छा...!


आजच्या या लेखाने, आपली विलेपारल्यातील मराठी बलुतं ही बारा लेखांची लेखमाला आता संपन्न होते आहे. या


लेखमालेसाठी, यात समाविष्ट सर्वच बलुतेदारांनी उत्साहाने संपूर्ण सहकार्य केले. अभूतपूर्व पार्ले यामासिकाचे संपादक – मालक श्री अनिल हर्डीकर – सौ स्वाती हर्डीकर – श्री शैलेश तेंडोलकर या सर्वांचे नियमित सहकार्य आणि प्रोत्साहन मला मिळत राहिले. त्यासाठी सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद...!!!

**--००--**

**श्री. अरुण फडके यांची ई साहित्यवरील पुस्तके**

**कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.**



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**श्री. अरुण फडके यांचे ई साहित्यवर हे तिसरे पुस्तक.**

श्री. अरूण फडके हे एक अनेक पैलू असलेले लेखक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आहेत. चिन्हे व प्राचीन भारतीय संस्कृती हा त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय. मराठी भाषेचे सौंदर्य वाढवणाऱ्या म्हणी, पुरातन इमारतींचे संवर्धन, भव्य कार्यक्रमांचे सौंदर्यशास्त्रीय आयोजन असे त्यांचे अभ्यासाचे विषय आहेत आणि या प्रत्येक विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची वृत्ती व अचुक आणि नेमके लिहीण्यासाठी कष्ट घेण्याची तयारी यामुळे त्यांना साहित्यिक वर्तुळांत मानाचे स्थान आहे. सध्याच्या whatsapp युनिव्हर्सिटीच्या काळात त्यांचे मौलिक लेखन ही एक मोठीच बौद्धिक मेजवानी असते.

श्री. अरूण फडके यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपले पुस्तक ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत

पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।